CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, १३ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १५५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




शुभेच्छुक

अध्यक्ष, संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
**शिवरत्न शिक्षण संस्था,**
शंकरनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर

Shivratna Educational Institution

स्वामीराज अॅडस#9503773073

थेंबा थेंबात अमृत...
शिवामृत ®

व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालक, संचालक मंडळ,
अधिकारी, दूध उत्पादक शेतकरी व कर्मचारी वर्ग
**शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या,**
विजयनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### विजेच्या धक्क्याने तरुणी जखमी

**सोलापूर :** टिल्लू पंपचे वायर सरकवताना विजेचा धक्का बसल्याने तरुणी जखमी झाली. शनिवारी (ता. १२) सकाळी १०.१५ च्या सुमारास बापुजी नगरात ही घटना घडली. अश्विनी रवी विटेवल्लू (वय २५, रा. बापुजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर) असे तिचे नाव आहे. अश्विनी ही पायी घराकडे निघाली होती. वाटेत पाणी भरण्यासाठी बसवलेल्या टिल्लू पंपाचे वायर पडले होते. ते वायर डाव्या हाताने सरकवताना विजेचा धक्का बसल्याने ती जखमी झाली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### दुचाकी घसरुन अपघात, तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** दुचाकी घसरुन घडलेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा शनिवारी (ता. १२) पहाटे ४.४५ च्या सुमारास येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. शुक्रवारी (ता. ११) सायंकाळी ५ च्या सुमारास मंगळवेढ्याजवळ हा अपघात घडला. राजअहमद हाजीमलंग शेख (वय ३७, रा. मड्डी वस्ती, तुळजापूर रोड, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. राजअहमद हा दुचाकीवर पाटखळ (ता. मंगळवेढा) कडे निघाला होता. वाटेत दुचाकी घसरल्याने अपघात घडला. त्यात गंभीर जखमी झाल्याने मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केले. पुढील उपचारासाठी पहाटे येथील शासकीय रुग्णालयात हलविले. मात्र, त्याचा मृत्यू झाला. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### पैशावरुन दोघांची एकास मारहाण

**सोलापूर :** उधारीचे पैसे देण्यावरुन दोघांनी पाईप, लाकडाने एकास मारहाण केली. शुक्रवारी (ता. ११) दुपारी ४ च्या सुमारास विडी घरकुलमध्ये ही घटना घडली. विजय दत्तू लोखंडे (वय ३८, रा. गडगी नगर, विडी घरकुल, सोलापूर) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. उधारीचे पैसे देण्याच्या कारणावरुन रोहित व अनिकेत या दोघांनी त्यास मारहाण केली. त्यात मार लागल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### दुचाकीच्या धडकेने तरुण जखमी

**सोलापूर :** समोरुन दुचाकीने धडक दिल्याने घडलेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. शुक्रवारी (ता. ११) दुपारी तीनच्या सुमारास येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा अपघात घडला. रंगराज नेहरू राठोड (वय ३५, रा. सेवालाल नगर, मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. रंगराज हा सम्राट चौकातून दुचाकीवर एसटी बसस्थानकाकडे निघाला होता. वाटेत दुचाकीने धडक दिल्याने हा अपघात घडला. यात जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### थांबलेल्या वाहनास धडक, टमटमचालक जखमी

**सोलापूर :** रस्त्याकडेला थांबलेल्या वाहनाला धडक दिल्याने घडलेल्या अपघातात टमटमचालक जखमी झाला. शनिवारी (ता. १२) सकाळी ७ च्या सुमारास मोहोळजवळ हा अपघात घडला. राजाराम रामभाऊ लोंढे (वय ६४, रा. करमाळा) असे जखमीचे नाव आहे. राजाराम हे पुणे येथून टमटम घेऊन तुळजापूरकडे निघाले होते. मोहोळ ५ किलोमीटर अंतरावर असताना रस्त्याकडेला थांबलेल्या वाहनाला टमटमने धडक दिल्याने हा अपघात घडला. यात जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्मालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### तरुणाने ब्लेडने गळ्यावर मारुन घेतले

**सोलापूर :** घरगुती वादातून तरुणाने ब्लेडने गळ्यावर मारु घेतले. त्यात तो जखमी झाला. शनिवारी (ता. १२) सकाळी ८ च्या सुमारास नवीन विडी घरकुलमध्ये ही घटना घडली. असिफ उस्मान मुल्ला (वय २६, रा. पाणी टाकीजवळ, नवीन विडी घरकुल, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### म्हशीच्या धक्क्याने तरुण जखमी

**सोलापूर :** म्हशीने धक्का दिल्याने खाली पडून तरुण जखमी झाला. शनिवारी (ता. १२) पहाटे ४ च्या सुमारास मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथे ही घटना घडली. संतोष रकमाजी हजारे (वय २४, रा. मंद्रूप) असे त्याचे नाव आहे. संतोष हा झाडाला म्हैस बांधत होता. तेव्हा म्हशीने धक्का दिल्याने तो तोल जाऊन खाली पडला. त्यात जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### कुरुलमध्ये दोन गटात हाणामारी

**सोलापूर :** मागील भांडणातून कुरुल (ता. मोहोळ) येथे शुक्रवारी (ता. ११) दुपारी ४ च्या सुमारास दोन गटात हाणामारी झाली. चांदमहमद बाबूलाल मुजावर (वय २६) व रेहाना अस्लम मुलाणी (वय ४५), शरीफ नूरअहमद मुलाणी (वय ५०, सर्व रा. कुरुल) अशी त्यांची नावे आहेत. जुन्या भांडणाच्या रागातून रेश्मा शरीफ मुलाणी हिच्यासह तिघांनी चांदमहमद यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यात अवघड जागी मुकामार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. तर चांदमहमद यांच्यसह तिघांनी रेहाना व शरीफ यांना मारहाण केली. मुकामार लागल्याने उपचारासाठी त्यांना येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

### कुरघोटमध्ये मुलास मारहाण

**सोलापूर :** विनाकारण आठजणांनी लाथाबुक्क्यांनी १३ वर्षीय मुलास मारहाण केली. शुक्रवारी (ता. ११) दुपारी ४.३० च्या सुमारास कुरघोट (ता. दक्षिण सोलापूर) येथे ही घटना घडली. अमान सलीम सय्यद (रा. कुरघोट) असे त्याचे नाव आहे. घराजवळ विनाकारण अस्लम शेख याच्यासह आठजणांनी त्यास मारहाण केली. त्यात मुकामार लागल्याने त्याच्यावर मंद्रूप ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### वाहनाच्या धडकेने ज्येष्ठ नागरिक जखमी

**सोलापूर :** पायी फिरताना अनोळखी वाहनाने धडक दिल्याने घडलेल्या अपघातात ज्येष्ठ नागरिक जखमी झाला. शुक्रवारी (ता. ११) रात्री १० च्या सुमारास हौसे वस्तीत हा अपघात घडला. पांडूरंग लक्ष्मण नागटिळक (वय ६३, रा. आमराई, हौसेवस्ती, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

# शिक्षक व बांधकाम व्यावसायिकाची ५ कोटींची फसवणूक

## पुण्याच्या बांधकाम व्यावसायिकाविरुध्द सोलापुरात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

पुणे येथील सेवानिवृत्त शिक्षक व सांगली जिल्ह्यातील बहे येथील बांधकाम व्यावसायिकाची सुमारे ५ कोटी रूपयांची फसवणुक करणाऱ्या पुण्याच्या समर्थ डेव्हलपरच्या दोघां भागीदारांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




यापरकरणी रघुनाथ आनंदा रोकडे (वय ४५, रा. प्लॉट नं. ४६७, आई बंगला, निगडी प्राधिकरण सेक्टर २, पुणे) आणि संदीप गोविंद रोकडे (वय ४५ रा. बहे, ता. वाळवा, जि. सांगली) या दोघांच्या फिर्यादीवरुन राहुल विष्णु लाड (रा. सर्व्हे नं. ११६, रिलायन्स टॉवरजवळ, वाल्हेरवाडी, चिंचवड, पुणे) आणि राजेंद्र तुकाराम थोरवे (रा. सर्व्हे नं. १८/९, गणेश नगर, दुर्गा कॉलनी, डांगे चौक, थेरगाव, पुणे) यांच्याविरुध्द दोन गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

रघुनाथ रोकडे हे सेवानिवृत्त शिक्षक असून त्यांची सोलापुरातील डी व सब डी पैकी सोलापूर पैकी, ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे नेहरू नगर येथील जुना सर्व्हे नं. ३७२ व नविन सर्व्हे नं. १५/८ मधील १ हेक्टर इतके क्षेत्र मालकीचे असून कब्जेवहिवाटीचे आहे. तर संदीप रोकडे हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांची सलगर वाडी येथील शेतजमीन गट क्र. १९/२/अ याचे एकूण क्षेत्र १ हेक्टर ९ आर आणि गट नं. १९/२/ब याचे एकूण क्षेत्र १ हेक्टर २० आर इतके मालकीचे असून कब्जेवहिवाटीचे आहे. या दोघांनीही वैयक्तिक अडचणीमुळे सन २०२४ मध्ये शेतजमिन विकण्याचा निर्णय घेऊन त्याबाबत त्यांच्या ओळखीच्या शैलेश वाघमारे यास सांगितले होते. त्यावेळी वाघमारे याने त्यांच्या ओळखीच्या पुणे येथील समर्थ डेव्हलपरचे भागीदार राहुल लाड व राजेंद्र थोरवे यांची रोकडे यांची रघुनाथ रोकडे व संदीप रोकडे यांची ओळख करून दिली व सोलापूरमध्ये बैठक घडवून दिली. या बैठकीमध्ये लाड व थोरवे यांना रोकडे यांनी या मिळकतींवर बाबासाहेब औटी (रा. सोलापूर) यांनी दिवाणी दावा दाखल केल्याचे सांगून सर्व कागदपत्रे दाखविली होती. या बैठकीत न्यायालयात निर्णय विपरीत झाल्यास व्यवहाराची रक्कम लाड व थोरवे यांना परत देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे रघुनाथ रोकडे यांची शेतजमीन ही एकरी १ कोटी ५ लाख रुपयांप्रमाणे म्हणजेच २ कोटी ६२ लाख ५० हजार रुपयांना व्यवहार ठरला होता. तर संदीप रोडके यांची शेतजमिन ही एकरी ६५ लाख रुपयांप्रमाणे म्हणजेच ३ कोटी ७२ लाख १२ हजार ५०० रुपयांचा व्यवहार ठरला होता.

या दोन्ही व्यवहारांचे १५ ऑक्टोबर २०२४ रोजी इसारा पावती दस्त करण्यात आले. या दस्तामध्ये न्यायालयातील दाखल दाव्यांचे माहितीचा उल्लेख करण्यात आला. यावेळी दोघां रोकडेंना प्रत्येकी ५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. त्यानंतर १६ मार्च २०२५ रोजी सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ कार्यालय येथे रजिस्अर खरेदी दस्त करण्यात आला. यावेळी लाड व थोरवे यांनी रोकडे यांना उर्वरीत रकमेचा धनादेश दिला. तो धनादेश दोन्ही रोकडे यांनी १८ मार्च २०२५ रोजी त्यांच्या बँकेत वठण्यासाठी सादर केला असता तो वठलाच नाही. त्यामुळे रोकडे यांनी त्यांच्या वकिलांमार्फत सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदविलेल्या दस्ताची छायांकित प्रत मिळवून त्यातील मजकूर पाहिला असता त्या मजकुरामध्ये लाड व थोरवे यांनी मजकूर बदलेला दिसून आला. तसेच लाड व थोरवे यांनी दिलेला धनादेश देखील वठलेला नाही. त्यामुळे रोकडे यांची फसवणुक झाल्याचे दिसून आल्याने त्यांनी पोलिस आयुक्तालय गाठून याबाबत तक्रार दाखल केली.

याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून हे दोन्ही गुन्हे आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहेत. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास सहायक पोलिस निरीक्षक पाटील करीत आहेत.

### याच जमिनीच्या वहिवाटीवरून यापूर्वीही गुन्हे दाखल...

रघुनाथ रोकडे यांच्या नेहरू नगर येथील शेतजमिनीमध्ये २ एप्रिल रोजी दुपारी बाबासाहेब औटी व एका अनोळखी व्यक्तीने घुसखोरी करून शेतातील कंम्पौड जेसीबीच्या सहाय्याने तोडून ४ ते ५ लाखांची नुकसान केले. ६ एप्रिल रोजी शेतजमिनीमध्ये जबरदस्तीने बेकायदेशीरपणे ॲड गणेश भगवान सावंत व बाबासाहेब लक्ष्मण औटी यांच्या नावाचा जाहिर बोर्ड लावला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर संदीप रोकडे यांच्या सलगर वाडी येथील शेजजमिनीमध्ये घुसखोरी करून जमिनीमध्ये बाबासाहेब लक्ष्मण औटी व ॲड. गणेश भगवान सावंत यांच्या नावाचा बोर्ड लावण्याचा प्रयत्न केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सोलापुरात देखील लँड माफिया उदयास?...

गेल्या काही दिवसापासून सोलापूर शहरातील रिकाम्या जमिनीमध्ये आणि आजूबाजूच्या परिसरातील शेतजमिनीमध्ये घुसखोरी करून अतिक्रमण करून जागा बळकाविण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. अशा जागा बळकाविण्याच्या प्रयत्नांमध्ये अनेक हाणामारीसारख्या घटनांदेखील घडून कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. दुसऱ्याच्याच जागेत अतिक्रमण करून जागा बळकाविणाऱ्या लँड माफियांना कोणत्या यंत्रणेचा वरदहस्त लाभला आहे, याचा शोध होणे गरजेचे आहे.

# जिल्ह्यात फक्त एकाच तालुक्यात ४ पाणीटँकरने पाणीपुरवठा सुरू

- मागेल त्या गावाला होणार टँकरने पाणीपुरवठा
- जिल्हा प्रशासनाची नियोजनबध्द तयारी
- उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

गतवर्षी जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने फेब्रुवारीमध्येच दुष्काळी नियोजन आराखडा तयार केला होता आणि १३७ गावे, ९१२ वस्त्यांवर राहणाऱ्या ४ लाख लोकांसाठी तब्बल १६७ पाण्याचे टँकर एप्रिलपासून चालू केले होते. यंदा जिल्ह्यात मुबलक पाणी असल्याने अजूनही पाणी टँकरची मागणी कमीच असली तरी ४० कोटी १६ लाख १२ हजार रूपयांचा पाणी टंचाई कृती आराखडा जिल्हा प्रशासनाकडून विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता; त्यांच्या मंजुरीनंतर तो पाणी टंचाई आराखडा आता शासनाकडे पाठविण्यात आला आहे. दरम्यान, सध्या माळशिरस तालुक्यात ४ गावांना पाणीटँकर सुरू केले असून, मागेल त्या गावाला पाणी टँकर मिळेल मात्र त्याचे निकष पाहूनच पाणी टँकर देण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी आज (दि. ११) दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर २०२४ ते जून २०२५ अखेर पाठविलेल्या पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार इतका अपेक्षित आहे. यामध्ये प्रस्तावित योजनांची संख्या ११३५, प्रस्तावित गावे ६८० आणि १९३३ वाड्यांचा समावेश आहे. तर उपसा सिंचन योजनेची वीज देयके देणेकरिता २ कोटी रू., प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची वीज देयके थकबाकी देणेकरिता र. रूपये १०६१.०५, व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयके देणेकरिता ६११.३६ लाख असा एकूण १८ कोटी ७२ लाख ४१ हजार इतका निधी गृहित धरण्यात आला आहे. एकंदरीत, पाणी टंचाई कृती आराखड्यातील आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार आणि वीज देयके थकबाकी देणेकरिता १८ कोटी ७२ लाख ४१ हजार असा एकूण ४० कोटी १६ लाख १२ हजाराचा पाणी टंचाई आराखडा यंदा तयार केला आहे.

यंदा मात्र एप्रिलपासूनच पाणीटँकर सुरू झाले असून, सध्या अवघे ४ टँकर सुरू केले आहेत. या चालू वर्षात सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा अन् जनावरांच्या चाऱ्याचा आजतागायत त्रास झाला नाही. १० तालुक्यातील एकाही गावातून अजून पाणीटँकरची मागणी नाही. यासाठी तहसीलदार, प्रांताधिकारी यांना अधिकार दिले असून, त्यांच्या अहवालानंतर आम्ही पाणीटँकरला मंजुरी देतो.

### गावाला पाण्याचा कुठलाच स्त्रोत नसेल तरच पाणीटँकरची सोय!

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात अती दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने कोट्यवधीचा खर्च करावा लागला होता. यंदा सर्वत्र चांगला पाऊस झाल्याने टंचाईवर खर्च तोकडा आहे. सध्याही जवळपास सर्वच तालुक्यांना भरपूर पाणी आहे. ज्या गावातील मोठे साठवण तलाव, शासनाच्या सार्व. विहिरी, अधिगृहण करावयाच्या विहिरी, गावातील बोअर्सना पाणी नसेल तरच पाणीटँकर देण्यात येते. पाणीटँकर सुरू करण्यापूर्वी शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांकडून सर्व पाणीस्त्रोतांची चौकशीही होते आणि नंतरच त्या गावाला पाणीटँकरने पाणीपुरवठा सुरू होतो. एकंदरीत, जिल्हा स्तरावरून टंचाईसाठीसुध्दा मायक्रोप्लॅनिंग होत असल्याने शासनाचे पैसेही मोठ्या प्रमाणावर वाचणार आहेत.

# श्री शंकरलिंग प्रशालेत फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग १२ एप्रिल**

वळसंग ( ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी पर्यवेक्षक शिवानंद घोडके,सिध्दाराम भैरामडगी , मल्लिनाथ गौडगाव,वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी आदी उपस्थित होते.



# सर्वसामान्यांच्या हितासाठीचा लढा महत्त्वाचा : सुशीलकुमार शिंदे




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

सोलापूर : विरोधी पक्ष पोटतिडकिने संघर्ष का करतो. याचे चिंतन सत्ताधाऱ्यांनी केलं पाहिजे मत्र सध्या तसे होताना दिसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे समाजात जागृती झाली. त्यांच्यामुळेच मी उच्च पदावर पोहोचलो. सर्वंकष दलित समाजाची भूमिका मी घेतली होती. सद्यस्थितीत सर्वांना घेऊन जाणारे नेतृत्व महत्त्वाचे आहे. सर्व सामान्यांच्या हितासाठीचा लढा हा यशस्वी होतो, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

**कामगार नेते जानराव लिखित ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचा लढा'' पुस्तकाचे प्रकाशन**

कामगार नेते अशोक जानराव लिखित ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचा लढा'' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचार मंचावर लेखक अशोक जानराव, सरोजनी जानराव, महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, बसपाचे प्रदेश महासचिव एड. संजीव सदाफुले, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, निमंत्रक तथा संकल्प प्रकाशनचे प्रकाशक डॉ. धम्मपाल माशाळकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकाशक डॉ. धम्मपाल माशाळकर यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन केले. प्रदीप जोशी यांनी आभार मानले. यावेळी शशिकांत शिरसट, अनिल जगझाप, बाबासाहेब क्षीरसागर, कुणाल जानराव यांच्यासह जानराव परिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# जनसामान्यांच्या मनातील विराट शक्ती; खा.धैर्यशील मोहिते पाटील

**पावसाच्या प्रत्येक थेंबाचा मोती तयार होत नाही तर स्वाती नक्षत्रातील काही ठरावीक थेंबच शिंपल्यामध्ये पडतात आणि त्याचाच मोती तयार होतो असे मोती आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतात असाच मोती सोलापूर जिल्ह्याला खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या रूपाने मिळाला आहे. मोहिते पाटील घराण्याचा वारसा लाभला असला तरी स्वकर्तृत्वाने सिध्द झालेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख सर्वदूर होताना दिसत आहे.**

विनम्रता, विद्वत्ता या मानवी जीवनातील गुणांचे सुंदर प्रतीक, सहनशीलता हा स्थाविभाव तर निर्भयता, क्षमाक्षिलता आणि कर्तव्यदक्षता हे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत. प्रयत्नवादास प्रथम स्थान देणाऱ्या या नेतृत्वाच्या कृतिशील विचारातून आणि कार्यपध्दतीतून जिल्ह्याला एक कणखर बुध्दिमान नेता गवसला आहे. विचारात निष्ठा, कार्यात तत्परता, कर्तृत्वात निर्भीडता, राजनीतीत व्यापकता असा समर्थ नेता म्हणूनच त्यांचा सध्या उल्लेख केला जात आहे. सामाजिक जबाबदारीचे भान जपणारा आणि मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करणारा नेता म्हणून त्यांची विशेष ओळख राहिली आहे. अनेक पदे त्यांनी आजपर्यंत भूषवली त्या प्रत्येक पदाला त्यांनी न्याय दिला आहे. राजकारणातून मिळालेल्या प्रत्येक पदाला लोकाभिमुखतेची जोड दिली. समाज सेवेचा वारू कधी थांबू दिला नाही. समाजसेवेचा वसा ते राष्ट्रीय कर्तव्य समजून करताना दिसतात. डोळे सर्वांनाच असतात मात्र भविष्याचा वेध घेण्याची दूरदृष्टी कर्तृत्ववान व्यक्तीलाच असते म्हणूनच स्वकर्तृत्वाने जनसामान्यांच्या हृदय सिंहासनावर ते विराजमान झालेले अद्वितीय नेतृत्व ठरले आहेत. आजकाल अनेक नेते मंडळी राजकारण करत असताना कोणावर तरी वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतूने समाजसेवेचा देखावा करीत ढोंगीपणा करताना दिसतात यामुळे त्यांना तात्पुरत्या स्वरूपात समाधान मिळते पण जनतेच्या लक्षात आल्यानंतर अशी क्षणिक वादळे हवेत विरून जातात त्यामुळे सामाजिक कार्याचा आपला उद्देश साफ असला पाहिजे तरच त्या नेतृत्वाला लोकमान्यता मिळते आणि अशाच नेतृत्वाचा जनता जनार्दन नेहमी गौरव करीत असते. आणि हाच गौरव खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाला प्राप्त झाला आहे. त्यांच्या अविरत सेवेचे जनतेकडून स्वागत होताना दिसते आहे. मनात कधीही त्यांनी कटुता भावना ठेवली नाही. देवाला हात जोडताना दुःखितांचे दुःख दूर कर याच भावना त्यांच्या मनात असतात. त्यांची वृत्ती निधर्मवादी आहे.मानवतावाद हा त्यांच्या जीवनाचा विशेष गुण राहिला आहे. समाजकारणातून मानव सेवा करीत असताना राजकारणातून विकासाच्या प्रक्रियेला ते गतिमान करताना दिसत आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय विश्वात त्यांनी अगदी अल्पावधीत आपल्या कर्तृत्वाने मोहोर उमटवली असून जनसामान्यांचा ते एक बुलंद आवाज झाले आहेत. समोर आलेल्या प्रश्नांचे ते अचूकपणे निराकरण करतात.त्यामुळे मोठमोठे प्रश्न ते सहज सोडविताना दिसतात.



समाजसेवेचा वसा त्यांनी आजपर्यंत निर्विवादपणे जोपासला असून आजतागायत ते अविरत सेवेच्या माध्यमातून जनतेची सेवा करताना दिसत आहेत. शिवामृत दूध संघाची विविध उत्पादने जनतेच्या सेवेसाठी त्यांनी बाजारात आणून या संघाच्या नावलौकिकाला पुन्हा एकदा झळाळी प्राप्त करून दिली आहे. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे तेजोमय होताना दिसत आहे. ताराराणी कुस्ती केंद्राच्या माध्यमातून आपल्या ग्रामीण भागातील मुली राष्ट्रीय खेळाडू निर्माण झाल्या पाहिजेत म्हणून त्यांची सदैव धडपड दिसते. राजकारण समाजकारण साहित्य क्रीडा कला संस्कृतिक अशा विविध क्षेत्रात त्यांनी आजपर्यंत विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. प्रथम एज्युकेशन फाउंडेशन च्या माध्यमातून अगदी शिक्षणापासून दूर गेलेल्या मुली महिला यांना त्यांनी जीवनात यशस्वी होण्याची संधी प्राप्त करून दिली असून यामुळे अनेक महिलांच्या जीवनात सोनेरी पहाट उजाडलेली दिसत आहे. महिलांच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा व्हाव्यात यासाठी त्यांनी कुस्तीगीर परिषदेकडे अनेक वेळा पाठपुरावा केला. कर्जत आहील्यानगर येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे महिला व पुरुष महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा अकलूजला आयोजित कराव्यात अर्थात अकलूजला यजमानपद द्यावे अशी मागणी त्यांनी केली असून पुढील वर्षी म्हणजे २०२६ ला या स्पर्धा अकलूजला पार पडू शकतात.

दिनांक ५ मे ते ७ मे २०२३ रोजी ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा त्यांनी आयोजित केल्या यामुळे कुस्ती क्षेत्रातील अनेक मुलींना संधी प्राप्त झाली. प्रत्येक कार्यक्रम राबवताना त्यांची समाजाप्रती असणारी बांधिलकी दिसते. सांतत्याने कार्यकर्त्यांच्या गराड्यात राहणारा हा नेता प्रत्येकाच्या सुखदुःखात सामील होताना दिसतो. म्हणूनच त्यांच्या संपर्कात आलेला व्यक्ती त्यांना कधीही विसरू शकत नाही. म्हणूनच खासदार धैर्यशील मोहिते पाटील ही एक आता व्यक्ती राहिली नसून ती एक विराट शक्ती निर्माण झाली आहे आणि ही विराट शक्ती संसदेत आजीवन गर्जत राहिली पाहिजे इतकेच..

**- डी. एस. गायकवाड**
**९८९०१५३३३०**

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
सोलापूर | रविवार, १३ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




**आजचे सामने**

**राजस्थान रॉयल्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु**
वेळ : दु. ३.३० वाजता
ठिकाण : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर

**मुंबई इंडियन्स वि. दिल्ली कॅपिटल्स**
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली

## विचारपुष्प



आज हिंदुत्वनिष्ठ आणि हिंदुत्वविरोधी दोन्ही शक्ती मैदानात उभ्या आहेत. आतापर्यंत जे लोक आपापल्या आखाड्यात कसरत करत होते, आपल्या भुजा बळकट करीत होते, ते आता प्रत्यक्ष रणभूमीत महाभारत युद्धासाठी उभे आहेत. आता 'न दैन्यं न पलायनं'ची स्थिती आली आहे. वैचारिक आघाडी, संघटनात्मक आघाडी आणि भौतिक आघाडी अशा सर्व आघाड्यांवर लढण्याची गरज आहे.

- **कुप्पू. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# राष्ट्रपतींनी तीन महिन्यांत विधेयकावर निर्णय घ्यावा

**• सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय • राष्ट्रपतींकडे 'पॉकेट व्हेटो' नाही**

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींनी तीन महिन्यांत निर्णय घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णयात म्हटले आहे. घटनेतील कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींनी केलेल्या कार्याची न्यायालयीन परीक्षण शक्य आहे, असे न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या न्यायासनाने स्पष्ट केले.



तामिळनाडूच्या राज्यपालांनी प्रलंबित विधेयकांना मंजुरी देण्यास नकार दिला होता. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी सुनावणी करीत तामिळनाडूच्या राज्यपालांचा निर्णय रद्दबातल केला होता. न्यायालयाने मंगळवारी हा निर्णय दिला आणि शुक्रवारी संबंधित आदेश संकेतस्थळावर टाकला.

घटनेतील कलम २०१ अनुसार, ज्यावेळी कोणतेही विधेयक राज्यपालांद्वारे राष्ट्रपतींकडे पाठवले जाते, त्यावेळी राष्ट्रपतींना त्यावर सहमती किंवा असहमती दर्शवावी लागते. मात्र, घटनेत या प्रक्रियेचा कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही. राष्ट्रपतींकडे 'पॉकेट व्हेटो'चा अधिकार नाही. म्हणजेच ते अनिश्चितकाळासाठी आपला निर्णय प्रलंबित ठेवू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

कोणती कालमर्यादा निश्चित केलेली नसते, त्यावेळी अधिकाराचा वापर वाजवी वेळेत झाला पाहिजे. कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतीद्वारे अधिकाराचा वापर कायद्याच्या सामान्य सिद्धांतापासून वेगळा राहू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. विधेयकावर निर्णय घेण्यास तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागत असल्यास, योग्य कारण सांगून राज्याला त्याची माहिती देणे आवश्यक आहे. राज्यपालांनी पाठवलेले विधेयक प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींनी निर्णय घेणे आवश्यक आहे, असा निर्देश न्यायासनाने दिला.

द्रमुक सरकारने पारित केलेल्या दहा विधेयकांना राज्यपाल आर. एन. रवी यांनी मंजुरी दिली नव्हती. कोणत्याही प्रकारची निष्क्रियता न्यायालयीन परीक्षणाच्या अंतर्गत येऊ शकते, असे न्यायासनाने विधेयकांवर राज्यपालांसाठी कालमर्यादा निश्चित करताना म्हटले होते. (वृत्तसंस्था)

### ...तर राज्य ठोठावू शकतील न्यायालयाचे द्वार

निर्धारित काळात कोणतीही कार्यवाही न झाल्यास संबंधित राज्य न्यायालयाचे द्वार ठोठावू शकतील. एखादे विधेयक घटनात्मक वैधतेच्या आधारावर रोखले जात असल्यास, कार्यपालिकेने न्यायपालिकेची भूमिका पार पाडू नये. अशा प्रकरणांमध्ये घटनेतील कलम १४३ अंतर्ग सर्वोच्च न्यायालयात ते पाठवावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### केवळ न्यायालयच देऊ शकते सल्ला

ज्यावेळी एखाद्या विधेयकात केवळ कायदेशीर मुद्यांचा समावेश असतो, त्यावेळी कार्यपालिकेचे हात बांधलेले असतात आणि केवळ घटनात्मक न्यायालयांनाच अशा प्रकरणात अभ्यास करून सल्ला देण्याचा अधिकार असतो, असे न्यायालयाने म्हटले आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, खासदार उदयनराजे भोसले उपस्थित होते

## प्रवीण परदेशी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार

**मुंबई** : माजी आयएएस अधिकारी प्रवीण परदेशी यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती शनिवारी जारी करण्यात आलेल्या निवेदनात देण्यात आली. जुलै २०२३ पासून नीती आयोगाच्या धर्तीवर स्थापन झालेल्या राज्य सरकारची थिंक टँक महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनचे (मित्रा) मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून परदेशी सध्या काम पाहत आहेत. १९८५ च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी असलेल्या परदेशी यांना प्रशासनात ३६ पेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे.

# लष्करच्या नेत्यांसोबत तहव्वूरच्या बैठका

**नवी दिल्ली, १२ एप्रिल**

पाकिस्तानी लष्कराच्या वैद्यकीय तुकडीतून बाहेर पडल्यानंतरदेखील मुंबई हल्ल्याचा प्रमुख कटकर्ता तहव्वूर हुसेन राणा दहशतवादी संघटना लष्कर-एतोयबा आणि आयएसआयच्या संपर्कात होता आणि अधिकाऱ्यांसोबत बैठकांमध्ये सहभागी झाल्याची माहिती राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएच्या चौकशीतून समोर आली आहे.

राणाने चौकशीत सांगितले की, १९९७ मध्ये पत्नी समराज राणा अख्तरसोबत कॅनडाला गेला. येथे त्यांनी इमिग्रेशन कन्सल्टन्सी कंपनी सुरू केली आणि नंतर हलाल मांसाचा व्यवसाय सुरू केला. कन्सल्टन्सी कंपनीच्या माध्यमातून तो लष्कर-ए-तैयबाच्या संपर्कात आला.

त्यानंतर आयएसआयएसच्या निर्देशावरून पाकच्या लष्कराने त्याला सैन्य गणवेश घालण्याची परवानगी दिली होती. या काळात त्याने लष्कर-ए-तैयबाच्या प्रशिक्षण अड्ड्याला भेटी दिल्या, तसेच आयएसआय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या बैठकीत सहभागी झाला. भारताविरोधात रचण्यात येणाऱ्या कटकारस्थानावर या बैठकांमध्ये चर्चा झाल्याची माहिती राणाने दिल्याचे एनआयएच्या अधिकृत सूत्राने सांगितले.

साजिद मीरची घेतली भेट राणाने लष्करच्या विविध नेत्यांशी केलेल्या संभाषणाची रेकॉर्डिंग अमेरिकेच्या अधिकाऱ्यांकडून एनआयएला मिळाली आहे. याची तपासणी अधिकाऱ्यांकडून केली जाणार आहे.

# स्वत:ला आलमीर म्हणवणारा औरंगजेब महाराष्ट्राच्या मातीत गाडला गेला

### अमित शाह यांचे प्रतिपादन

### शिवरायांना रायगडावर अभिवादन

◆ **रायगड, १२ एप्रिल**

महाराष्ट्रातील मराठ्यांच्या विरोधात लढणारा आणि स्वतःला आलमगीर म्हणवून घेणारा औरंगजेब पराभूत होऊन महाराष्ट्राच्या मातीत गाडला गेला, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी येथे केले.

३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त अमित शाह यांनी आज रायगड किल्ल्याला भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. १०० व्या स्वातंत्र्यदिनापर्यंत भारत महाशक्ती व्हावा या महत्त्वाकांक्षेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा 'स्वधर्म आणि स्वराज्य' हा आदर्श प्रेरणा देत आहेत. शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवू नका, असे आवाहन मी राज्यातील नागरिकांना करतो. शिवाजी महाराजांनी समाजातील सर्वच घटकांना धोरणात्मकरीत्या एकत्र केल्याने त्यांची प्रचंड इच्छाशक्ती, दृढनिश्चय आणि धैर्य देशाला प्रेरणा देते, असे अमित शाह यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

**अरबी समुद्रातील स्मारकासाठी कटिबद्ध : मुख्यमंत्री फडणवीस**

शिवाजी महाराज यांचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्यासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. याबाबत मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका आम्ही कुशलतेने लढू, असे ते म्हणाले. दिल्लीत शिवाजी महाराजांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत उदयनराजे यांनी केलेली मागणी फडणवीस यांनी मान्य केली आणि अमित शाह यांच्यासोबत या विषयावर चर्चा करू, असे फडणवीस यांनी आश्वस्त केले. (वृत्तसंस्था)






# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com


## रोखठोक

**दिनेश गुणे**

# मानवाधिकाराचे राजदूत!

दहशतवादाच्या विरोधात जागतिक मतैक्य निर्माण करण्यासाठी गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने उपलब्ध असलेल्या प्रत्येक मंचावरून केलेल्या प्रयत्नांची फळे आता दिसू लागली आहेत. पण असे काही घडताना दिसले की काँग्रेसजनांचे चेहरे कसे काळजीने काळवंडतात याचे जिवंत चित्र दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसच्या वरच्या फळीवरून काहीसे खुंटीवर गेलेले नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या चेहऱ्यावर प्रत्यक्ष उमटलेले महाराष्ट्राने पाहिले. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा प्रमुख सूत्रधार असलेल्या तहव्वूर राणा यास आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून कठोरातली कठोर शिक्षा देण्याच्या इराद्याने गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या मोदी सरकारच्या सार्वत्रिक प्रयत्नांस फळ आले आणि राणाची रवानगी अमेरिकेतून भारतातील एनआयएच्या कोठडीत झाली. त्या हल्ल्यात मृत्यू ओढवलेल्या शेकडो निरपराधांच्या मनावरील भळभळत्या जखमांवर या कारवाईच्या एका घटनेमुळे दिलाशाची फुंकर मारली गेली असताना, पृथ्वीराज चव्हाण यांना मात्र, तहव्वूर राणा याच्या मानवाधिकारांची चिंता अधिक भेडसावत होती. शेकडो बळी घेणाऱ्या, देशावरील सर्वांत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेऊन दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलता धोरणाचे दर्शन जगाला घडविण्याच्या ईर्ष्येला मूर्त स्वरूप आल्यामुळे उभा देश या कारवाईचे स्वागत करत असताना आणि राणाला त्याच्या कृत्याची पुरेपूर अद्दल घडावी यासाठी मनोमन इच्छा व्यक्त करत असताना चव्हाणांचा सूर मात्र, राणाच्या न्यायासाठी सरकारला साकडे घालत होता. राणाला बचावाची संपूर्ण संधी दिली पाहिजे, असा अनाठायी विचार त्यांना सुचण्यामागे नेमकी कोणती प्रेरणा होती, हे समजू शकणार नाही. याच दहशतवादी हल्ल्यातील अजमल कसाब या एकमेव आरोपीच्या विरोधात ढीगभर पुरावे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि देशाबाहेरील शक्तींच्या कारवायांचे अनेक दाखले हाती असतानाही, कसाबला न्यायालयाद्वारेच शिक्षा ठोठावण्यात आली आणि मानवी हक्कांच्या न्यायासुसार त्यालाही बचावाची संपूर्ण संधी येथील न्यायव्यवस्थेने दिली होती. राणा यासदेखील ही संधी दिली पाहिजे अशी कळकळीची मागणी करताना चव्हाण यांनी परवा त्याची कबुलीही दिली. तरीही त्यांच्या वक्तव्यातून राजकारणी तिरकसपणा पाझरलाच. एक तर, हा दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुढे अनेक वर्षे देशाबाहेरील आरोपींना शिक्षा घडविण्यासाठी काँग्रेसकडून फारसा पाठपुरावा झाल्याचे दिसले नाही. त्यासंदर्भात काही झाले असेलच, तर ते केवळ खलिते पाठवून कागदी घोडे नाचविण्यापुरते आणि काहीतरी केल्याची नोंद रहावी एवढ्यापुरतेच होते. त्यामुळे, तहव्वूर राणासारख्या खतरनाक आरोपीला देशाबाहेरून मुसक्या आवळून देशात आणणे आणि त्याला त्याच्या क्रूर कृत्याची शिक्षा भोगावयास लावणे हे निर्धाराचे आणि धाडसाचेही काम होतेच. दहशतवादाच्या विरोधात धाडस ही काँग्रेसची प्रतिमा नाही, हे स्पष्ट करणारी एक कबुली या निमित्ताने आवर्जून आठवावयास हवी. ही कबुली खुद्द देशाचे माजी गृहमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी जाहीरपणे एका वक्तव्यातून दिली आहे. जम्मू-काश्मीरला स्वतंत्र अस्तित्व बहाल करून विशेष अधिकार देणारे घटनेतील ३७० वे कलम निष्प्रभ करण्याचे ऐतिहासिक धाडसी पाऊल मोदी सरकारने उचलले तेव्हाही काँग्रेसच्या अनेक नेत्यांच्या उरात भीतीची धडकी भरली होती. हे कलम निष्प्रभ केल्यानंतर पहिल्यांदाच, गेल्या सप्टेंबरात, जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना, सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहळ्याचे निमित्त साधून या भीतीची कबुलीही देऊन टाकली. 'पाच दशकांचे राजकारण' हे शिंदे यांच्या आत्मचरित्राचे नाव! केंद्रीय गृहमंत्री असताना, संरक्षणाची संपूर्ण फळी सोबत असताना, कडेकोट बंदोबस्तासाठी सारी यंत्रणा डोळ्यात तेल घालून सज्ज असतानाही, काश्मीर भेटीच्या दरम्यान देशाच्या खुद्द गृहमंत्र्याची अवस्था कशी होत होती, त्याची ही कबुली आताच्या काश्मीरमधील वास्तवाकडे पाहताना बोलकी आणि वास्तविक वस्तुस्थितीशी तुलना करण्याकरिता पुरेशीदेखील ठरते. अर्थात, शिंदे यांनी सांगितलेला हा किस्सा ते गृहमंत्री होण्याआधीच्या काळातील आहे. पण तेव्हाही देशात काँग्रेसचेच सरकार होते. त्या काळात सुशीलकुमार शिंदे अनेकदा शिक्षणतज्ज्ञ विजय धर यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी जात असत. अशाच एका भेटीत, इतस्त्र कुठेही न जाता जम्मू-काश्मीरमध्ये, विशेषत: श्रीनगरमध्ये लाल चौकातील आणि दाल लेक परिसरातील लोकांशी चर्चा करण्याचा सल्ला धर यांनी शिंदे यांना दिला, तेव्हा आपली भीतीने कशी गाळण उडाली होती, याचे शब्दश: वर्णन खुद्द शिंदे यांनी त्या समारंभात बोलताना केले होते. धर यांच्या त्या सल्ल्यामुळे आपल्याला प्रसिद्धी मिळाली, कोणतीही भीती न बाळगता काश्मीरला जाणारा गृहमंत्री असाही लोकांचा आपल्याविषयी समज झाला, पण प्रत्यक्षात आपली भीतीने अक्षरश: गाळण (इथे शिंदे यांनी जाहीरपणे वापरलेला शब्द नमूद करण्यासारखा नाही!) उडाली होती, असेही शिंदे म्हणाले होते. त्या वेळी शिंदे यांनी वर्णन केलेली मनोवस्था आणि आज राणा याच्या प्रत्यार्पणानंतर त्याला न्याय मिळण्याची चिंता उमटविणारा पृथ्वीराज चव्हाण यांचा सूर हे दोन बिंदू जोडले, तर दहशतवादाबाबतच्या काँग्रेसी मानसिकतेचा एकूण आवाका स्पष्ट होऊ शकतो.

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचे पडसाद जगभर उमटले होते. दहशतवादाचे भीषण संकट सर्वत्र किती वेगाने हातपाय पसरते आहे याची जाणीव त्या हल्ल्यानंतर उभ्या जगाला झाली होती आणि दहशतवाद ही कोणा एका देशाची समस्या नाही यावरही जगाचे एकमत झाले होते. मुंबईवरील दहशतवादी हल्ला जगाला हादरवून टाकणारा होता. या प्रकरणातील दोषींना शिक्षा देण्यासाठी भारताकडून जे जे प्रयत्न केले जातील, त्या सर्वास अमेरिकेकडून पूर्ण सहकार्य केले जाईल



अशी स्पष्ट ग्वाही अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस या देत होत्या, तेव्हा इकडे भारतात मात्र, राणाचे प्रत्यार्पण, खटला चालविण्याची तयारी आणि निरपराधांचे बळी घेणारा कट आखून भारताच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या कटाचा बदला घेऊन असंख्य भारतीयांच्या मनावरील जखमांवर फुंकर घालण्याकरिता सुरू असलेल्या प्रयत्नांना विरोधकांच्या राजकारणाचे रंग मात्र, छेद देऊ पाहत होते. राजकारणात विरोधकांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी करावी, पण जेव्हा राष्ट्रीय हिताचे मुद्दे समोर येतात, तेव्हा तेथे राजकारण आडवे आणू नये, ही जनतेची अपेक्षा असते. पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे एक अन्य नेते विजय वडेट्टीवार आणि कालपरवापर्यंत हिंदुत्वाचा नारा देत राजकारण करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते वेगळा सूर लावून राणाच्या प्रत्यार्पणासारख्या संवेदनशील घडामोडींनाही राजकीय रंग देऊ पाहतात, तेव्हा त्यांना असे करण्याची नेमकी कोणती अपरिहार्यता असते, याची शंका साहजिकपणे उमटते. शेकडो बळी घेणाऱ्या अजमल कसाबलादेखील या देशाच्या न्यायव्यवस्थेने बचावाची पुरेपूर संधी दिली होती. त्याचा गुन्हा पूर्णपणे सिद्ध झाल्यानंतरच त्याला फासावर लटकावण्यात आले, तेव्हा न्यायव्यवस्थेविषयीचा भारतीयांचा आदर दुणावला होता. आता तर, गुन्हेगारासही बचावाची संधी देणाऱ्या या व्यवस्थेतील कायदेसंहितादेखील तोच संदेश देते. असे असतानाही, राणा यास बचावाची संधी दिली जावी अशी घाईघाईने मागणी करण्याचे नेमके कोणते कारण चव्हाण यांना महत्त्वाचे वाटले असावे, हे एक कोडे आहे. एवढेच नव्हे, तर खटल्याची तयारी सुरू होण्याच्या टप्प्यातच न्यायव्यवस्थेवर कांगारू कोर्ट अशी शेरेबाजी करणे हा व्यवस्थेच्या क्षमतेवरही प्रश्नचिन्ह उमटविण्याचाच प्रयत्न नसेल ना, अशीही शंका उपस्थित होऊ शकते. तहव्वूर राणा याच्यावरील खटला निष्पक्षपणे चालविला गेला पाहिजे, त्याचे मानवाधिकार जपले गेले पाहिजेत, असे सांगताना, या देशात कांगारू न्यायालय चालणार नाही, असा इशारा देणाऱ्या चव्हाण यांना कसाब खटल्यात न्यायालयाने बजावलेली न्यायाची भूमिका मान्य आहे, तरीही त्यांनी कांगारू न्यायालय चालणार नाही, असे का म्हटले असावे, याचा खुलासा होणे ही काळाची गरज आहे. चव्हाण हे काँग्रेसचे एका काळातील राष्ट्रीय स्तरावरील नेते आहेत. वडेट्टीवार हे महाराष्ट्रापुरते का होईना, काँग्रेसचे प्रतिनिधित्व करतात. राज्यातील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तहव्वूर राणा यास भारतात आणले गेले असे बिनदिक्कत विधान करताना, त्या हल्ल्यात जीव गमावलेल्या शेकडो निष्पापांच्या कुटुंबीयांच्या मनात तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणामुळे उमटलेल्या समाधानाच्या भावनांना धक्का देत असल्याची जरादेखील जाणीव वडेट्टीवार यांना झाली नसेल का, असे अनेक प्रश्न या भूमिकांनी अधोरेखित केले आहेत. तहव्वूर राणा हा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक पाक पुरस्कृत लष्कर-ए-तोयबा या संघटनेसाठी काम करीत असताना त्याचे दोषी आढळला आणि मुंबईवरील हल्ल्याच्या आखणीत त्याचा महत्त्वाचा सहभाग असल्याचेही उघड झाले. त्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी दहशतवादी हल्लेखोरांना सर्वोच्च शौर्य पुरस्कार देण्याची शिफारस पाकिस्तान सरकारकडे करण्याचा सल्ला त्यानेच हेडली यास दिला होता, असेही उघड होऊ लागले आहे. भारताविरुद्ध दहशतवादी मार्गाने थेट युद्ध पुकारणाऱ्या या हल्ल्याचे असे स्पष्ट समर्थन करणाऱ्या आणि कटासाठी मदत करणाऱ्या तहव्वूर राणाच्या मानवी हक्कांची जाणीव ठेवणे न्यायाच्या दृष्टीने गैर नाही, पण त्याच्यासाठी किल्ला लढविण्यास सरसावण्याआधी चव्हाण यांनी त्या हल्ल्यामुळे दुखावलेल्या भारतीयांच्या जाणिवा लक्षात घेणे योग्य ठरले नसते का, असाही प्रश्न त्यांच्या वक्तव्यानंतर समोर आला आहे. न्यायव्यवस्थेने आपले काम सुरू करण्याच्या प्राथमिक टप्प्यावरच या व्यवस्थेवर कांगारू न्यायालय अशा शंकेचा ठपका ठेवण्यामागे चव्हाण यांना तशी शंका येणारी कोणती बाब आढळली असावी हेही स्पष्ट व्हावयास हवे.

कांगारू न्यायालय हा न्यायव्यवस्थेसाठी अपमानकारक शब्दप्रयोग मानला जातो. कायदा किंवा कायद्याच्या मानकांची जाणीव नसलेल्या व्यवस्थेबाबत सहसा असा उल्लेख केला जातो. अशी व्यवस्था न्यायाच्या योग्य प्रक्रियेकडे दुर्लक्ष करते आणि पूर्वनिर्धारित निष्कर्षापर्यंत पोहोचू शकते. हा शब्द १८४१ मध्ये अमेरिकेत वापरला गेला होता. कांगारूच्या मूळ भूमीत, ऑस्ट्रेलियासारख्या देशातही न्यायव्यवस्थेसाठी असा शब्दप्रयोग वापरला गेल्याचा इतिहास नाही. कदाचित याचा उल्लेख ब्रिटनमध्ये झाला असावा असे मानले जाते. ऑस्ट्रेलियन वंशाच्या लोकांना गुन्हेगार ठरवून त्यांना शिक्षा देण्याचा पूर्वनिर्धारित न्याय म्हणून हा शब्दप्रयोग केला गेला, असे मानतात. अशा संदिग्ध शब्दाचा वापर करून न्यायाची प्रक्रिया सुरू होण्याआधीच त्यावर शंका उपस्थित करण्यामागचे नेमके राजकारण अनाकलनीय तर वाटतेच, पण त्यामागील राजकीय हेतूंविषयी देखील संदिग्धता असल्याने चव्हाण यांनी घाईघाईने ही प्रतिक्रिया का द्यावी याविषयी आश्चर्यदेखील वाटणे साहजिक आहे. देशाच्या सुरक्षिततेलाच आव्हान देणाऱ्या व देशात अस्थिरता माजवून अराजकसदृश स्थिती निर्माण करणाऱ्या एका विदेशी कटातील गुन्हेगारास न्याय मिळावा यासाठी एवढी काळजी व्यक्त करण्याऐवजी, गुन्हेगारास शिक्षा ठोठावण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे समाधान अधिक महत्त्वाचे व जखमी मनांना दिलासा देणारे ठरले असते.

तहव्वूर राणा याच्या पूर्वेतिहासाची पाने एव्हाना पुरेशी उलगडली गेली आहेत. तो भारताच्या दृष्टीने गुन्हेगारच आहे, यात शंका नाही याची आजवरच्या इतिहासावरून लोकांना खात्री पटली आहे. आता त्याच्या चौकशीतून अन्य काही कटांचे धागेदोरेही उघड होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दक्षिण भारतातील लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवादी कारवायांचे धागेदोरे त्याच्यापर्यंत पोहोचलेले असावेत, या शंकेवर अधिक प्रकाशझोत पडू शकेल. २५ जुलै २००८ रोजी बंगळुरूमध्ये घडविण्यात आलेली बॉम्बस्फोटांची मालिका, दक्षिण भारतातील लष्कर-ए-तोयबासाठी तरुणांची भरती, अशा काही बाबींमध्ये राणाचा सहभाग असल्याचेही उघड झाले आहे.

केवळ भारतातच नव्हे, तर अमेरिकेतही दहशतवादी कारवाया घडवून आणण्यात त्याचा पुढाकार होता आणि त्याच आरोपावरून त्याला अमेरिकेत २००९ मध्ये अटक झाल्यानंतर चौकशी सुरू झाली होती. आता केवळ न्यायव्यवस्थेची न्यायाची भूमिका बजावणे आणि न्यायालयात त्याच्यावरील आरोप सिद्ध करून त्यास दोषी ठरविणे व यासाठी त्याला योग्य अशी कोणतीही कठोर शिक्षा ठोठावणे ही न्यायिक प्रक्रिया प्रतीक्षित आहे. अशा टप्प्यावर राणाच्या हक्कांची काळजी वाहण्याआधी, कोणीही राजकारणापलीकडचे देशहित लक्षात घ्यावयास हवे, अशीच जनतेची भावना असणार यात शंका नाही. राजकारण चालविण्यासाठी, एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी राजकारणात अन्य अनेक मुद्दे दररोज सापडतच असतात. पण ज्या मुद्यांशी जनतेच्या भावना जोडलेल्या आहेत, जे मुद्दे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि त्यामुळे संवेदनशील ठरले आहेत, त्या मुद्यांचे राजकारण करून परस्परांवर कुरघोडीचे डाव खेळण्याचे राजकारण अनाकलनीय ठरते. व्यापक देशहिताच्या दृष्टीने अशी कोणतीही कारवाई अन्य कोणत्या देशात झाली असती, तर विरोधकांनी अशीच भूमिका घेतली असती का, असा विचार यामुळे जनतेच्या मनात बळावला, तर त्याविषयी आश्चर्य वाटणार नाही. गुन्हेगारांस शिक्षा होणार असे स्पष्ट होऊ लागले की अनेकांना त्यांच्या मानवाधिकारांच्या जाणिवा जाग्या होऊन अस्वस्थ वाटू लागते. अशा गुन्हेगारांच्या अमानवी कृत्यांमुळे किती निष्पापांचे मानवाधिकार, जगण्याचा मूलभूत अधिकार नाहक हिरावून घेतला जातो, याचा विचार अशा अस्वस्थ मानास शिवत असेल किंवा नाही, अशी शंका वाटणे साहजिकही असते. तसे अनेकदा व्यक्तदेखील होते. जेव्हा मानवाधिकारासाठी असे लढे सुरू होतात, तेव्हा असे फक्त भारतातच होते असेल का, हाच विचार कोणाच्याही मनात येऊ शकतो, एवढेच!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### जालियनवाला बाग हत्याकांड स्मृतिदिन



जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल १९१९ रोजी घडले. या हत्याकांडाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यावर खूप मोठा परिणाम झाला. क्रांतीची आग आणखी भडकली. मार्च १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने रौलट ॲक्ट पारित केला. या कायद्यामुळे देशद्रोहाचा आरोप असलेल्या कुठल्याही व्यक्तीला, कोणतीही चौकशी न करता, कोणताही खटला न चालवता तुरुंगात टाकण्याचा अधिकार पोलिसांना मिळाला. त्यामुळे या कायद्याविरोधात देशभरात असंतोषाची लाट उसळली. प्रखर विरोध होऊ लागला होता. एप्रिलमध्ये अमृतसर येथे या कायद्याविरोधात ठिकठिकाणी आंदोलने झालीत. सत्यपाल आणि डॉ. सैफुद्दीन हे या आंदोलनाचे नेते होते. त्यांना अटक करण्यात आली आणि या अटकेचा निषेध म्हणून १५ ते २० हजार लोक शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी जालियनवाला बाग येथे जमले होते. व्यासपीठावर भाषणे सुरू होती आणि अचानक ब्रिगेडियर जनरल डायर तिथे आपल्या फौज-फाट्यासह पोहोचला. क्षणाचाही विलंब न करता, कुठलीही सूचना न देता पोलिसांना त्याने गोळीबाराचा आदेश दिला. अचानक गोळीबार झाल्याने पाहून तिथे प्रचंड गोंधळ उडाला. लोक सैरभैर पळू लागले. पण पोलिसांनी बागेतून बाहेर जायचा रस्ताच बंद करून ठेवला होता. काही लोक भिंतीवर चढत होते. त्यांनाही गोळ्या मारल्या. शेवटी कुठलाच मार्ग नाही म्हणून लोकांनी (ज्यामध्ये स्त्रिया, मुलं, पुरुष, अपंग, वृद्ध होते) बागेतल्या विहिरीत उड्या घेतल्या. पण त्या निर्दयी, हृदयशून्य, क्रूर जनरल डायरने इथेही गोळ्या मारायला सांगितलं. वरून पोलिस गोळीबार करीत होते आणि विहिरीत लोक तडफडून मरत होते. तब्बल दहा मिनिटे सगळीकडे रक्तपात, मृत्यूचे तांडव चालू होते. सर्वत्र आरोळ्या, किंकाळ्या, रक्ताच्या चिरकांड्या आणि बंदुकीचे आवाज आसमंतात घुमत होते. सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले होते. काहीच कुणाला दिसत नव्हते. जो तो प्राण वाचविण्याच्या आकांताने पळत होता. जेव्हा पोलिसांच्या बंदुकीतील गोळ्या संपल्या तेव्हाच गोळीबार थांबला. एवढ्या सैतानालाही लाज वाटावी असा नरसंहार त्या क्रूर डायरने जालियनवाला बागेत घडवला. ब्रिटिशांची आकडेवारी ४०० ते ५०० लोकच यात मेली असे सांगते. पण प्रत्यक्षात हजारच्या वर लोक मरण पावले आणि ५००० पेक्षा जास्त लोक जखमी झालेत. त्यांना कुठलीही वैद्यकीय मदत मिळाली नाही. यामुळे संपूर्ण देशात ब्रिटिशांविरुद्ध संतापाची लाट उसळली. ज्या वेगाने तो राक्षस आला त्याच वेगाने नरसंहार करून निघून गेला.

मागे ठेवून गेला फक्त आकांत. बागेत प्रेतांचा खच पडला होता. एवढं करूनही जनरल डायरचे समाधान झाले नाही तर त्याने संपूर्ण शहराची वीज आणि पाणी बंद केले. ब्रिटिश सरकारने या साऱ्या प्रकरणाची दखलच घेतली नाही. उलट त्याला क्लीन चिट दिली आणि त्याला भारतात काम करण्यापासून मनाई केली. अशा या जनरल डायरचा आजारपणामुळे १९२७ मध्ये इंग्लंडमध्ये मृत्यू झाला. याचा बदला म्हणून २१ वर्षांनंतर उधमसिंग याने सर मायकल ओ डायर याला गोळ्या घालून ठार केले. कारण सर मायकल ओ डायरने जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन केले होते. ब्रिटिश साम्राज्यातील एक काळा अध्याय म्हणून या हत्याकांडाची इतिहासात नोंद झाली.

**माधवी पत्की**/नागपूर

### काँग्रेसला मुस्लिमांचे हित नकोच

बहुचर्चित वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक लोकसभेच्या मंजुरी पाठोपाठ राज्यसभेतही मंजूर झाले. त्यानंतर राष्ट्रपतींनी त्याला मंजुरी दिली आणि सरकारने अधिसूचना जाहीर करून हा कायदा अमलातही आला. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बरोबरच अल्पसंख्यक खात्याचे मंत्री किरेन रिजिजू, गृहमंत्री अमित शाह आणि एकूणच मोदी सरकारने महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

या विधेयकामुळे गरीब, वंचित, पीडित मुस्लिमांना सन्मानाने जगण्याचा एक नवीन मार्ग मिळाला आहे. त्यांना राष्ट्रीय प्रवाहापासून सातत्याने दूर ठेवणाऱ्या सरंजामशाही वृत्तीला लगाम बसला आहे. विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीमध्ये सक्रिय योगदान देण्याची संधी त्यांना मिळणार आहे. मुख्य म्हणजे त्यांना स्वयंविकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. वक्फ बोर्ड आता भ्रष्टाचाऱ्यांच्या हातून निघून इतर संस्थांप्रमाणेच संविधानानुसार चालणारी संस्था बनणार आहे. वक्फ बोर्डाच्या अमर्यादित अधिकारांचा गैरवापर करून आपले उखळ पांढरे करून घेणाऱ्यांना अर्थातच चौकशीला सामोरेही जावे लागेल. एवढी प्रचंड मालमत्ता असूनही वक्फ बोर्ड अपेक्षित कार्य का करू शकले नाही, त्यांचे वार्षिक उत्पन्न दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात का घसरले, या मालमत्तेतून मिळणारा पैसा कोणाच्या खिशात गेला याचाही जवाब संबंधितांना द्यावाच लागेल.

या विधेयकामुळे मुस्लिमांच्या मालमत्ता लुटल्या जातील, मशिदी बंद होतील, मुस्लिमांना नमाज पढणे अशक्य होईल, त्यांच्या धार्मिक अधिकारांचा अधिक्षेप होईल असा सर्रास खोटा आणि सर्वसामान्य मुस्लिमांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न काँग्रेसचे आणि इतर पक्षांचे नेते करीत आहेत. काँग्रेस पक्षाला मुस्लिमांचा विकास नको आहे. हिंदू- मुस्लिम समाजामध्ये सतत तणाव निर्माण करायचा, त्यांना राष्ट्रीय प्रवाहात येऊच द्यायचे नाही, ब्रिटिशांचे फोडा आणि झोडा धोरण वापरून, मुस्लिमांचा केवळ एक मतपेढी म्हणून वापर करायचा आणि सत्ता भोगायची ही काँग्रेसची परंपरा आहे. मुस्लिमांनीही ती ओळखली आहे. सबका साथ, सबका विकास साधण्यासाठीच मोदी सरकारने ही कायदादुरुस्ती केली आहे हे मुस्लिमांच्याही लक्षात आले आहे. काहीही असले तरी एकूणच या विधेयकामुळे अल्पसंख्यकांसह समस्त देशवासीयांसाठी एक नवीन सकाळ येऊन ठेपली आहे. मुस्लिमांच्या विकासामध्ये झारीत बसलेल्या शुक्राचार्यांना लगाम घालून, सबका साथ, सबका विकास, धोरणाने चालणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्याच्यासाठी प्रगतीची, विकासाची अनेक द्वारे उघडी केली आहे. राष्ट्र सर्वोपरी मानणाऱ्या सर्व देशवासीयांना या विधेयकाच्या मंजुरीमुळे समाधान लाभले आहे. आता या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण आव्हान मोदी सरकारपुढे आहे. पण अनेक आव्हानांचा सहज सामना केलेल्या मोदी सरकारला ते अशक्य नाही, हेही स्पष्ट आहे. मोदी सरकारचे या ऐतिहासिक कार्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### 'मूल्य' जपणारे वर्तमानपत्र!

सकाळच्या पायी फेरफटका मारताना दोन पेपर विक्रीचे स्टॉल लागतात. त्या दोन्ही स्टॉलवर तरुण भारत उपलब्ध असतात. रविवारची संख्या जरा जास्त असते. मला ते पाहून फार आनंद होतो. आई-वडील, शाळा यानंतर संस्काराची पेरणी कोणी करत असेल तर ते घरचा पेपर. त्या बाबतीत लहानपणापासून तरुण भारत वाचणारी घरे खरोखरच श्रीमंत. आता तर या श्रीमंतीत अजून भर पडली आहे. आधी मधलं पान जबरदस्त वजनदार राहत होतं. आता दुसरेही पान त्याच तोडीचं झालं आहे. त्यातील विविधता लक्ष वेधणारी आहे. महिला आघाडीने तर बरेच ठिकाणी कब्जाच केला आहे. सहज आणि सुंदर लिहिणारी तर सगळ्या लेखिका. लेखांचे विषयही वेगवेगळे आणि सुटसुटीत वाटतात. बालांच्या कविता, पक्ष्यांची दुनिया, मोठ्या माणसांनाही अजून आनंद देऊन जाते. निसर्गाशी जुळून असलेली असणारी माणसाची नाळ यासाठी कारणीभूत असावी. विचारपुष्प माणसाला विचार करून कार्य करण्यास प्रवृत्त करते. सकारात्मक ऊर्जेचे महत्त्व जर का पाहायचं असेल तरुण भारत वाचायलाच हवा. भारतात गोहत्या बंदी असावी का? असे बुद्धिभेद करणारे लिखाण कधीही कोणी तरुण भारतात पाहिले नाही. फक्त चांगल्या गोष्टींची पाठराखण. साहित्य, संस्कृती, अर्थकारण, जगाचा मागोवा, अनंत विषय सहज वाचायला मिळतात. सध्या करण्यात आलेले नवीन बदल स्वागतयोग्य आहेत. पृष्ठसंख्या वाढली असली तरी मूल्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही, ही आनंदाची बाब आहे. नियमित वाचनात येणारे वेध सदर पर्यावरण विषयक जागृतीबाबत भरपूर सहकार्य करत. पर्यावरण विषय चितेच्या पलीकडे चाललेला आहे. संघानेही पर्यावरण आपल्या आयामात घेऊन त्यावर कार्य सुरू केले आहे. तरुण भारतचे शताब्दी वर्ष आणि श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात बीज संकलनाचे घेतलेले कार्य मौलिक आहे. बदल मीच घडवणार! हा एक मौलिक विचार आहे. या विचाराला माझ्या या वजनदार वृत्तपत्राची साथ सगळ्यांना महत्त्वाची राहील यात कुणालाच काही शंका नाही.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

### भारतीय बाजारपेठेतील मंदी घालविण्यामागे हिंदूंचे योगदान



हिंदू धर्मीय व्यक्तींच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या विविध धार्मिक कार्यक्रमामुळे, हिंदू सण उत्सवांमुळे, देवीदेवतांच्या मंदिर निर्माण कार्यामुळे, पूजाविधी व हिंदू पर्यटनस्थळ बघणे यासाठी कराव्या लागणारी खरेदी-विक्री तसेच पर्यटन यामुळे होणाऱ्या रोजगार निर्मितीने भारतीय बाजारपेठ बाराही महिने हसमुख स्थितीत, गर्दीने हाऊसफुल्ल अशी नेहमी बघायला मिळते. हे अनेक वर्षांपासून असेच सुरू आहे. यापुढेही दरवर्षी असेच सुरू राहणार. यात काहीही फरक पडणार नाही. भारतीय बाजारपेठ हसमुख ठेवण्यात हिंदू धर्मीयांचे फार मोठे योगदान आहे. आता हिंदू धर्मीय सण, उत्सवांमुळे भारतीय बाजारपेठेत काय काय घडते, रोजगार निर्मिती होऊन सर्व जाती-धर्मांच्या लोकांना रोजगार कसा मिळतो हे सविस्तरपणे बघूया.

हिंदू धर्मात दरवर्षी गुढीपाडवा, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, अक्षय्यतृतीया, वटपौर्णिमा, आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा रक्षाबंधन, मंगळागौरी, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, पोळा, हरितालिका, श्रीगणेशचतुर्थी, महालक्ष्मी, ऋषिपंचमी, अनंत चतुर्दशी, पितृपक्ष श्राद्ध, घटस्थापना, नवरात्रोत्सव, दसरा, कोजागरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, दीपावली, भाऊबीज, श्रीदत्त जयंती, मकरसंक्रांती, श्रीगणेश जयंती, महाशिवरात्री हे सर्व सण, उत्सव येतात तसेच दर तीन वर्षांनी अधिकमास पुरुषोत्तम मास येतो.अधिक मासामध्ये भगवान श्रीविष्णूंची भक्ती केली जाते. तेकीला-जावयाला धोंडे जेवण दिले जाते. या महिन्यात दानधर्म केला जातो. सासरवाडीकडून जावयाला कपड्यांचा अहेर केला जातो त्याच बरोबर सोन्याचे चांदीचे धोंडे दानात देतात. याबरोबरच राष्ट्रीय सण, साधुसंतांच्या, महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करण्याचे कार्यक्रम होतात.

चैत्र महिन्यात पहिला सण गुढीपाडवा येतो. यावेळी बाजारपेठेत हिंदू धर्मीय लोकांची भरपूर गर्दी बघायला मिळते. साडेतीन मुहूर्तापैकी गुढीपाडवा हा एक मुहूर्त असल्याने हिंदू व्यक्ती या दिवशी सोनाराच्या दुकानातून सोनं खरेदी करतात. गुढीपाडव्यासाठी बांबूची काठी, साडी पीस, स्टीलचा किंवा तांब्याचा गडवा, आंब्याचे पानासह देठवाला आंबा, कडुलिंबाच्या पानांचा एक फांटा, थरसोड, गाठी, फुलांचा हार फुलं, प्रसाद, किराणा दुकानांतील वस्तू, भाजीपाला इत्यादी बाजारपेठेतून विकत घेतात. यामुळे बाजारपेठेत पैशांचे चलनवलन होते. सर्व जाती धर्माच्या लोकांना रोजगार मिळतो. या वस्तू विकत घेण्यासाठी हिंदू धर्मीय व्यक्ती पायी, स्वत:च्या सायकलने, मोटारसायकलने, चारचाकी वाहनाने, रिक्षाने, ऑटोने जातात. त्यासाठी स्वत:च्या वाहनात पेट्रोल किंवा डिझेल भरावे लागते तसेच बसने, रेल्वेने, रिक्षाने, ऑटोने प्रवास केल्यास प्रवास भाडे द्यावे लागते. यासाठी पैशांचे व्यवहार होतात.

गुढीपाडव्यापासून सुरू झालेले सण, उत्सव यामुळे अशीच लगबग वर्षभर बाजारात सुरू असते. या काळात सर्वत्र उत्साही वातावरण असते. मिरवणुका, शोभायात्रा निघतात. तेथेही कार्यक्रमांची रेलचेल असते. लहान व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात पैसे मिळतात.

संपूर्ण भारतात हिंदू देवीदेवतांची अनेक मंदिरे व पर्यटनस्थळे आहेत. या मंदिरातील देवीदेवतांच्या दर्शनासाठी बाराही महिने देशोदेश हिंदू भाविक पायी, आपल्या सायकलने, मोटारसायकलने, रेल्वेने, विमानाने, रिक्षाने, ऑटोने जातात. तिथे गेल्यावर स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. यामुळे भारतीय बाजारपेठेत कधीही मंदी राहात नाही आणि सर्व जाती, धर्मातील लोकांना रोजगार मिळण्यात हिंदूंचे भरीव योगदान आहे, हे मात्र नक्की.

**अशोक अनंतराव पंडित**/९९२२२३६७७३

### कुणाच्या खांद्यावर?

एक सुशिक्षित तरुण स्त्री, तिचे लग्न होते. अर्थातच लग्नानंतर मूल होणं हे गृहीतच धरलेलं असतं आणि तेच हवं असतं. तिला नेमका बीजांडकोषाचा कॅन्सर होतो. तिचं दुर्दैव म्हणा किंवा तिच्या कुटुंबाचे नशीब म्हणा ती बरी होते. परंतु तिला, तिच्या कुटुंबाला डॉक्टर सांगतात की, हिला मूल होणं म्हणजे जिवाला धोका होऊ शकतो. तेव्हा गर्भधारणा टाळलेली बरी. दत्तक घ्यावे.

पण हे तिच्या घरच्यांना, तिला स्वतःला पटणंच अशक्य असतं. ज्ञान नाही. तज्ज्ञांचा सल्ला ऐकायचा कशाला? मूल हवं ना? मग अनेक मार्ग उपलब्ध आहेत. टेस्ट ट्युब बेबी सेंटर्स आहेत. भरपूर पैसे टाकले की झालं. डॉक्टरही लाखो आहेत. आम्हाला बाई स्वत:चंच मूल हवं बरं का!

मग खरं न बोलता, रिपोर्ट हरवलेले आहेत असं सांगून टेस्ट ट्युब बेबीचा घाट घातला जातो. आणि कर्मधर्म दुर्दैवाने तो प्रयत्न यशस्वी होतो. ९ महिने निघणे मात्र कठीण होते. सातव्याच महिन्यात त्रास व्हायला लागतो. रक्तदाब वाढतो. वार खालच्या बाजूला बसते आणि टेस्ट ट्युब बेबीचे दान जुळ्या मुलांचे पडते.

जिथे कॅन्सरचे ऑपरेशन झालेले तिथे कसं जायचं? रागवतील आपल्याला म्हणून ७ महिन्यांपर्यंत दुसरीकडे इलाज केला जातो. दुखणं सुरू झाल्यावर मात्र जुन्या दवाखान्याची आठवण येते. तिथेच पूर्वी ५० टक्के कमी खर्चात कॅन्सरचे ऑपरेशन झालेले असते. म्हणून कदाचित.

तिथे गेल्यावर सातव्या महिन्यातील जुळी मुलं, वजन कमी असणार, त्यांना आयसीयूत ठेवावे लागू शकणार, खर्च वाढणार आणि तो अंदाजे १०-२० लाखांपर्यंत जाऊ शकतो असे सांगण्यात येते. पैसे नाहीत म्हटल्यावर 'जेवढे भरू शकतात तेवढे तर भरा' म्हटल्यावरही वादविवाद, वेळकाढूपणा, इकडे तिकडे फोनाफोनी झाल्यावर, पैसे न भरता ४-५ तासांनी ही बाई तिचे कुटुंब कोणाला न सांगता दवाखान्यातून पलायन करतात. ससूनमध्ये गेल्यावर सोय पटत नसल्याने दुसऱ्या खाजगी दवाखान्यात नेतात. संध्याकाळी तिथेही ॲडमिट करून, दुसऱ्या दिवशी सकाळी ९-९.३० ला सिझेरियन करण्यात येते. बाईचा रक्तस्राव जीवघेणा होतो. मग तशाच अवस्थेत मोठ्या मणिपाल हॉस्पिटलमध्ये नेले जाते. तिथे ती आधीच आपली जीवनयात्रा संपवून पोहोचलेली असते.

अरेरे! अरेरे!! बिच्चारी स्त्री.

या सगळ्या घटनांनंतर दोष आणि ठपका ठेवला जातो- जिथून पळून गेले असतात ती बाई -नातेवाईक त्यांना मारेकरी म्हटले जाते, अमानुष म्हटले जाते. धमक्या दिल्या जातात. टीव्ही आणि वृत्तपत्रे पण सर्व रंगवून वाढेल ते बोलू लागतात. राजकारण घुसतं सगळीकडे.

शांततेने विचार करा- बाईचा मृत्यू होण्यात दोष कुणाचा?

१) या आई-वडिलांच्या मूर्ख अट्टहासाचा? (कसंही करून आपलं मूल हवंच)

२) टेस्ट ट्युब बेबी केंद्र इंदिरा आयव्हीएफचा? वाढेल तेवढे पैसे देऊन 'बघू करून' देणाऱ्या चढाओढीत पुढ जाणाऱ्यांचा?

३) ज्या दवाखान्यात सत्य परिस्थितीचे कटू कथन करण्यात आले त्या (दीनानाथ) येथील डॉक्टरांचा? पेशंट पळून (अबस्केंड) झाल्याची पोलिसांना खबर न देणाऱ्यांचा?

४) सूर्या हॉस्पिटलमध्ये ज्यांनी रात्री सिझेरियन न करता सकाळी (इलेक्टिव्ह) सिझेरियन करून रक्तस्राव थांबवू न शकले त्यांचा?

५) मणिपाल हॉस्पिटलमध्ये अत्यवस्थ अवस्थेत आलेल्या स्त्रीला पोस्टमॉर्टमही न करता डिस्पोज ऑफ करणाऱ्यांचा?

कुणाच्या खांद्यावर या मृत्यूचे ओझे लादायचे सांगा?

चर्वितचर्वण, लाथाळाथी, हाणामारी, ठपके, दोषारोप, मुलाखती, कमिट्या नेमून चर्चा हे सर्व इथपर्यंत की दीनानाथ हॉस्पिटलला जागाच द्यायला नको होती, म्हणेपर्यंत मजल जाते? आतापर्यंत आणि आताही या मृत्यूचा दोष दीनानाथ हॉस्पिटलचा आहे का? सूर्या हॉस्पिटलबद्दल एकही शब्द बोलला नाही कुणी. ही सगळी चिखलफेक करून जीव परत येणार आहे? शेळी जाते जिवानिशी... 'निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य' ही यंदाच्या झालेल्या जागतिक आरोग्य दिनाची थीम नुसती कोरडीच आहे का?

**डॉ. संजीवनी केळकर**/एम. एस.

### आर्थिक तफावत खरोखरच चिंतेची बाब

दि. १२ एप्रिलच्या तरुण भारत वाचक पत्रात 'हा खेळ लुटमारीचा ' या पत्राद्वारे अमोल करकरे यांनी योग्य मुद्दे मांडले आहेत. आपल्या देशात निवडणुका जिंकण्यासाठी सगळेच राजकीय पक्ष मोफतचे राजकारण करण्यात पटाईत आहेत. कसेही करून सत्तेवर राहणे हा एककलमी कार्यक्रम. पुढे सत्तेवर आल्यानंतर सरकारी तिजोरीवर येणारा आर्थिक भार सांभाळताना कसरत करावी लागते आणि पुन्हा कर्ज. कर्जाची परतफेड, व्याज, सरकारी कर्मचारी, पेन्शनभोगी याचाच वार्षिक आर्थिक भार राज्यावर सुमारे ६० टक्के आहे असे तज्ज्ञ सांगतात. आपल्या देशाची विकासाकडे उत्तम घोडदौड सुरू असली तरी समाजात आर्थिक उत्पन्नाची दरी रुंदावतच आहे. सरकारी नोकर किंवा पेन्शनभोगी नसणाऱ्या वर्गाची संख्या खचितच प्रचंड आहे.

या उलट सरकारी वेतन, पेन्शन, वेळोवेळी पगारवाढ, महागाई भत्ते मिळणारा वर्ग कमी असला तरी आर्थिकदृष्ट्या समाधानकारक दिसतो. सरकारी पेन्शनभोगी अलिकडे महिन्याला पन्नास ते साठ हजारपर्यंतही उत्पन्न असणारे दिसतात. अर्थात या बाबतीत इतरांनी बोटे मोडण्याची आवश्यकता नाही. कारण सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीतील सेवा शर्तीनुसारच हा लाभ मिळतो असेही सांगणारा एक वर्ग. दुसरीकडे इतर सेवानिवृत्तांना बँकेत गुंतवणूक केलेल्या ठेवींवरील व्याज किंवा इतर गुंतवणुकीतील उत्पन्नाद्वारे (जे कमीही होत असते) आपला गाडा हाकावा लागतो. या आर्थिक तफावतीवर कोणाकडेही उपाय नसल्याचे सध्या तरी चित्र आहे. त्यामुळे या वर्गाने निवडणुकीतील जुमलेबाजी, न पेलणारी आश्वासने मुकाट्याने बघत राहावे आणि ज्येष्ठांनी आनंदमय, ताणविरहित जीवन कसे जगावे या समाजमाध्यमांद्वारे येणारे उपदेशपर संदेश, चित्रफिती पाहून आपली दिनचर्या चालवावी हेच बरे.

**राम राजे**/९४२११७९९४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे...



### भगवान महावीर जयंतीनिमित्त अनाथ मुला-मुलींना कपडे वाटप

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

भगवान महावीर यांच्या २६२४ व्या जन्म कल्याणक महोत्सव निमित्ताने आस्था रोटी बँकेतर्फे अनाथ मुलांना नवीन कपडे व सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या पेशंट व नातेवाईकांना मिष्टान्न भोजन तसेच दोन गरजू मुलींना त्यांच्या लग्नकार्यासाठी लागणारे साहित्य वाटप करण्यात आले. ६० अनाथ मुला मुलींना नवीन कपडे वाटप करण्यात आले. आस्था रोटी बँकेतर्फे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये असलेल्या आजारी रुग्ण व त्यांच्यासोबत नातेवाईक यांना आंब्याचा रस, पुरणपोळी मसाला भाताचे जेवण दिले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुनील शरणार्थी, राजेश लाहोटी, कामिनी गांधी, सुवर्णा कटारे, अंकित झंवर, विजय करवा, रामराव रहाणे, सुलभा राहणे, अक्षरा गांधी, राजू तुगावकर, खराडे, आस्था रोटी बँकेचे सदस्य छाया गंगणे, संपदा जोशी, श्रद्धा अध्यापक, स्नेहा मेहता, अनिता तालीकोटी, सुरेखा पाटील, राहुल कुरकुट, अरिहंत छंचुरे व आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष विजय छंचुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन सुवर्ण कटारे यांनी केले तर आभार छाया गंगणे यांनी मानले.



### रमाई बहुउद्देशीय संस्थेच्या शिबिरात १०१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रमाई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी १०१ जणांनी रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी आरपीआय महाराष्ट्र प्रदेश माजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे, शहर संघटक सचिव सुशील सरवदे, माजी मध्यवर्ती अध्यक्ष शिवम सोनकांबळे, ॲड. राजकुमार म्हात्रे, समीर शेख, सोमनाथ काटकर, आकाश मुदगल, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन कांबळे, उत्सव अध्यक्ष अजय झिंगाडे, उपाध्यक्ष अभिजीत चव्हाण उपस्थित होते.



### अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या शहर अध्यक्षपदी बालाजी गेजगे

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या शहर जिल्ह्याच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बालाजी गेजगे यांची शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली. प्रास्ताविक माजी शहराध्यक्ष सचिन गुळग यांनी केले. नूतन पदाधिकारी पुढीलप्रमाणे : जिल्हा कार्याध्यक्ष सचिन गुळग, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर आयवळे, शहर कार्याध्यक्ष बबन आयवळे, सवि भारत हत्तीकट्टी, सल्लागार समिती सदस्य सुभाष भडगे, मस्तान ढोबळे, नूतन ॲड. चेतन केंगार यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंग गेजगे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी नंदकुमार केंगार, रणजित ऐवळे, हैदर केंगार, मधुकर भंडगे, दीपक आयवळे, सुनील ढोबळे, सतीश केंगार, तुकाराम पारशे, सविता आयवळे, श्रीराम गेजगे, अगत तोरणे, शशिकांत हेगडे, पप्पू गुळीक, रमेश आयवळे, अंकुश आयवळे, रोहित आयवळे, अजय गेजगे, गोवर्धन तोरणे उपस्थित होते. आभार श्रीराम गेजगे यांनी मानले.



### जिजामाता प्रशालेत फुले यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

कोंडी (ता. उत्तर सोलापूर)येथील जिजामाता प्रशालेत क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी जयश्री देशपांडे, सहशिक्षिका सुनिता वणगे, सहशिक्षक लक्ष्मण आगलावे, सारंग पाटील, विजयकुमार लांडगे, कैलाश देशमुख, शिक्षकेतर कर्मचारी दत्तात्रय माने, संतोष कासे, विद्यार्थी प्रतिनिधी स्वाती शिंदे, अतुल वाघमारे, स्नेहल शिंदे, ऋतुराज भोसले उपस्थित होते.

### विडी घरकुल येथील पार्किंग जागेवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

कुंभारी येथील गोदूताई परुळेकर विडी घरकुल येथे दुकान गाळ्या समोरील पार्किंगच्या जागेवर असलेले पत्राशेडचे अतिक्रमण तक्रार करूनही हटविण्यात यावे, अशी मागणी गोविंद चनमल यांनी केली आहे. तक्रारदार यांच्या गाळ्यालगत असलेल्या दुसऱ्या दुकानदाराने त्यांच्या दुकानाबाहेर पार्किंगच्या जागेत बेकायदेशीररित्या पत्रा शेड मारले आहे. या अतिक्रमणमुळे आजूबाजूचे दुकाने इतरांना दिसत नाही. त्याचा फटका बसत आहे.हे अतिक्रमण काढण्यात यावे यासाठी कुंभारी ग्रामपंचायतकडे तक्रार केली. ग्रामसेवकाने दोन नोटीस बजावल्या मात्र अतिक्रमण कायम आहे. तरी हे अतिक्रमण काढण्यात यावे, अशी मागणी केली आहे. यावेळी रवींद्र तवंडी उपस्थित होते.

# शहर प्रारूप विकास आराखडा हरकतींवर मंगळवारपासून पेठनिहाय सुनावणी

## नागरिकांकडून ३३७५ सूचना हरकती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

पुढील २० वर्षासाठीच्या शहर प्रारूप विकास आराखड्यावर महापालिकेकडे प्राप्त झालेल्या ३३७५ तक्रारी, सूचना, हरकती यावर चार सदस्यांच्या समितीकडून दि. १५ एप्रिल पासून ते दि. २३ मे २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम निर्णय मे अखेर होऊन जूनमध्ये शासनाच्या मंजुरीनंतर शहर विकास आराखडा जाहीर करण्यात येणार आहे.

शहराची प्रारूप विकास योजना मुक्त अधिनियमाचे एमआर अँड टीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६ (१) अन्वय प्रसिद्ध झाल्यानंतर विहित कालावधीत जनतेकडून प्राप्त सूचना व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी मुक्त अधिनियमाचे कलम २८ (२) अन्वय सोलापूर महापालिकेने शासनाने नेमणूक केलेल्या सदस्यांच्या नियोजन समितीचे दि. ११ एप्रिल २०२५ पासून गठन केले आहे.

दि. १५ एप्रिल रोजी दहिटणे, शेळगी, टीपी- १, रविवार पेठ, दि. १६ एप्रिल रोजी देगाव, केगाव, बाळे, शिवाजीनगर, बसवेश्वर नगर, दि. १७ एप्रिल रोजी सोरेगाव, प्रताप नगर, नेहरूनगर, कुमठे, सलगरवाडी, रामवाडी, दि. २८ एप्रिल रोजी न्यू पाच्छापेठ, तेलंगी पाच्छापेठ, साखरपेठ, जोडभावी पेठ, गुरुवार पेठ, बेगम पेठ, मुस्लिम पाच्छापेठ, गणेश पेठ, मंगळवार पेठ, दि. २९ एप्रिल रोजी रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी, दि. ३० एप्रिल रोजी टीपी- ४, लक्ष्मी पेठ, मुरारजी पेठ, सिद्धेश्वर पेठ, टीपी- २, दि. २० मे रोजी शनिवार पेठ, दक्षिण कसबा, बुधवार पेठ, गोल्डफिंच पेठ, गावठाण, शुक्रवार पेठ, भवानी पेठ, विजापूर रोड, दि. २१ मे रोजी मजरेवाडी, दि. २२ मे रोजी कसबे सोलापूर आणि दि. २३ मे रोजी राहिलेले इतर सर्व पेठ आणि भागांच्या सुनावण्या घेण्यात येणार आहे. या नियोजनाप्रमाणे त्या त्या विभाग आणि पेठ निहाय परिसरातील तक्रारदार हरकतदार आणि दावेदार यांना सुनावणीसाठी हजर राहण्याच्या नोटिसा देण्यात येत आहेत. सुनावणी संबंधित नागरिकांनी त्यांच्या सूचना व हरकती बाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहेत.

पहिला विकास आराखडा बॉम्बे टाऊन प्लॅनिंग ॲक्टनुसार १३ ऑगस्ट १९५८ , महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार दुसरा आराखडा २३.२३ हा १६ जानेवारी १९७८ , १ जुलै १९७९ रोजी हद्दवाढ झालेल्या २.३० चौरस किलोमीटर क्षेत्राची पहिली विकास योजना १० जून १९८५ , १ एप्रिल १९८९ रोजी हद्दवाढीतील समाविष्ट झालेल्या सलगरवाडी क्षेत्र ७.५० हेक्टर व ५ मे १९९२ रोजी हद्द वाढ झालेल्या नेहरूनगर मजरेवाडी आदी १३ गावांचे क्षेत्र १४५.५४ चौरस किलोमीटर क्षेत्रासह संपूर्ण १७८.५७ चौरस किलोमीटर क्षेत्राचा विकास आराखडा २८ ऑक्टोबर २००४ रोजी, जुळे सोलापूर भाग एक व दोन चे म्हाडा कडून महापालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर दोन्ही क्षेत्राचा विकास आराखडा ३ डिसेंबर २०१६ रोजी झाला.

आत्ताची विकास योजना ही महापालिकेच्या संपूर्ण क्षेत्राची असून त्यामध्ये आतापर्यंतच्या सर्व हद्दवाढीचे क्षेत्र व म्हाडाकडील क्षेत्र यांच्यासह आहे. चालू प्रारूप विकास आराखडा २ नोव्हेंबर २०२२ रोजी इरादा जाहीर केला व १२ ते १८ जानेवारी २०२३ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी सोलापूर महापालिका आयुक्त यांच्याकडे विद्यमान जमीन वापर नकाशा हस्तांतर करण्यात आला. महापालिकेने २६ डिसेंबर २०२४ रोजी प्रारूप विकास आराखडा नागरिकांच्या सूचना व हरकतीसाठी २ ते ८ जानेवारी २०२५ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केला. आता हरकती व सूचनांच्या सुनावणीचे नियोजन करण्यात आले आहे.



# दुचाकी चोरास अटक; ४ गुन्हे उघडकीस

## शहर गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दुचाकी चोरास अटक करून त्याच्याकडून चोरीच्या ४ दुचाकी जप्त केल्या.

मच्छींद्र उर्फ बापू गोरख गायकवाड (वय ३२ वर्षे, रा. न्यु धोंडीबा वस्ती, रामवाडी, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून सदर बझार पोलिस ठाण्यातील तीन व एमआयडीसी पोलिस ठाण्यातील एक गुन्हा उघडकीस आला आहे.

शहर गुन्हे शाखेचे पथक गस्त करीत असताना त्यांना एक इसम चोरीची मोटार सायकल घेऊन न्यु धोंडीबा वस्ती, रामवाडी हॉस्पीटल रोड आतमध्ये बोळात थांबला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पोलसांनी बातमीप्रमाणे मच्छिंद्र गायकवाड यास ताब्यात घेऊन त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने, त्याच्या घरासमोर लावलेल्या चोरीच्या ४ मोटार सायकली काढुन दिल्या. त्या मोटार सायकल बाबत, त्याच्याकडे चौकशी केली असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक २०२४ या वेळी रात्री एम्प्लायमेंट चौक सोलापूर येथुन १, रेल्वे स्टेशन पार्कंग येथुन १, फॉरेस्ट रेल्वे लाईन येथुन १, पारशी विहीर कुमठा नाका येथुन ०१ अशा एकुण ४ मोटार सायकल चोरी केल्या असल्याचे सांगितले.

सदरची कामगिरी पोलिस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त डॉ. दीपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड यांनी केली.



# मनपा शिक्षण मंडळात फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक सुरेश कासार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंढे, रजनी राऊळ, महेश वालावलकर सारंगा , अंजीखाने, अविनाश शिंदे, रियाज आतार, अमोल गायकवाड, गुरुप्रसाद तलवार, सचिन जाधवर, रूपाली कंची, प्रभा चव्हाण, सायली ढोले, भालचंद्र साखरे, नर्सिंग चिप्पा, नासिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी यांचा ड्रायव्हर असल्याचे सांगून सोनारास गंडविले

## अडीच वर्षे कारावास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

जिल्हाधिकारी साहेबांच्या गाडीचा ड्रायव्हर असल्याची बतावणी करुन सोलापूर येथील सोनारास गंडविणाऱ्या आरोपीस प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डी जी कंखरे यांनी अडीच वर्षे कारावास आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

शेख बाबू शेख छोटुमियाँ (वय ४०, रा. रशिद टेकडी, नई आबादी, भोकर, जि. नांदेड) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत जुना विजापूर नाका येथील निहाल ज्वेलर्सचे मालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ऑगस्ट २०२३ मध्ये निहाल ज्वेलर्सच्या मालकास एका इसमाने तो कलेक्टर साहेबांच्या गाडीचा ड्रायव्हर असल्याचे ८ सोन्याच्या अंगठ्या ३७.६३ ग्रॅम वजनाच्या व ३ सोन्याचे लॉकेट २९.४८ ग्रॅम वजनाचे असे एकूण ६७.११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने बनविण्यास कलेक्टर साहेबांनी सांगितले आहे असे सांगितले. तसेच सदरचे दागिने बनवुन परत कलेक्टर ऑफिस येथील पी. ए. च्या रुम येथे घेवुन जावुन, फिर्यादीस बाहेर थांबवुन, आतमध्ये जावुन कलेक्टर साहेबांच्या पी.ए. पासुन फिर्यादीस हात करुन, तसेच पी.ए.ला सुध्दा फिर्यादीस हात करावयास लावुन वरीलप्रमाणे ६७.११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेतले. तसेच सदरच्या अंगठ्या घेवुन परत पी.ए.च्या रुममध्ये गेला. तेथे काहीवेळ थांबुन तो बाहेर आला व निहाल ज्वेलर्सचे मालकास तुम्हाला कॉफी आणतो असे सांगुन तेथून बाहेर निघुन गेला. यावरुन सदर इसमाने फसविल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय पाटील,पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख व पथकातील कर्मचाऱ्यांनी शेख बाबु शेख छोटुमिया यास ताब्यात घेवुन त्याच्याकडून गुन्हयात चोरी केलेले ६७.११ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.या खटल्याची सुनावणी न्यायदंडाधिकारी डी. जी. कंखरे यांच्यासमोर झाली. गुन्हा केल्याचे शाबीत झाल्याने न्यायालयाने आरोपीस अडीच वर्षे सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकारी पक्षातर्फे ॲड. श्रीमती मांजरे यांनी काम पाहिले आहे. कोर्ट पैरवी म्हणून महिला कर्मचारी काटकर, पोलिस शिपाई जाधव यांनी काम पाहिले.

# कुमठ्यात भगवंताच्या जयघोषात भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

कुमठे येथील अतिशय क्षेत्र १८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्या वतीने जगाला आयुष्यचा मार्ग दाखवणारे भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव मोठ्या भक्तीमय व मंगलमय वातावरणात पार पडला.




सकाळी भगवंतास महावीर करण्यात आला. तसेच सायंकाळी भगवान महावीरांच्या तैलचित्राची व पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत बहुसंख्य श्रावक-श्राविका उपस्थित होत्या. महावीर भगवान की जय, अहिंसा प्रमोद धर्म की जय, सिद्धांत शास्त्र की जय, विश्वधर्म की जय अशा घोषणांनी कुमठा परिसर भक्तीमय झाला होता तर पंखीडा या गीताच्या तालावर महिलांनी नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

या कार्यक्रमास गांधी नाथा रंगजी विद्यालयाचे संजय गांधी, शेठ रावजी सखाराम महाविद्यालयाचे अनुप शहा, आदिनाथ दिगंबर जैन मंदिरचे अजित शहा, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉक्टर सरिता कोठाडिया, उद्योजक रविकिरण मैंदर्गी, मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील उपाध्यक्ष नितीन कासार, सचिव वालचंद पाटील, मंजुषा मैंदर्गी, जैन कासार मंदिर समितीचे बाबुराव तंगा, अरुण धुमाळ, नंदकुमार कंगळे, अभिनंदन विभुते यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी रविकिरण मैंदर्गे आणि परिवारांनी कुमठे मंदिरास चंद्रप्रभूंची प्रतिमा भेट केली आणि त्याच प्रतिमेचे भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच वैभव पाटील यांनी मंदिराच्या शिखरावर बसविण्यासाठी १५ फुटी पितळी ध्वज तिला तर ज्येष्ठ नागरिक संघाने सांस्कृतिक भवनचे बांधकाम चालू असून त्या बांधकामास मदत केली. भगवान महावीरांच्या मातेचा मान मंजुषा मैंदर्गी यांना देण्यात आला तर अत्याचा मान पूजा पानपट व दीपिका गोपालकर यांना देण्यात आला होता. यावेळी भगवंताचा पाळणा महिलांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. येणाऱ्या सर्व श्रावणकांची अल्पोपहाराची व्यवस्था नितीन कासार यांनी केली होती. तर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन प्रथमेश कासार व पंडित अक्षय शहा यांनी केले.

मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील यांनी आभार मानले.



# काँग्रेस कमिटीमध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने, स्त्री शिक्षणाचे जनक, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त सुपर मार्केट संभाजीराव शिंदे शाळा समोर येथील त्यांच्या पुतळ्यास सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन भाऊ नरोटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी म. प्र. सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, तिरुपती परकीपंडला, भीमाशंकर टेकाळे, युवराज जाधव, लखन गायकवाड, परशुराम सतारेवाले, नागेश म्हेत्रे, सागर उबाळे, नूर अहमद नालवार, गिरिधर थोरात, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, सुमन जाधव, कोंडणताई काकडे, ज्योती गायकवाड, शिवाजी साळुंखे, रेखा बिनेकर, संदेशा गायकवाड, शोभा बोबे, मुमताज तांबोळी, विवेक कन्ना, सायबा शेख, अप्पा सलगर, शुभांगी लिंगराज, चंद्रकला निजमल्लू, श्रीकांत दासरी, अभिलाष अच्युगटला, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्य सरकारने जनतेच्या डोळ्यात केली धूळफेक

## महागाई आणि शेतकरी प्रश्नावरून हर्षवर्धन पाटील यांनी सरकारला घेरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने त्यांच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे वचन दिले होते. परंतु निवडणुकीनंतर एक हाती सत्ता प्राप्त होताच महायुतीच्या सरकारला आपल्या वचननाम्याचा विसर पडला असून आता तर त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीपासून पळ काढला आहे. वेगवेगळी कारणे सांगून लाडक्या बहिणींनाही त्यांनी दूर केले आहे, अशी टीका माजी सहकारमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे निरीक्षक हर्षवर्धन पाटील यांनी राज्यातील महायुती सरकारवर केली. शुक्रवारी, डफरीन चौकातील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर व ग्रामीण पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन केल्यानंतर पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना विविध मुद्यांवरून सरकारवर टीकेची झोड उठविली. या बैठकीला पक्षाचे निरीक्षक आमदार शशिकांत शिंदे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजित पाटील, उत्तम जानकर, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, भारत जाधव, माजी महापौर ॲड.यू.एन.बेरिया, मनोहर सपाटे, जनार्दन कारमपुरी, अनिल सावंत, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार उपस्थित होते.

राज्य सरकारचे मंत्री विविध विषयावरुन उलटसुलट मुद्दे उपस्थित करून जनतेत तेढ निर्माण करीत आहेत. खरे तर राज्यातील जनता महागाई, बेरोजगारीला वैतागली असून या विषयावर बोलण्याऐवजी सरकारमधील मंत्री वेगळ्याच विषयावर बोलून मूळ मुद्याला बगल देत आहेत. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी तर शेतकरी कर्जमाफीच्या विषयावरून शेतकऱ्यांचा अवमान केला आहे. याशिवाय या सरकारशी संबंधित असलेले कुणीही उठते आणि इतिहासाची मोडतोड करून आपापल्या सोयीप्रमाणे इतिहास सांगून तेढ निर्माण केला जात आहे. ही पध्दत समाजाला घातक असून सरकारने याविषयी मार्गदर्शक तत्वे जाहीर करावीत. इतिहासाचा अभ्यास असणाऱ्यांनीच बोलावे असे नियम करावेत, म्हणजे काहीही बोलण्याच्या अपप्रवृत्तीला आळा बसेल, असेही पाटील म्हणाले.

पक्षाच्या बैठकीत विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाबद्दल चिंतन करून कारणे शोधण्यात आली. तसेच पक्षबांधणीच्या दृष्टीने पुढील व्यूहरचना करण्यात आली असल्याचे सांगून पाटील यांनी सरकारच्या कारभारावर टीका केली.

स्वभावावर सरकार चालत नाही तर ते घटनेप्रमाणे चालवावे लागते. निवडणुकीपूर्वीच्या जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीण आदी विविध योजना जाहीर करण्यात आल्या. परंतु सत्तेवर आल्यानंतर या योजनांच्या अंमलबजावणी विषयी सरकारने ठोस निर्णय घेतला नाही.

आता वेगवेगळी कारणे सांगून लाडक्या बहिणींनी योजनेतून बाहेर काढले जात आहे. राज्यात वीज, पाणी टंचाईचा प्रश्न जटील बनला आहे. मजुरांना काम नाही, गॅस सिलेंडरच्या दरवाढीनंतर महागाई गगनाला भिडली आहे. जनतेला याचा प्रचंड त्रास होत असल्याचे पाटील यांनी सांगितले.यावेळी आमदार शशिकांत शिंदे यांनीही पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

### मानापमान नाट्य

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या बैठकीत मान सन्मानावरून नाराजी नाट्य घडले. पक्षाचे शहर कार्याध्यक्ष तौफिक शेख यांना बसण्यासाठी खुर्ची दिली नसल्याने ते पदाधिकाऱ्यांवर चांगलेच संतापले होते. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांत ताळमेळ, एकी नसल्याचा आरोप करून शेख हे बैठकीतून निघून गेले.

## पाहिजेत

८ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अग्निपंख बहुउद्देशीय संस्था संचलित ट्रॉय पब्लिक इंग्लिश मेडीयम स्कूल, हत्तूर येथे खालील पदे भरावयाची आहेत.

| पद | संख्या | पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| शिक्षक | ३ | Ded.Bed. | २ वर्षाचा अनुभव आवश्यक |

* महिला उमेदवारास प्राधान्य
* उमेदवाराने अर्जासह प्रत्यक्ष भेटावे.
* गुरुवार दि.१७/४/२०२५ रोजी वेळ सकाळी ९ ते १

पत्ता - ट्रॉय पब्लीक स्कूल, हत्तूर, ता. दक्षिण सोलापूर
मो. नं. ९४२२००२७०१

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जागतिक बिलियर्ड्स स्पर्धेत पंकज अडवाणीला रौप्यपदक



**नवी दिल्ली** : भारताचा सर्वात सन्मानित स्कूनर-बिलियर्डपटू पंकज अडवाणीला जागतिक मॅचप्ले बिलियर्ड्स स्पर्धेत रौप्यपदकाचा मान मिळाला. अंतिम सामन्यात पंकजला डेव्हिड कॉसियरकडून पराभव पत्करावा लागला. १५ डावाच्या सर्वोत्तम सामन्यात दोन्ही खेळाडूंनी जोरदार झुंज दिली पण ब्रिटनच्या खेळाडूने निर्णायक गुण मिळवत ८-७ असा विजय मिळवला. डेव्हिडने ८-७ (१९-१००, ०-१००, १००-४७, १००-५२, १९-१००, १००-०, ४९-१००, १००-३, ३४-१००, ४-१००, १००-८५, ३१-१००, १००-५३, १००-४३, १००-२८) असा विजय संपादन केला.अडवाणी आता रविवारपासून येथे २०१६ पासून जिंकत असलेल्या आयबीएसएफ वर्ल्ड बिलियर्ड्स जेतेपदाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतील. आगामी जागतिक अजिंक्यपद स्पर्धा वेळेनुसार आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेत जगभरातील खेळाडूंकडून मोठे ब्रेक अपेक्षित आहेत.

# लखनौची गुजरात टायटन्सवर मात

### एडन मार्कराम, निकोलस पूरनची अर्धशतके ● शुभमन गिल, साई सुदर्शनची अर्धशतके व्यर्थ

◆ **लखनौ, १२ एप्रिल**

एकाना आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर अटीतटीच्या आयपीएल सामन्यात एडन मार्कराम (५८) व निकोलस पूरनच्या (६१) अर्धशतकांच्या बळावर लखनौ सुपर जायण्ट्सने गुजरात टायटन्सवर ३ चेंडू शिलक ठेवत ६ गड्यांनी दणदणीत विजय संपादन केला. गुजरातचा कर्णधार शुभमन गिल व सलामीवीर साई सुदर्शनची अर्धशतकी खेळी व्यर्थ ठरली. या विजयाबरोबरच ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ संघाने ८ गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली, तर गुजरातची (८ गुण) दुसऱ्या स्थानावर घसरण झाली. दिल्ली कॅपिटल्सने सरस धावगतीच्या आधारावर अव्वल स्थान गाठले.

गुजरात टायटन्सने २० षटकांत ६ बद १८० धावा काढल्या. दिल्ली कॅपिटल्सने १९.३ षटकांत ४ बाद १८६ धावा काढून विजय खेचून आणला.

लखनौ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून गुजरात जायण्ट्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. साई सुदर्शन व कर्णधार शुभमन गिलने आपापली अर्धशतकी खेळी करत गुजरातसाठी १२० धावांची सलामी भागीदारी केली. आवेश खानने मार्करामकडून गिलला झेलबाद करत ही सलामी जोडी फोडली. शुभमन गिलने ३८ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारसह ६० धावांची आकर्षक खेळी केली. पुढे साई सुदर्शन रवि बिश्नोईच्या गोलंदाजीला बळी पडला. साई सुदर्शनने ३७ चेंडूंत ७ चौकार व एका षट्कारसह ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर शेर्फन रदरफोर्ड (२२), जोस बटलर (१६), मोहम्मद शाहरूख खानने (नाबाद ११) लखनौच्या गोलंदाजांचा सामना करत आपल्या गुजरात टायटन्सला २० षटकांत ६ बाद १८० धावांचा टप्पा गाठून दिला.



सामनावीर मार्कराम, धावा ५८, चेंडू ३१, चौकार ९, षट्कार १



निकोलस पूरन, धावा ६१, चेंडू ३४, चौकार १, षट्कार ७

लखनौकडून शार्दुल ठाकूर व रवी बिश्नोईने प्रत्येकी २ बळी, तर दिग्वेश राठी व आवेश खानने प्रत्येकी एक बळी टिपला. विजयासाठी १८१ धावांचा पाठलाग करताना लखनौच्या एडन मार्कराम व कर्णधार ऋषभ पंतने दमदार फलंदाजी करत ६.२ षटकांत ६५ धावांची सलामी भागीदारी केली. पंतने प्रसिद्ध कृष्णाच्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरकडे झेल सोपविला. पंतने १८ चेंडूंत ४ चौकारांसह २१ धावांचे योगदान दिले. पुढे एडन मार्करामने निकोलस पूरनच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व दुसऱ्या गड्यासाठी ५८ धावांची भागीदारी केली.

यावेळी एडन मार्करामही प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीला बळी पडला. मार्करामने ३१ चेंडूंत ५८ धावांची खेळी केली, यात त्याने तब्बल ९ चौकार व एक षट्कार खेचला. पुढे निकोलस पूरनने आयुष बदोनीच्या सहकार्याने १५.२ षटकांत ३ बाद १५५ धावांचा टप्पा गाठून देत संघाच्या विजाच्या आशा पल्लवीत केल्या. रशीद खानने निकोलस पूरनची घोडदौड थांबविली. निकोलसने अवघ्या ३४ चेंडूंत १ चौकार व ७ षट्कारांसह ६१ धावांची खेळी केली. पूरन बाद झाला, तेव्हा लखनौला विजयासाठी २८ चेंडूंत २६ धावा काढण्याची गरज होती. आयुष बदोनीने डेव्हिड मिलर (७) व अब्दुल सामदच्या (नाबाद २) नाबाद खेळी करत लखनौ सुपर जायण्टसच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. आयुष बदोनीने २० चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह नाबाद २८ धावांची खेळी केली. ◀(वृत्तसंस्था)

# दिल्ली कॅपिटल्सचे सलग पाचव्या विजयाचे लक्ष्य

### रोहितची फिरकीपुढे चाचणी

### के. एल. राहुल बुमराहच्या आव्हानासाठी सज्ज

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथील अरुण जेटली स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान सामना होणार आहे. मुंबईच्या फलंदाजांसमोर दिल्लीच्या प्रभावी फिरकीपटूंच्या त्रिकुटाचे आव्हान असेल, तर रोहित शर्मा या सामन्यात स्वतःला पुढे राखण्याचा प्रयत्न करेल.

रोहित सध्या फॉर्मसाठी संघर्ष करत असून मुंबई इंडियनसचे यश जसप्रीत बुमराहच्या प्रभावी माऱ्यावर अवलंबून असेल. बुमराह प्रतिस्पर्धी दिल्ली कॅपिटल्सचा सर्वोत्तम फलंदाज केएल राहुल व इतर फलंदाजासमोर आव्हान उभे करेल.

दिल्ली कॅपिटल्सने आतापर्यंत आपले चारपैकी चारही सामने जिंकत ८ गुणांसह सध्या दहा संघांच्या आयपीएल गुणतालिकेत दुसरे स्थान मिळविले असून आता ते सलग पाचवा विजय नोंदवण्यास उत्सुक असेल. तिकडे एकमेव योद्धा हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स सहा सामन्यांपैकी पाच पराभवांची लाजिरवाणी स्थिती टाळू इच्छित असेल.

आयपीएलमध्ये, केवळ एक पराभव गती वाढवू शकतो किंवा खंडित करू शकतो. गत आयपीएलमध्ये गुणतालिकेच्या तळाशी राहिल्यानंतर मुंबई इंडियन्स पुन्हा एकदा हंगामा अखेर तळाशी राहण्याच्या उंबरठ्यावर आहे.

रोहित शर्माला आपला सर्वतोपरी उत्तम खेळ करण्याची आवश्यकता आहे. आतापर्यंत खेळलेल्या चार सामन्यांमध्ये त्याने केवळ ३८ धावा केल्या आहेत, पण दिल्लीच्या आक्रमणाविरुद्ध हे करणे सोपे राहणार नाही. कर्णधार अक्षर पटेलच्या नेतृत्वाखाली दिल्ली संघात सर्वोत्तम कामगिरी करणारा फिरकी गोलंदाज कुलदीप यादव आहे व त्याला नवोदित विप्रज निगमची उत्तम साथ आहे.

ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकेल क्लार्कने आतापर्यंत स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाज आहे. कुलदीपने सर्व सामन्यांमध्ये आपला कोटा पूर्ण केला आहे, त्याने प्रति षटक सहा धावांपेक्षा कमी इकॉनॉमी रेटने ८ बळी टिपल्या आहेत. मुंबई इंडियन्ससाठी रोहित शर्मा, तिलक वर्मा आणि उपकर्णधार सूर्यकुमार यादव यांनीही उत्तम कामगिरी करणे अपेक्षित आहे. ◀(वृत्तसंस्था)

# स्पर्धेमुळे खिलाडूवृत्तीत वाढ : शिंदे

### क्रिकेट स्पर्धा उद्‌घाटन व विधीगंध पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

नामवंत विधीज्ञाच्या स्मृती जागविल्याने युवा पिढीला प्रेरणा मिळते. वकीलानी क्रिकेटमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, वकील सहसा खेळामध्ये भाग घेत नाहीत. कनिष्ठ व जेष्ठ वकील या निमित्ताने एकत्र येऊन खेळल्याने दोघांमध्ये खेळ भावना येण्यास मदत होते, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

शिवछत्रपती रंगभवन येथे माजी जिल्हा सरकारी वकील संतोष न्हावकर यांच्या संकल्पनेतून विधीगंध संस्था व सोलापूर बार असोसिएशन आयोजित टेनिस बॉल क्रिकेट चषक उदघाटन व नामवंत विधिज्ञाच्या स्मृतीप्रित्यर्थ विधीगंध पुरस्कार सोहळा पार पडला. विधीगंध चषक मध्ये जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील वकीलाचे २० संघ सहभागी झाले आहेत. क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन व विधीगंध पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते.



कै. तात्यासाहेब नेर्लेकर स्मृती विधीगंध पुरस्कार हा ॲड वसंतराव भादुले (पंढरपूर) याना त्यांनी आपल्या वकीलपदाच्या कार्यकाळात दिवाणी व फौजदारी क्षेत्रात भूमिका निभावल्याबद्दल देण्यात आला. कै ए. तू. माने यांच्या स्मृती प्रित्यर्थ विधीगंध पुरस्कार डी. एन. काळे (माळशिरस) यांना तर कै. ए. डी. ठोकडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ ॲड.बापू करंजकर यांना आपल्या वकिलीत केलेल्या अतुलनीय कार्या बद्दल पुरस्कार श्री. शिंदे यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. तसेच नूतन न्यायाधीश अनिता हवालदार व जेलर तसेच सर्व तालुका बारचे अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. नविन पिढीसमोर आदर्श निर्माण व्हावा म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ यांचा पुरस्कार सोहळा व खेळातून खिलाडूवृत्ती वाढावी यासाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असे प्रतिपादन ॲड. संतोष न्हावकर यांनी केले. तसेच त्यांनी कै. अशोक ठोकडे व कै. तात्यासाहेब नेर्लेकर यांच्या विविध आठवणी सांगून स्मृती जागवल्या. याप्रसंगी क्रिकेट स्पर्धेच्या टी शर्टचे अनावरण करणेत आले. सुशीलकुमार शिंदे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पहिल्या सामन्याचा टॉस करून स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले.

या प्रसंगी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. वी.पी. शिंदे, जेष्ठ वकील धनंजय माने, झहीर सगरी, मनोज पामुल, निदा सैफन, विनय कटारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा गव्हाणे यांनी केले. ॲड. मंजुनाथ ककलमेली यांनी आभार मानले.

# बंगळुरू, राजस्थान विजयासाठी उत्सुक

### सॉल्ट-कोहली वि. आर्चर जुगलबंदी रंगणार

◆ **जयपूर, १२ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर दुपारच्या सत्रात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व राजस्थान रॉयल्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. हे दोन्ही संघ आयपीएलमध्ये विजयाच्या मार्गावर परतण्यासाठी उत्सुक असल्यामुळे जोफ्रा आर्चरच्या वेगवान गोलंदाजीचा सामना करण्यासाठी आरसीबीचे सलामीवीर फिल सॉल्ट व विराट कोहली आक्रमक लढतीसाठी सज्ज होतील.

दोन्ही संघ पराभवातून सावध होऊन या सामन्यात उतरणार आहेत. गत सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून आरसीबी सहा गड्यांनी पराभूत झाला, तर गुजरात टायटन्सकडून राजस्थान रॉयल्सचा ५८ धावांनी पराभव झाला. पाच सामन्यांपैकी तीन विजयांसह बंगळुरू (६ गुण) गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे, तर पाच सामन्यांपैकी दोन विजयांसह राजस्थान (४ गुण) सातव्या क्रमांकावर आहे.



रजत पाटीदार



संजू सॅमसन

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने सामन्याला कलाटणी देण्यात यश मिळवले आहे. १४४ किमी प्रतितास वेगाने अथक गोलंदाजी करताना इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजाने प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजांना धक्का दिला. त्याने पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात २५ धावांत ३ बळींचा निर्णायक स्पेल दिला. फॉर्ममध्ये असलेल्या श्रेयस अय्यरच्या यष्टीला १४८.६ किमी प्रतितास वेगाने उडवून सामन्यात चमक आणली. त्याने या आठवड्याच्या सुरुवातीला गुजरात टायटन्सविरुद्ध १५२.३ किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी केली आणि कर्णधार शुभमन गिलला १४७.७ किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करताना तंबूत परत पाठवले.

आता बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात जोफ्रा आर्चरवर कोहली (१८६ धावा) व इंग्लंडचा सहकारी फिल सॉल्ट (१४३ धावा) यांच्याविरुद्ध महत्त्वपूर्ण गोलंदाजी करण्याची जबाबदारी असेल. ही जोडी काही षटकांतच सामना जिंकून देऊ शकते. त्यामुळे त्यांना रोखण्याची जबाबदारी आर्चरवर असेल. आर्चरला संदीप शर्मा, महेश थिक्षणा व युधवीर सिंग यांचीही साथ मिळणे अपेक्षित आहे. कारण या गोलंदाजांना धावसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे, त्याचा फायदा आरसीबीचे फलंदाज घेऊ शकतील.

कोहलीने या हंगामात दोन अर्धशतके झळकावली आहे. फिल सॉल्टसोबत कोहलीला नियंत्रित आक्रमकता दाखवण्याची संधी मिळाली आहे. देवदत्त पडिक्कल सुद्धा निराशाजनक पुनरागमनानंतर मोठी धावसंख्या उभारण्यास उत्सुक असेल. फॉर्मात असलेला आरसीबी कर्णधार रजत पाटीदार, टिम डेव्हिड आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांच्याकडूनही प्रभावी कामगिरीची आशा आहे. बंगळुरू संघ अजूनही पहिल्या आयपीएल जेतेपदाच्या शोधात असून त्यांच्याकडे जोश हेझलवूड व भुवनेश्वर कुमारसारखे मजबूत वेगवान गोलंदाजी आक्रमण आहे.

दुसरीकडे, राजस्थान रॉयल्स संघाला गुजरातविरुद्धच्या पराभवानंतर फलंदाजी पुनरुज्जीवनाची आशा असेल. राजस्थानकडे संजू सॅमसन, रियान पराग, यशस्वी जयस्वाल व नितीश राणा याचा समावेश असलेल्या मजबूत फलंदाजीचा विभाग आहेत. ध्रुव जुरेल व शिमरॉन हेटमायर या धडाकेबाज जोडी आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**राजस्थान रॉयल्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**मुंबई इंडियन्स वि. दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्‌सवर

### चेन्नई सुपर किंग्जचा आत्मविश्वास कमी : क्लार्क

**चेन्नई** : पाच वेळा आयपीएल विजेते चेन्नई सुपर किंग्ज या हंगामात संकुचित दृष्टिकोनाने खेळत असल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी झालेला दिसत आहे, असे मत ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार मायकेल क्लार्कने व्यक्त केले आहे. चेन्नईमध्ये आतापर्यंतचा सर्वात कमी धावसंख्या नोंदवल्यानंतर आणि शुक्रवारी कोलकाता नाईट रायडर्सकडून आठ गड्यांनी पराभव पत्करल्यानंतर आयपीएलच्या आतापर्यंतच्या सहा सामन्यांमध्ये सीएसकेला सलग पाचव्या पराभवाला सामोरे जावे लागले. सीएसकेला फलंदाजी करणे खूपच कठीण दिसत होते. सीएसकेने आपली योजनाही चुकीच्या पद्धतीने आखल्याचे दिसत आहे. ते फिरकीसह नवीन चेंडूचा सामना करताना अडखळत आहे, असे क्लार्क म्हणाले. ते ज्या पद्धतीने खेळत आहे, त्यावरून त्यांचा आत्मविश्वास कमी झालेला दिसत आहे, हे स्पष्ट आहे, असेही ते म्हणाले. सध्या, ते खूप रूढीवादी दृष्टिकोन असल्याचे दिसते, ते केवळ जिंकण्याच्या जवळ जाण्याचा किंवा मोठा पराभव टाळण्याचा प्रयत्न करत आहे. त्याऐवजी, त्यांनी सर्वकाही पणाला लावले पाहिजे, जोखीम उचलायला पाहिजे आणि सामना जिंकण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे ते म्हणाले.

### शुभमन गिलच्या २ हजार धावा पूर्ण

**लखनौ** : कर्णधार शुभमन गिल इंडियन प्रीमियर लीगमध्ये गुजरात टायटन्स फ्रॅन्चायझीसाठी २००० धावांचा टप्पा गाठणारा पहिला खेळाडू ठरला आहे. शनिवारी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध पहिल्या डावात ६० धावा काढताना त्याने ही कामगिरी केली. गिल २०२२ मध्ये नव्याने तयार झालेल्या फ्रॅन्चायझीमध्ये सहभागी झाला व त्याने फ्रॅन्चायझीसाठी ५१ सामने खेळले आहेत. २०२४ मध्ये हार्दिक पांड्याच्या निवृत्तीनंतर, गिलला कर्णधार नियुक्त करण्यात आले आणि आता तो संघाचा कर्णधार म्हणून दुसऱ्या हंगामात आहे. आतापर्यंत त्याने संघासाठी ४४.६० च्या सरासरीने आणि १४७.८९ च्या स्ट्राईक रेटने २००७ धावा केल्या आहेत.

# चेक अँड मेट चषक : खुल्या गटात श्रेयांस शहा विजेता

### ● विविध वयोगटात पृथा, प्रथम, नियान, ज्ञानदा, सान्वी, श्रेयस, साईराज व शशांक विजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

ॲड. कोमलताई अजय साळुंखे ढोबळे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री.बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीत केलेल्या 'चेक अँड मेट चषक' बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सोलापूरचा आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर श्रेयांस शहा याने आठ पैकी साडेसात गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. तसेच मंगळवेढ्याचा स्वप्निल हदगल व मानांकित विशाल पटवर्धन यांनी अनुक्रमे द्वितीय व तिसरा क्रमांक पटकाविला.

९ वर्षाखालील गटात मुलांमध्ये प्रथम मुदगी, रुद्र झाडे व मुलींमध्ये पृथा ठोंबरे, संस्कृती जाधव यांनी तर ७ वर्षाखालील गटात मुलांमध्ये नियान कंदीकटला, अजिंक्य कांबळे व मुलींमध्ये ज्ञानदा सांगुळे व तनवी बागेवाडी यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविले. ७ व ९ राज्यस्तरीय वर्षाखालील गटातील प्रथम आलेल्या दोन खेळाडुंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तसेच सर्वोत्तम मुलीमध्ये सान्वी गोरे तर श्रेयस कुदळे, साईराज बोडके, शशांक जमादार यांनी अनुक्रमे १६, १३ व ११ वर्षाखालील गटात अव्वल स्थान पटकाविले.

मातोश्री गिरीजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्राचार्य डॉ. वासंती पांढरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, प्रा. रेश्मा जाधव, प्रा. रेणुका कोळी, प्रा. वर्षा माने, रूपाली साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे तर त्यांना सहाय्यक म्हणून रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, यश इंगळे, भरत वडीशेरला, मंथन घोडके यांनी यशस्वीरीत्या काम पहिले.



विजेत्या खेळाडूंना आकर्षक 'चेक अँड मेट चषक', मेडल्स व रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. विजेत्या १०० खेळाडूंना एकूण रु. ४५ हजार रुपयाची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे प्रशांत पिसे, वरिष्ठ राष्ट्रीय पंच वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, जयश्री कोंडा, यश इंगळे यांनी यशस्वीरीत्या काम पाहिले.

**अंतिम निकाल (अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह):**
**खुला गट:** श्रेयांश शहा - ७.५, स्वप्नील हदगल - ६.५(४४), विशाल पटवर्धन - ६.५(४१), प्रज्वल कोरे - ६.५(३८.५), सागर पवार - ६.५(३५.५), सागर गांधी ६ (४०.५), पवन राठी - ६(३८.५), विजय पंगुडवाले - ६(३७), शंकर साळुंके - ५.५(३९), प्रसन्न जगदाळे - ५.५(३६), समीर शिंदे - ५.५(३४), चंद्रशेखर बसर्गीकर - ५.५(३४), नंदकुमार सूरु - ५(३५), चंद्रकांत पवार - ५(३४.५), सुनील पवार - ५(३२) **मुली:** सान्वी गोरे - ६(३४.५), सृष्टी गायकवाड - ६(३३.५), स्वराली हातवळणे - ५(३८), श्रावणी देवनपल्ली - ५(३२.५), सृष्टी मुसळे - ५(३१.५), दीक्षा कुलकर्णी - ५(२८), अनन्या उलभगत - ४.५, ऋतुपर्ण विजागत -४(२८), आदिती इनानी - ४(२८).

**१६ वर्षे:** श्रेयश कुदळे - ६.५, वेदांत मुसळे ६, हर्ष हळमल्ली - ५.५, अथर्व म्हमाने - ५(३५.५), वेद आगरकर - ५(३२.५), जय तुम्मा - ५(२९), अवधूत विरपे - ५(२८), पलाश उपाध्ये - ५(२५.५), विनायक स्वामी - ४.५(३३), अनय कुलकर्णी - ४.५(३१.५).

**१३ वर्षे:** साईराज घोडके - ६, श्रीराम राऊत - ५.५, गणेश बंदीछोडे - ५(३६), सार्थक राऊत - ५(३३.५), सहिष्णू आपटे - ५(३०.५), श्रेयश कंदीकटला - ४.५(३२.५), आयुष जानगवळी - ४.५(२८.५), कार्तिक भागवत - ४(३७.५), अधिराज म्हेत्रे - ४(३५), युवराज गायकवाड - ४(३३), ओम निरंजन - ५.५

**११ वर्षे:** शशांक जमादार - ५(३७), श्रेयश इंगळे- ५(३४), श्लोक चौधरी - ५(२८.५), वेदांत पांडेकर- ४.५(३६), विहान कोंगारी - ४.५(३४), विहान आरकाल- ४.५(३१), प्रतीक हलमल्ली - ४(३४), देवदत्त पटवर्धन - ४(३३.५), आयुष गायकवाड - ४(२९.५), रुद्र बाबर - ४(२७) .

**९ वर्षे मुले:** प्रथम मुदगी - ४.५(१६.५), रुद्र झाडे- ४.५(१५), हिमांशू व्हनगावडे - ४(१३.५), नैतिक होटकर - ४(१२.५), मयंक पोतदार - ४(११.५), हर्ष मुसळे- ४(११), पार्थ भांगे - ३(१५.५), आदित्य जानगवळी - ३(१२.५), प्रज्ञांश काबरा - ३(१२), नमन रंगरेज - ३(१२). **मुली:** पृथा ठोंबरे ४, संस्कृती जाधव - ३(९), अन्वी बिटला - ३(८), उत्कर्षा लोखंडे - ३(८), समृद्धी कसबे - २(९), तेजस्विनी कांबळे - २(८), पलक मेसे - २(७), साईशा ठेंगील- २(६), सावी जाजू - २(५), रोशनी हाके - २(५) **७ वर्षे मुले:** नियान कंदीकटला ५, अजिंक्य कांबळे - ४(१४.५), लखित काबरा - ४(१२.५), ऋषांक कंदी - ३(१५), अर्जुन सातारकर - ३(१३), अद्विक ठोंबरे - ३(१२.५), ओजस पवार - ३(११), आरुष लामकाने - ३(१०.५), आरुष माने - २.५(१२.५), आयान राठी - २.५(११.५). **मुली:** ज्ञानदा सांगुळे ३, तन्वी बागेवाडी - २(५), ईशा पटवर्धन - २(४), श्रीजा जांभळे - १(५), श्रुतिका मैतराणी- ४. **उत्तेजनार्थ बक्षिसे:** जीवन गड्डम, अनय कुमार, वैष्णवी घंटे, मानवी चौगुले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### श्रीक्षेत्र तीर्थ येथील रामलिंगेश्वर यात्रा सोमवारपासून

**सोलापूर,दि.१२ एप्रिल-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द. सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रा सोमवार दि. १४ एप्रिल पासून प्रारंभ होत आहे. सोमवारी पहाटे भाविक आपापल्या घरापासून नवस फेडण्यासाठी श्री रामलिंगेश्वर मंदिरापर्यंत दंडवत घालतात. सकाळी सात वाजता श्रीची पालखी मिरवणूक, नंदिध्वज मिरवणूक, आणि गूळ खोबरे प्रसाद वाटप उपक्रम होईल. सायंकाळी पाच वाजता राजेंद्र जाधव यांनी संपूर्ण महाप्रसाद सेवा श्री चरणी समर्पित केली आहे. रात्री १० वाजता पौराणिक कन्नड बैलाट होणार आहे. मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील तुळजाराम वाघमोडे यांनी महाप्रसाद सेवेसाठी ७५ हजार रुपये देणगी श्री रामलिंगेश्वर पंच कमिटीस अर्पण केली आहे. मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी श्री रामलिंगेश्वर मूर्तीस रुद्राभिषेक व तैलाभिषेक, संपूर्ण गावात नंदिध्वज मिरवणूक, सकाळी ११ वाजल्यापासून कन्नड मधून कलगी तुऱ्याची गाणी, सायंकाळी ५ वाजता सोलापूर येथील भाविक श्री सिद्धाराम राचोटी यांनी श्री चरणी महाप्रसाद सेवा समर्पित केली आहे. रात्री १० वाजता कन्नड नाटक होणार आहे.बुधवार दि.१६ एप्रिल रोजी पहाटे श्रीच्या मूर्तीस रुद्राभिषेक व तैलाभिषेक, दिवसभर कलगी तुऱ्याची गाणी, चार वाजता कै. धानप्पा फताटे स्मृती ढाल कुस्ती व श्री रामलिंगेश्वर पंच कमिटीच्या वतीने जंगी मल्लांच्या कुस्त्या, सायंकाळी सहा वाजता ॲड. विक्रांत फताटे यांनी महाप्रसाद सेवा श्री चरणी समर्पित केली आहे. सायंकाळी आठ वाजता श्रीची पालखी मिरवणूक, शोभेचे दारूकाम, नंदिध्वज मिरवणूक भजन गायन, होणार आहे. रात्री १० वाजता कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. देवस्थान पंच कमिटी सदस्य विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे, अहमद मुल्ला, करबसप्पा पाटील, सिद्धाराम उदंडे, डॉ. सुभाष गुरव यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने नियोजन केले आहे. यात्रेतील विविध उपक्रमाचा महाप्रसादाचा, श्री दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा समिती समन्वयक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले आहे.



### करकंब येथे हनुमान जयंती निमित्त भजन व महाप्रसाद

**करकंब ,दि.१२ एप्रिल-**

चैत्र पौर्णिमा हनुमान जयंती उत्सव करकंब परिसरात मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.सुवर्ण गार्डन मंगल कार्यालय येथील हनुमान मंदीरात सकाळी सेवानिवृत्त डीवायएसपी रघुनाथ जाधव यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.यावेळी श्री.भजलिंग महाराज भजनी मंडळाचे भजन,आरती होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी बाळासाहेब वास्ते,प्रभाकर ठोंबरे,खंडू परदेशी,बिभिषण माने,भागवत पिसे, बंडू राऊत,प्रभाकर महामुनी,दत्ता वास्ते,मोहन कांबळे इत्यादी उपस्थित होते.थोरल्या वेशीतील मारुती मंदिरात सखाराम देशपांडे यांचे पोथी वाचन व त्यानंतर आरती करण्यात आली.बुधवार पेठ,श्री.भजलिंग महाराज मंदिर,सोमवार पेठ,काळा मारुती,शुक्रवार पेठ,खारे वस्ती, इंदिरानगर,सिद्धनाथ मंदिर इत्यादी ठिकाणी हनुमान जयंती मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

### हर हर महादेवाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**सदाशिवनगर,दि.१२ एप्रिल-**

फटाक्यांच्या आतषबाजीत व सवाद्य मिरवणुकीने, हर हर महादेवाच्या जयघोषात कावडी उत्सवाची आज सांगता झाली. शिखर



शिंगणापूरच्या यात्रेसाठी कावडी जाण्याची परंपरा शेकडो वर्षाची आहे. महादेव थोरात, नारायण थोरात, शशिकांत बोराटे, नामदेव कुंभार, विजय भोकपडे, सुभाष कोळी, कुमार कोळी यांच्या कावडी खडतर अश्या मुंगी घाटातून जातात. तर रखमाजी जंगले, काशिनाथ शिंदे, तानाजी पिसे या रस्त्याने जातात. तर शिवाजी वाघमोडे, रामभाऊ सिद, गोरख शिंदे यांच्या कावडी नातेपुते येथील पर्वतेश्वर मंदिरात विवाह सोहळ्यासाठी जातात. एकादशी दिवशी या पैकी काही कावडी कोथळ्याला मुक्कामाला गेल्या व दुस-या दिवशी द्वादशीला मुंगी घाटातून दुपारी शिंगणापूर येथे प्रवेश करून महादेवास धार घातली. मुक्कामानंतर तेरशीला महादेवाला धार घालून परत आल्या. काही कावडी वाहनातून शिंगणापूरला नेण्यात आल्या होत्या. आज हनुमान जयंती दिवशी या कावडी उत्सवाची सांगता असल्याने अनेक कावडी मालकांनी कावडी समोर फटाक्याची आतषबाजी केली. सवाद्य मिरवणूक काढून देवाला धार घातली. हा कावडी नाचवनेचा सोहळा पाहण्यासाठी सर्व रस्ते फुलले होते. तर फटाक्याच्या आतषबाजीने आकाश उजळले होते.

## निधन वृत्त...



### सुवर्णलक्ष्मी सोमशेट्टी

**सोलापूर, दि. १२ एप्रिल**

सुवर्णलक्ष्मी पुरुषोत्तम सोमशेट्टी (वय ८०) यांचे शनिवार ११ एप्रिल रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले व नातवंडे असा परिवार आहे, आर्य वैश्य कोमटी समाज सोलापूरचे माजी अध्यक्ष महेंद्र पुरुषोत्तम सोमशेट्टी यांच्या मातोश्री होत्या.



### स्नेहलता विद्वत

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

स्नेहलता कल्याण विद्वत (वय ६५) यांचे शुक्रवार सांयकाळी ७ वाजता ह्रदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे त्यांचे पती, दीर पत्रकार श्रीराम व जगदीश विद्वत, मुलगा,सुन ,नातवंडे असा परिवार आहे. शनिवारी सकाळी कुर्डूवाडी रोड परंडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गौडगाव मंदिरावर मुस्लीम भक्ताकडून हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी

**● हनुमान जन्मोत्सवानिमित्त निसार शेख यांची आगळीवेगळी भक्ती**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १२ एप्रिल**

रामभक्त हनुमान की जय, पवनसुत हनुमानजी की जय, जय बजरंगबली की जय, अशा घोषणांसह मंत्रघोष अन सूर्योदयावेळी फटाक्यांच्या अतिषबाजीत मंदिरावर हेलिकॉप्टरद्वारे गुलाब पुष्पवृष्टी करीत गौडगांव (ता. अक्कलकोट) येथील प्रसिद्ध मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे ही पुष्पवृष्टी निसार शेख या मुस्लीम भक्ताकडून करण्यात आल्याने विशेष कौतुक होत आहे.

श्री जागृत मारूती मंदीरात हनुमान जन्मोत्सव निमित्त मारूतीस पहाटे तीन वाजता अभिषेकाला प्रारंभ झाला. यावेळी रूद्राभिषेक, नवग्रह होम हवन, महाभिषेक व महाआरतीचा विधी पार पडला. पहाटे पासुनच मंदीरात भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ६ वाजता मारूतीचा जन्मोत्सव पाळणा कार्यक्रम झाला. सकाळी ८ वाजता मानाची पालखी मिरवणूक विविध वाद्य वृंदासह पार पडली. यावेळी श्रीच्या दर्शनासाठी भक्तांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. सकाळी ९ वाजता हेलिकॉप्टरने मंदिरावर प्रदक्षिणा घालून गुलाब पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी राज्यभरातुन आलेल्या लाखो भाविकांनी शांततेत श्रीचे दर्शन घेतले. हजारो भक्तांनी हनुमान चालीसा, मंत्रमंठण केले. अन्नछत्र मंडळात निसार शेख, नागनाथ दूसा, योगेश कोनापुरे, सचिन सूर्यवंशी, गजानन पवार, दिनेश अग्रवाल, यांच्यावतीने महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. हजारो



> अकरा शनीपौर्णिमा, शनिवार व हनुमान जयंती एकाच दिवशी आल्याने मारूतीचे दर्शन घेतल्याने मनोकामना पुर्ण होते अशी भक्तांची श्रध्दा आहे. आजही या मंदीरात अकरा मंगळवार, शनिवार पाळत असल्याने या जागृत मंदीराला विशेष महत्व प्राप्त झाले. मनोकामना पूर्ण होण्यासाठी नवस मागणाऱ्या भक्तांनी हनुमान जन्मोत्सव निमित्त आपले नवस फेडले.

भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. सकाळ पासून सुरू झालेली भाविकांची गर्दी रात्री पर्यंत कायम होती. यावेळी अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महेश स्वामी यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच सोलापूर ब्लड बँक यांच्याकडून रक्तदान शिबिरचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ६० जणांनी रक्तदान केले. यावेळी मंदिर समितीचे सिद्राम वाघमोडे,प्रकाश मेंथे, सिद्धराम फुलारी,चौडप्पा सोलापुरे,बिराप्पा पुजारी, शांतया स्वामी, परमेश्वर सुतार, प्रकाश सनकळ, भारत ननावरे, श्रीशैल कुंभार, आमसिद्ध कोरे, श्रीमंत सवळतोट, श्रीमंत म्हेत्रे, मल्लिनाथ मेत्रे, मल्लिनाथ पाटील, मल्लिनाथ शेरीकर, हाजीमलंग माने, विश्वनाथ वाघमोडे, शिवानंद सोलापूरे, शरणपा बमदे, रमेश वाघे, नागुतळवार व हनुमान भक्त निसार शेख व त्यांचे परिवार आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमास गौडगांव ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.



## वटवृक्ष देवस्थान समितीमध्ये शिवसेनेचे देशमुख यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ एप्रिल-**

अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीमध्ये शिवसेना ग्रंथालय सेलचे राज्य अध्यक्ष बी. जी. देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. शुक्रवार दि. ११ एप्रिल रोजी त्यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात येऊन सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते त्यांचा कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच मराठवाडा विभागीय अध्यक्ष दीपक गिरी यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. बी.जी. देशमुख यांनी श्री स्वामी समर्थ महाराजाच्यां दर्शनामुळे मन शांती मिळते. संकटातून मुक्ती मिळते. असे श्री. देशमुख यांनी सत्कारा प्रसंगी सांगितले.

याप्रसंगी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवसेना ग्रंथालय सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष देविदास राठोड, सेलचे पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी, पत्रकार स्वामीराव गायकवाड, पत्रकार राजेश जगताप, श्रीशैल गवंडी, संजय पवार, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, रुषी लोणारी आदीसह कर्मचारी, सेवेकरी उपस्थित होते.



## 'मल्लीकार्जुन महाराज की जय'च्या जयघोषात नंदीध्वज मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट,दि.१२ एप्रिल-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवात हजारो भाविकांच्या हर हर महादेव मल्लीकार्जुन महाराज की जय च्या जयघोषात नंदीध्वज मिरवणूकीसह शोभेच्या दारु आताषबाजीने आसमंत दुमदुमला.

शनिवारी सकाळी अभिषेक दुपारी मानाच्या भव्य नंदीध्वज काट्यां ची . भव्य मिरवणूक काढण्यात आली .

नंदीध्वज काट्यांच्या मिरवणूक मार्गावर विविध संघटना व समाजाकडून पेंडखजूर, सुगंधी दूध, लाडू, वाटप करण्यात आले.


ग्रामदैवत मल्लिकार्जुन यात्रेतील मानांच्या काट्यांच्या मानकरी रत्नाकर पाटील, दयानंद रोडगे, शशिकांत लिंबूतोटे, संजयकुमार आडवीतोटे, मल्लिनाथ नंदीकोले यांनी आपापल्या काठ्यांना महाकाल हर हर महादेव ब्रम्हांडनायक महांकाल असे विविध सजावटी करून गावातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली या मार्गावर योगा ग्रुपच्या वतीने उपस्थित शिवभक्तांना पेंडखोजरीचा वाटप करण्यात आले. या ग्रुपचे अध्यक्ष राजकुमार उमराणीकर कल्याणी पाटील अशोक कलशेट्टी विश्वनाथ देवरमणी राजकुमार गोबर विश्वनाथ करकी श्रीकांत झिपरे गोपीनाथ पाटील, प्रदीप हिंडोळे सुनील गोरे शिवाप्पा रामपुरे नागेश ताडमारे प्रकाश कोळी वासुदेव देसाई संतोष माडेकर शशिकांत बिदरकोटी अशोक चव्हाण, प्रितिष किलजे यांच्यासह आदी उपस्थित होते. मल्लीकार्जुन यात्रा उत्सवात नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी अमोलराजे भोसले प्रथमेश इंगळे राजशेखर हिप्परगी काशीनाथ गोळळे बसवराज माशाळे पडनुरे विद्याधर गुरव बसलिंग खेडगी ड हर्डीकर ड मंगरुळे महेश हिंडोळे बिडवे रोडगे कापसे आदिसह भाविक मोठ्या संखेने उपस्थित होते.याप्रसंगी उत्सव शांततेत काढण्यासाठी देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंगया स्वामी विश्वस्त बसवराज माशाळे महेश हिंडोळे स्वामीनाथ हिप्परगी राजकुमार नागोरे मल्लिनाथ माळी यांनी परिश्रम घेतले.

## 'भृगुकल्पवल्ली' मंत्रपठण पुस्तकाचे आज होणार प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

येथील श्री. पद्मशाली पुरोहीत संघम पाठशाळेच्या वतीने श्री. भृगुकल्पवल्ली या मंत्रपठण पुस्तकाचे प्रकाशन रविवार दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता दाजी पेठेतील बालाजी मंदीराजवळील व्यंकटेश्वर सांस्कृतिक भवन येथे पंचांगकर्ते मोहन दाते, काशीपिठाधिपती डॉ.मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामीजी तसेच आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पद्मशाली पुरोहीत संघम वेदपाठशाळेच्या वतीने होणाऱ्या या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन संघाचे अध्यक्ष देविदास अन्नलदास पंतुलु, उपाध्यक्ष हरिकृष्ण नल्ला पंतुलु, सेक्रेटरी अरविंद जिल्ला पंतुलु, सहसेक्रेटरी अविनाश श्रीमल पंतुलु यांनी केले आहे.



## बार्शीत अध्यापक विद्यालयातील द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.१२ एप्रिल**

येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात आज दि. १२ रोजी द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभाद्वारे शुभेच्छा देण्यात आल्या.

प्राचार्य डॉ. दीपक गुंड हे अध्यक्ष होते. यावेळी कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मोहिनी मडके यांनी केले. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींच्या हस्ते सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत केले. द्वितीय वर्षातील राजनंदिनी गाडेकर, वैष्णवी शिराळकर, वैष्णवी भोसले, अक्षता शिंदे, श्री बगाडे यांनी मनोगत व्यक्त केले. कृष्णा तौर याने जिंदगी के सफर मे...या एका सदाबहार गीताच्या व गिटार वादनाच्या माध्यमातून आपल्या भावना याप्रसंगी व्यक्त केल्या. प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे, प्रा. जे.पी. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष समारोपात प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. शेटे सर यांनी चलते चलते..... या एका सदाबहार गीतातून अनोख्या पद्धतीने द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप दिला. शेवटी आभार प्रदर्शन प्रथम वर्षातील स्नेहा गुंड यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कलाश्री पवार व शिफा पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी चांगले प्रयत्न केले. या निरोप समारंभाच्याप्रसंगी द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनी अध्यापक विद्यालयास नऊ खुर्च्या भेट म्हणून दिल्या. या कार्यक्रमासाठी अध्यापक विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## भजन स्पर्धेत सांगोल्यातील यमाई भजनी मंडळाचे सुयश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ एप्रिल-**

शिवजयंती, महिला दिन व गुढीपाडवा यानिमित्त जागृती तरुण मंडळ, श्रीपुर यांच्यातर्फे महिलांची भव्य भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये सांगोला येथील यमाई महिला भजनी मंडळाने सहभाग घेत तृतीय क्रमांक पटकावला. या यशाचे प्रतीक म्हणून स्मृतीचिन्ह आणि रोख रक्कम भजनी मंडळास भेट म्हणून देण्यात आली. या स्पर्धेमध्ये पंचक्रोशीतील अनेक भजनी मंडळे सहभागी झाली होती. यामुळे सदर स्पर्धा अतिशय बहारदार आणि सुश्राव्य झाली.

श्रीपुर येथील साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. सदर महिलांच्या भजन स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी जागृती तरूण मंडळाने परिश्रम घेतले.



## आदर्शच्या ५० विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीत स्थान

**कुर्डूवाडी,दि.१२ एप्रिल-**

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय परीक्षेत आदर्शच्या १९ विद्यार्थ्यांनी राज्यात तर ३१ विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात यश संपादन केले आहे.



यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे - इयत्ता पहिली- रितीशा धुमाळ - १४६ (राज्यात ३ री), अनुष्का चोपडे १४४ (राज्यात ४ थी ), शंभुराजे ताकभाते १४४ (रा.४था), शिवतेज फरड १४२ (रा. ५ वा), प्रांजल वायकुळे १४० (जिल्ह्यात १ ली), पहिली प्राची बागल १४०(जि १ ली), राजकन्या ताकभाते १४०(जि १ ली), वीरा काळे १३६ (जि ३ री), अनन्या शिंदे १३६ (जि ३ री), आरव कोकाटे १३४ (जि ४था), विठ्ठल मार्कंड (जि ४ था), राजलक्ष्मी बागल (जि५वा). इयत्ता दुसरी - अथर्व नवले १५०(रा १ ला), अर्णव राऊत १४८(रा २ रा), श्रीशा कदम १४६ (रा ३ री), प्रगती बसके १४२(रा५ वी), अक्षरा इंगळे१४२ (रा ५ वी), शौर्य सरवदे१४२ (रा ५ वा), सत्यजित पाटील १४२(रा ५ वा), दिव्यांका तोगे १४०(जि १ ली), आर्यन नवले १४०(जि१ ला), सानवी शिंदे १३६(जि३ री), श्रद्धा भोसले १३६(जि ३), शिवेंद्र खैरे १३६(जि३रा), श्रावणी बामणे १३८(जि २ री), शिवराज काळे १३६(जि३ रा), पायल करळे १३४ (जि ४था), दिव्यांश खोत १३४(जि४ था), आरोही जाधव १३४(जि४ थी), देवांश कसबे १३४(जि४ था). इयत्ता तिसरी - प्रज्वल ढेंबरे २९८(रा २ रा), पर्णल शेंडगे २९६ (रा ३ री), मंजिरी सिरसट (रा५ वी), रुद्र बागल २८८ (जि १ ला), मंथन शिरगिरे २८८(जि १ ला), मानस उंदे २८६(जि २ रा), ईश्वरी लुंगसे २८२ (जि ५ वी),,विनायक गोसावी २८२(जि ५ वा). इयत्ता चौथी- शौर्य केमदारणे २९८(रा २ रा), वेदिका कराळे २९४(रा ४ थी), भार्गवी चोपडे २९४(रा ४ थी), दूर्वा घाडगे २९० (जि१ ली), स्मरणिका पवार २८४(जि ४ थी), जरा काझी २८४(जि४ थी), आरोही कांबळे २८२(जि ५वी ), अर्णव खांडवीकर २८२(जि५ वा). इयत्ता पाचवी - वृंदा सोनवणे २९२(रा ४ थी), काव्या देशमुख २९२ (रा४ थी). इयत्ता आठवी- राहीश शेरताटे २७६(जि ४ था).

या सर्व विद्यार्थ्यांना साळवी मॅडम, निंबाळकर मॅडम ,बोराडे मॅडम, आहेर मॅडम , धुमाळ मॅडम, मदने मॅडम, कांबळे मॅडम, बारबोले मॅडम, कोरके मॅडम, थोरात मॅडम ,बारबोले मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक विभाग प्रमुख व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## आर्या स्कूलमध्ये महात्मा फुले, महावीर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ११ एप्रिल-**

आर्या पब्लिक स्कूल माढा या सीबीएससई मान्यताप्राप्त स्कूलमध्ये क्रांतीसूर्य महात्मा फुले व भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी महात्मा फुले व भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य सागर थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. सामाजिक प्रबोधन ,अस्पृश्यता, जातीव्यवस्थाची निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे त्यांनी कार्य केले. त्याचबरोबर दया, क्षमा, शांती 'अहिंसा परमो धर्म' अशा विचारातून महावीरांनी समाज जागृती केली. असे विचार आपल्या मनोगतातून प्राचार्य सागर थोरात यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य प्रा. सागर थोरात, मनोज नागटिळक, सारिका यादव,वंदना गोसावी, दत्तात्रय चव्हाण, रागिनी शिंदे, प्रियंका काशीद, शुभम पुरवत, जयदेव गायकवाड, माधुरी घाडगे, अतुल लंकेश्वर, प्रतिभा आलदर, प्रतीक्षा पाटील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## वर्ल्ड ऑफ वूमनतर्फे उत्तर तहसील कार्यालयात पाणपोई, सावलीसाठी जाळीची व्यवस्था

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

येथील कुंकुबाई नेत्र रुग्णालयएचे ठिकाणी असलेल्या उत्तर तहसील कार्यालयात येणाऱ्या विधवा, घटस्फोटीत परितक्या दिव्यांग महिलांसाठी येथील सामाजिक संस्था अर्थात वर्ल्ड ऑफ वुमनतर्फे कडक उन्हाळ्यात सावली आणि थंड पाण्याची सोय करण्यात आली. या पाणपोईचे उद्घाटन महिला व बालकल्याण विभागाचे विभागीय आयुक्त श्री. माने यांचे हस्ते, वर्ल्ड ऑफ वूमनच्या अध्यक्षा विद्या लोळगे यांच्या हस्ते झाले. यावेळी सचिव मारता आसादे, सहसचिव शोभा गायकवाड, कार्याध्यक्ष यशोदा सोनवणे, लता ढेरे, सामाजिक कार्यकर्त्या उज्वला पाटील, गीता मुळे, सरोजिनी जाधव, मीना जाधव, प्रमिला स्वामी, आशा शिंदे, सी ए बिराजदार,मिलिंद गोरे, तात्या भोसले आदी उपस्थित होत्या. उत्तर तहसील कार्यालयात डीबीटी साठी दररोज ग्रामीण भागातून कमीत कमी ४०० ५०० महिला येत असून सध्याचा कडक उन्हाळ्याच्या दिवसात तहसील कार्यालयाची नोंदणी खिडकीमध्ये रांगेत उभे असताना त्या महिलांना सावलीची तसेच पिण्याच्या पाण्याची बाहेरच्या बाजूस सोय नसल्याने तसेच काही वृद्ध महिला रांगेत उभ्या असताना अचानक चक्कर येणे, थकवा येणे अशा गोष्टी घडत असल्याने वर्ल्ड ऑफ वूमन तर्फे नोंदणी खिडकी चे वर सावली साठी हिरवी जाळी तसेच समोरच पिण्याचे पाण्याची सोय म्हणून पाणपोई जिथे रोज २० थंड पाण्याचे जार उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे अध्यक्ष सौ.विद्या लोलगे यांनी सांगितले तर उद्घाटन नंतर श्री.माने यांनी या सामाजिक संस्थेतर्फे महिलांसाठी करण्यात आलेल्या या सोयीचे कौतुक करताना याचा फायदा गरीब गरजू महिलांना होणार आहे. अश्याच पद्धतीने दक्षिण तहसीलमध्ये देखील महिलांसाठी सोय लवकरच करण्यात येणार असल्याचे लोलगे यांनी सांगितले.

# चंद्राम चव्हाण गुरुजींची प्रेरणा ज्योत प्रज्वलित राहिली पाहिजे : माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे

▶▶ चंद्राम चव्हाण गुरुजींनी अशिक्षित बंजारा समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले : जलसंधारण मंत्री संजय राठोड

▶▶ दलित मित्र शिक्षण महर्षी चंद्राम चव्हाण गुरुजींच्या पूर्णाकृती पुतळ्याचे थाटात अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

भारत स्वातंत्र्य झाल्यावर देशाच्या विकासात जेवढे समाजसेवकांनी योगदान दिले आहे. तेवढेच योगदान स्व. चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात केले आहे. गुरुजी हे माझे दैवत आहेत. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांना वसा घेऊन मी, पोलीस अधिकारीचा राजकारणी बनलो. आपल्या बंजारा समाजाच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. गुरुजींनी बंजारा व इतर समाजास चेतना आणि प्रेरणा देण्याचे कार्य केले. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाजाला प्रेरणा दिली. गुरुजींची हीच प्रेरणा ज्योत अखंडपणे प्रज्वलित राहिली पाहिजे, असे मत देशाचे नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड, सुभाष चव्हाण, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, विश्वनाथ चाकोते, भारत जाधव,माजी आमदार दत्तात्रय सावंत,सिद्धराम चाकोते,माजी आ.प्रकाश यलगूलवार, पंढरपूरचे बीपी रोंगे, माजी आमदार शिवशरण पाटील, बी. के. नाईक, मूर्तिकार विजय गुज्जर, आ. देवानंद चव्हाण, माजी न्यायाधीश



नामदेव चव्हाण, चेतन नरोटे मान्यवरांच्या हस्ते कळ दाबून पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तदनंतर परिस्पर्श या चंद्राम चव्हाण गुरुजींच्या जीवनावर आधारित स्मरणिकेचे देखील मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवरांचा बंजारा समाजाची शाल, सन्मान चिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले, गुरुजींच्या जुन्या आठवणींना उजाळा देताना मन उचंबळून येते. साधी राहणी उच्च विचारसरणी अशी त्यांची ख्याती होती. जेव्हा मी सर्वप्रथम १९७४ रोजी मंत्री झालो. त्यामध्ये गुरुजींचा मोठे पाठबळ होते. राज्याचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक होते. ते देखील बंजारा समाजाचे होते. त्यांनी देखील सामान्य कार्यकर्त्याला मोठा आधार दिला. सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिक धुरा सांभाळणारे तीन गुरुजी म्हणजे चंद्राम चव्हाण, जाधव गुरुजी, कमळे गुरुजी यांनी आपले ध्येय उद्देश पूर्ण करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले आहे. माझ्यासोबत माझ्या राजकीय प्रवासात माझे सहकारी होते.आज त्यांनी लावलेले रोपटे हे फळांनी बहरले आहे.याची चव संपूर्ण त्यांचा समाज घेत असून यापुढेही त्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी शिंदे कुटुंब प्रयत्न करणार आहे.

मंत्री संजय राठोड म्हणाले, चंद्राम चव्हाण गुरुजी यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले. अशिक्षित, अज्ञानी, व्यसनाधीन असलेल्या बंजारा समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले. शैक्षणिक संस्था स्थापन करून विद्यार्थ्यांना घडवले. समाजाला एक दिशा दिली. सर्वप्रथम त्यांनी शिक्षण घेऊन शिक्षकी पेशा अंगी बांधला आणि त्यापासून प्रबोधन कार्य सुरू केले. सोलापुरात शिक्षणाचे जाळे संस्थांच्या माध्यमातून निर्माण केले. गुरुजींच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यामुळे आज बंजारा समाज विकासाकडे वाटचाल करत आहे.

तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मगास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांनी केले. यावेळी रवी चव्हाण, कार्तिक चव्हाण, सचिन चव्हाण, विवेक चव्हाण,किरण चव्हाण यांच्यसह बंजारा समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार निवृत्त न्यायाधीश नामदेव चव्हाण यांनी मानले. तर सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.



## जुनी पोलिस लाईन येथील दक्षिण मुखी पावन मारूती मंदीरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

येथील जुनी पोलीस लाईन येथील दक्षिण मुखी पावन मारुती मंदीर येथे हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सूर्योदयावेळी गुलाल टाकण्यात येऊन दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जुनी पोलिस लाईन मधील विठ्ठल-रूक्मिणी मंदीरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त ६ ते ११ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याची सुरवात रविवारी रामनवमीदिवशी करण्यात आली होती. या नामसप्ताहात दररोज काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, गाथाभजन, पुराण कथा, हरिपाठ, व कीर्तन असे कार्यक्रम झाले. किर्तन सोहळ्यात हभप निळोबा महाराज शिरसट, हभप अच्युत महाराज मोफरे, हभप श्याम महाराज जोशी यांची कीर्तनसेवा झाली, हभप श्याम महाराज भोसले, हभप किरण महाराज बोधले, हभप मन्मथ महाराज बहिरमल यांनी कीर्तनसेवा केली. शनिवारी हनुमान जन्मोत्सवाचे गुलालाचे कीर्तन पहाटे पाच वाजता अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकार महाराज इंगळे यांचे झाले. त्यानंतर दुपारी खीरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला. तर सायंकाळी पाच वाजता विश्व हिंदू परिषेदेचे जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यू महाराज डोंगरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. हा हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हभप किसनबापू कापसे, हरिभाऊ जावळे, अनंत महाराज ढेरे, किरण पवार, वसंत येळे, अनिकेत व्यवहारे, विशाल पवार, मनोज यावद, संतोष घाडगे, प्रदिप जाधव, बाबूराव डोंगरे, वैभव दांडगे, अजय कुलकर्णी यांच्यासह जुनी पोलिस लाईन सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## प्रहार संघटनेचे आमदार सुभाष देशमुखांच्या घरासमोर टेंभा आंदोलन

### शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

प्रहार संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख जमीर शेख यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कर्जमाफी, पेरणी ते कापणीपर्यंत खर्च एम आरईजीएस मधून करणे, दिव्यांग बांधव यांना ६ हजार रूपये मासिक मानधन देण्यासाठी विधानसभेमध्ये आवाज उठविणेबाबत दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या घरासमोर महिला हॉस्पिटल ते त्यांच्या घरापर्यंत चालत जाऊन अनोख्या पध्दतीने टेंभा आंदोलन करून मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात असे नमूद आहे की, शासनाने निवडणुकीपूर्वी सर्वपक्षीय आमदारांनी त्या-त्या पक्षाची निवडणुक जाहीरनाम्याव्दारे शेतकऱ्यांना आश्वासन दिलेले होते. निवडुन आल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करणार आहोत.



शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशी परिस्थिती असतांना आमदारांनी कर्जमाफीच्या संदर्भात चकार शब्द बोलत नाही. अथवा त्या पक्षाचे प्रमुख या संदर्भात भुमिका घेत नाही.

महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करुन देण्यासाठी कर्जमाफीसाठी हातात भगवा ध्वज व पेटती मशाल घेवुन सर्व कार्यकर्ते प्रहार जनशक्ती पक्ष, संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली या मागण्या केल्या आहे. १) शेतकरी कर्जमाफी २) पेरणी ते कापणीपर्यंत खर्च एमआरईजीएस मधून करणेबाबत, ३) दिव्यांग बांधव यांना ६००० रूपये मासिक मानधन देण्याबाबतच्या मागण्यांबाबत आमदार देशमुख यांनी विधानसभेत याबाबत आवाज उठवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा.

याआंदोलनावेळी हे जिल्हाप्रमुख दत्ताभाऊ मस्के-पाटील, रूग्णसेवक बाबा मिस्त्री, फैसल सालार, मनोहर दोंतुल, बक्त्यार शेख, रफिक इनामदार, मोहसीन खान, निरंजन ख्याडे करमाळा, जाफर सय्यद, फेरोज शेख, सादिक देवणी, अयाज बांगी, फेरोज पठाण, उस्मान नदाफ, अमजदखान पठाण, आदिल शेख, अतिक शेख, उजेब इनामदार आदी उपस्थित होते.

## चंदनाच्या झाडांचे बेकायदा दोहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

चंदनाचे वृक्ष तोडण्यास मनाई आहे. वनविभागाकडून अनेक अटींची पूर्तता केल्यानंतर काही प्रमाणात या वृक्षाचे दोहन करण्यास परवानगी मिळू शकते.महाराष्ट्राच्या शेजारील कर्नाटक राज्यामध्ये चंदनाचे वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत व सदर वृक्षांच्या व्यावसायिक वापर करणे सुलभ आहे. महाराष्ट्रात चंदनाच्या वृक्षांची व्यावसायिक स्वरुपात लागवड करण्यास शेतकरी वर्ग धजावत नाही. त्यामुळे शेताच्या बांधावर, ओढ्याच्या किनारी डोंगराळ भागात चंदनाची झाडे दिसून येतात.

मात्र, गेल्या काही दिवसांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ, मंगळवेढा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, उत्तर, दक्षिण, अक्कलकोट, माढा, करमाळा, बार्शी या तालुक्यातील परिसरामध्ये चंदनाच्या झाडांची तोड झाल्याच्या घटना घडत आहेत. तसेच झाड पक्व झाले आहे की याचा शोध घेण्याकरिता जमिनी-पासून काही अंतरावर



झाडाच्या खोडावरती गिरमिटने छिद्र पाडल्याच्या खुणा अनेक झाडीवरती दिसून येतात. चंदन हे मौल्यवान वृक्षामध्ये गणले जाते. याचा उपयोग म सौंदर्य प्रसाधने, अगरबत्ती तसेच रसायनांच्या निर्मितीसाठी होतो. त्यामुळे चंदनाच्या झाडाची अवैध तोड व चोरीच्या घटना घडतात. या घटना रोखण्याकरिता वनविभाग व महसूल विभाग आणि पोलिसांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

> राज्यकर्ते आणि शासनाने याकडे गांभिर्याने लक्ष देणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागात पुर्वी ओढ्याजवळ चंदनाची अनेक झाडे दिसत होती. परंतु चंदनाची झाडे दुर्मिळ झाले आहेत. जे झाडे शिल्लक आहेत त्या प्रत्येक झाडांच्या खोडावरती गिरमिटने छिद्र पाडल्याचे आढळते तसेच गेल्या काही दिवसात या ठिकाणी असणारी अनेक झाडे गायब झाली आहेत.
>
> **- पै.माऊली हेगडे,** सामाजिक कार्यकर्ते

ग्रामीण भागातील चंदनाच्या प्रत्येक झाडांचे जिओ टॅगिंग करणे अपेक्षित आहे. परंतु या तिन्ही खात्याकडून कोणतेच प्रयत्न दिसून येत नाहीत अशी खंत सामाजिक कार्यकर्ते पै. माऊली हेगडे यांनी व्यक्त केली आहे.

# टप्पा वाढ अनुदानासाठी शिक्षण आयुक्तांच्या घरासमोर शिक्षकांचा हुंकार

### १४ एप्रिलपासून हुंकार बेमुदत आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च**

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकडयांतील ६५ हजार विना अनुदानित तथा अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १४ ऑक्टोबर २०२४ मधील वेतन अनुदान वितरणाचे आदेश १ जून २०२४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करण्यासाठी व टप्पा वाढ वेतन आदेश वाटप करणे या प्रमुख मागणीसाठी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने पुणे आयुक्त कार्यालय येथे १४ एप्रिल २०२५ पासून हुंकार बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे.

कायम शब्द काढलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकडयावर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पंधरा ते वीस वर्षांपासून काही विनावेतन तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. या कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या संवेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वयच्या वतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करण्यात आले. १० ऑक्टोबर २०२४ रोजी शिक्षक समन्वय संघाच्या मागणीचा सकल विचार करत मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय करत १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

शासननिर्णय निर्गमित होऊन आठ ते दहा महिने झाले तरी शासननिर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन होतांना दिसत नाही. या शासननिर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन व्हावे यासाठी शासनस्तरावरून २६ नोव्हेंबर २०२४ रोजी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हजारो खासगी आस्थापनातील सर्व शाळेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना आपल्या उदरनिर्वासाठी आर्थिक कोंडी सुटण्यासाठी अध्यापना बरोबर संध्याकाळी किंवा सुट्टीच्या दिवशी इतर काम करावे लागत आहे. गेल्या १०-१२- वर्षे २० टक्के ४० टक्के वर काम करणारे शिक्षकांना त्यांचे संसार चालवण्यासाठी वेठबिगारी, रिक्षा चालवणे,शेतामध्ये मजूर म्हणून काम करणे असे काम शिक्षकांना करावे लागत आहे. अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथील आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत . जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ मागे हटणार नाही अशी माहीती शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.राहुल कांबळे, के. पी. पाटील, सी. नेहालाई गवळी, प्रा. संतोष वाघ, प्रा. दिपक कुलकर्णी यांनी दिला आहे. शिक्षकांनी अधिक संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संग्राम कांबळे यांनी केले आहे.

> पंधरा वर्षांपासून अनेक शिक्षक वेतनापासून वंचित आहेत. लाडक्या बहिणांनी सरकार हजारो कोटी निधी देत आहे. तर, राज्यशासनाच्या मान्यतेने सुरू असलेल्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षिका मात्र गेल्या पंधरा वर्ष झाली वेतनापासून वंचित आहेत. या शिक्षिका सरकारच्या लाडक्या बहिणी नाहीत का?.
>
> **- नेहाताई गवळी**
> समन्वयक, शिक्षक समन्वय संघ, महाराष्ट्र

> शिक्षकांचा वाढता वय आणि त्यांच्या उर्वरित सेवेचा विचार करून शासनाने त्यांना न्याय द्यावा त्यांची मानसिक खच्चीकरण होऊ नये यासाठी शासनाने गांभीर्याने विचार करावे. राज्यातील २० टक्के ४० टक्के६० टक्के असलेल्या शाळांना टप्पा वाढ देऊन त्यांची मानसिक व आर्थिक कोंडी सोडवावी.
>
> **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष,**
> डी.एड बी.एड संघटना तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरती.

## संविधानाची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे : प्रा. डॉ. जोगदंड

### सम्यक विचार मंचच्या मिलिंद व्याख्यानमालेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

राज्यघटनेत अनेक कलमे सामान्यांच्या हिताच्या आहेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. संविधान कितीही चांगले असले तरी ते राबवणारे राज्यकर्ते चांगले असावे लागतात. यासाठी सामान्य माणूस जागे राहून संविधानाचे रक्षण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन व्याख्याते प्रा. डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

हुतात्मा स्मृती मंदिरात सम्यक विचार मंचच्या मिलिंद व्याख्यानमालेचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. जोगदंड बोलत होते. भारतीय संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी अध्यक्षस्थानी पाखर



संकुलाचे सचिव विक्रम कांबळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक अनिल कांबळे उपस्थित होते. तसेच चंद्रकांत कोळेकर, शांतीकुमार कांबळे, रविकांत ढावरे, रमेश सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जोगदंड पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले हे संविधान कोणत्या जातीपुरते, धर्मापुरते किंवा व्यक्तिपुरते नव्हते. परंतु संविधानाची वेगवेगळ्या पद्धतीने पायमल्ली होत असून ती सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. यासाठी शिक्षण महत्वाचे असून जोपर्यंत नागरिक शिक्षण घेऊन प्रगल्भ होत नाही तोपर्यंत त्यांना संविधान कळणार नसल्याचे यावेळी ते म्हणाले.

प्रास्ताविक सुधीर चंदनशिवे यांनी केले. प्रारंभी भगवान गौतम बुद्ध , महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अंजना गायकवाड यांनी केले. तर आभार मनीष सुरवसे यांनी मानले.

### नाच गाण्यापेक्षा विचारांची जयंती साजरी करावी : आयुक्त एम राजकुमार

एकीकडे डॉल्बीच्या परवानगीसाठी तरुण कार्यकर्त्यांची आयुक्तालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. दुसरीकडे अशा स्तुत्य व्याख्यानमालेत तरुणांनी पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. तरुण उद्याचे भविष्य असून त्यांनी नाच गाण्यापेक्षा विचारांची जयंती साजरी करावी, असे आवाहन पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी केले.

शुक्र.दि.१८ एप्रिल (सुट्टी) रात्रौ ८ वा. स्मृति मंदिर
ति. वि. bookmyshow आणि सकाळ संध्या. नाट्यगृहावर सुरु
फोन बुकिंग संपर्क : शिवाजी उपरे 9623004299
२१ वर्ष अविरत हाऊसफुल्ल होणारा दर्जेदार आणि ORIGINAL कार्यक्रम प्रदीर्घ काळाने सोलापूरात
आर्ट सर्कल पुणे आयोजित



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सोलापुरात शुक्रवारी मेरा जीवन ही मेरा संदेश कार्यक्रम

**● नृत्य गायनाद्वारे सादर करणार डॉ. आंबेडकर यांचा जीवन प्रवास**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

भीमजयंती निमित्त उत्तम सोशल फाउंडेशनच्या वतीने शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात मेरा जीवन ही मेरा संदेश है हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नृत्य गायनाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रा.डॉ. महेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उत्तम सोशल फाऊंडेशन सोलापूर मध्ये गेल्या तीन वर्षापासून राष्ट्राच्या उन्नतीसाठी सामाजिक सेवा'' हे ब्रीद घेऊन शैक्षणिक, सामाजिक, सास्कृतिक, आरोग्य, महिलांच्या उन्नतीसाठी कार्य करीत आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नृत्य-गायन कलेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास सादरीकरण कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे , आ. देवेंद्र कोठे, रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे ,आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, माजी स्थायी समिती सभापती मधुकर आठवले यांची उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस मधुकर आठवले, विद्या कदम आदी उपस्थित होते.



### महत्वाचे...

## वृध्दाची पर्स चोरली; पर्समध्ये २ लाखांचे सोन्याचे दागिने

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

शहरातील मुरारजी पेठ येथे लावलेली दुचाकीला लावलेली वृध्दाची पर्स चोरट्याने चोरून नेली. या पर्समध्ये २ लाख ६ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. याबबात मल्लेशय्या राचोटय्या स्वामी (वय ७३, रा. कुम ठकेर हॉस्पीटलजवळ, शिवलिंग निलय, दत्त नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मार्च रोजी सायंकाळी मल्लेशय्या स्वामी हे मुरारजी पेठेत गेले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्या पार्क केलेल्या स्कुटरला पर्स अडकाविलेली होती. ती पर्स चोरट्याने चोरून नेली. या पर्समध्ये ३८.१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, २.५७ ग्रॅम वजनाचे कानातील रिंगा असा २ लाख ६ हजार रुपये किंमतीचा ऐवज होता. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

## वालचंद कॉलेज बॉईज हॉस्टेलमध्ये हाणामारी

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

शहरातील वालचंद कॉलेज बॉईज हॉस्टेलमध्ये स्टडी टेबलने मारहाण करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिध्दाराम कृष्णा भाले (वय ४२, रा. तोगराळी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चैतन्या पवार (रा. वालचंद कॉलेज बॉईज हॉस्टेल, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ एप्रिल रोजी दुपारी वालचंद कॉलेज बॉईज हॉस्टेलमध्ये सिध्दाराम भाले यांचा मुलगा हा हॉस्टेलमध्ये झाडू मारत होता. त्यावेळी त्याचा मित्र ओम बंडगर हा आला व तु ही झाडू मार असे म्हणाला. त्यावेळी चैतन्या पवार याने शिवीगाळ करीत स्टडी टेबल भाले यांचा मुलगा लक्ष्मीकांतच्या कानावर मारला व दुखापत केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.



## मारहाण करून गाडीची काच फोडणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

मारहाण करून गाडीची काच फोडणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आनंदय्या बसय्या हिरेमठ (वय ३२, रा. राजीव नगर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन राजकुमार स्वामी (रा. किसान नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० एप्रिल रोजी दुपारी किसान नगर येथे राजकुमार स्वामी याने हिरेमठ यांचा भाऊ गुरुपादय्या याच्याबरोबर झालेल्या तक्रारीबाबत विचारले असता स्वामी याने हिरेमठ यास शिवीगाळ करून दमदाटी करून हाताने मारहाण केली तसेच हिरेमठ याच्या मालवाहतूक वाहनाचे काच दगडाने मारून फोडून नुकसान केले. तसेच हिरेमठ याच्या कानाला दाताने चावा घेतला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

## वडीलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलगा व सुनेवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

पेन्शनची रक्कम न दिल्याचे कारणावरून वडीलांचा सांभाळ न करता मानसिक छळ करणाऱ्या मुलगा व सुनेवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अजुमआरा इसाक शेख (वय ६८, रा. लोकमान्य नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इरशाद इसाक शेख व महजबीन इरशाद शेख (रा. लोकमान्य नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२४ पासून अजुमआरा यांचा मुलगा इरशाद व सुन महजबीन या दोघांनी अजुमआरा यांनी पेन्शनची रक्कम न दिल्याच्या कारणावरून त्यांचा व्यवस्थित सांभाळ न करता हाताने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन शारीरीक व मानसिक त्रास दिला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात जेष्ठ नागरीक आणि पालक पोषण आणि कल्याण अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

# जय बजरंग बली...जय हनुमान... घुमला जयघोष

## ● शहरातील विविध हनुमान मंदिरामध्ये आबालवृद्ध भाविकांची दर्शनासाठी मांदियाळी




सोलापूर : काळजापूर मारुती मंदिर हनुमान जयंतीनिमित्त दर्शनासाठी गर्दी केली.




श्री हनुमान जयंतीचे औचित्य साधून वर्षातून एकदा उघडणाऱ्या जुनीमिल येथील हनुमान मंदिरात भाविकांची गर्दी...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

श्री राम... जय राम... जय जय राम... पवनपुत्र हनुमान की जय... जय बजरंग बली ! हा निनाद शहरातील विविध हनुमान मंदिरात ऐकण्यास मिळाला. निमित्त होते श्री हनुमान जयंतीचे. शहरात गेल्या रविवारी दि.६ एप्रिल रोजी श्री राम नवमी मोठ्या उत्साहात साजरी झाली. त्यानंतर शनिवार दि.१२ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला.

दरम्यान, शहरातील काळजापूरचा मारुती मंदिर, मधला मारुती मंदिर, पंचमुखी हनुमान मंदिर, दक्षिणमुखी हनुमान मंदिर, उत्तर मुखी हनुमान मंदिर, पूर्वमुखी हनुमान मंदिर अशा विविध मंदिरात सकाळपासूनच भक्तांची दर्शनासाठी एकच गर्दी होती. पहाटे पाच वाजता महारुद्राभिषेक, पंचाभिषेक तसेच काकड आरती संपन्न झाली. त्यानंतर सूर्योदयाला हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी मंदिरात सर्वत्र नवचैतन्याचे आणि प्रसन्नतेचे वातावरण होते. दिवसभर शहरातील विविध हनुमान मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होती. मंदिरामध्ये सुवासिक फुलांची सजावट करण्यात आली होती. आकर्षक रांगोळीद्वारे मंदिर परिसर सजवण्यात आला होता. आबालवृद्ध हनुमंत भक्तांनी श्रींच्या चरणी श्रीफळ, पुष्पहार तसेच खरबूज अर्पण करून मनोभावे दर्शन घेतले. नवसाला पावणाऱ्या श्री काळजापूर मारुती मंदिरात भाविकांची पहाटेपासून एकच गर्दी होती. मंदिरात काकड आरती रुद्राभिषेक तसेच महाआरती संपन्न झाली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्याचा आले. अनेक भाविकांनी मंदिरासमोर श्रींच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. रुचकीचे पान, तेल, उदबत्ती, मीठ, काळे उडीद, लाल धागा, असे विविध प्रकारचे प्रासादिक साहित्य घेऊन भाविक मंदिरात दाखल झाले होते. चिमुकल्या बालगोपाळांनी देखील मंदिरात श्रींचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. त्याचप्रमाणे मंदिर परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**मंदिरात महाप्रसाद आणि लापशी हुग्गीचे आयोजन**

श्री हनुमान जयंतीचे औचित्य साधून शहरातील अनेक छोट्या मोठ्या श्री हनुमान मंदिरात श्रींना आवडणाऱ्या लापशी, हुग्गी तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला.

**वर्षांतून केवळ एकदाच उघडते**

जुनीमिल येथील श्री हनुमान मंदिरात भाविकांची श्रींच्या दर्शनासाठी गर्दी झाली होती. सुमारे दोनशे वर्षे जुने असलेले हे मंदिर वर्षांतून केवळ एकदाच भाविकांसाठी उघडण्यात येते. त्यामुळे जुनीमिल येथील हनुमान मंदिराची आख्यायिका वेगळीच आहे. नवसाला पावणारा श्री हनुमान अशी श्रींची ख्याती आहे. येथे जुन्या पद्धतीचे मंदिराचे बांधकाम आहे. शेजारीच पुरातन काळातील चौकोन विहिर आहे. संपूर्ण झाडा झुडुपांनी आणि वृक्षांनी व्यापलेला हा परिसर आहे. येथे देखील पहाटे रुद्राभिषेक, पंच अभिषेक, महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. सदरचे मंदिर पुरातन काळातील असून जुनी मिलचे मालक धनराज गिरीजी यांनी या मूर्तीची स्थापना केली आहे. दक्षिणमुखी मारुती असून अनेक भाविक नवस फेडण्यासाठी येतात. श्रींना चांदीची गदा अर्पण करण्यात आली असून सदरची मूर्ती आकर्षक आहे.

**- हरी कुलकर्णी, मंदिर पुजारी**



**मड्डीवस्ती येथील ५१ फुटी हनुमंताचे दर्शन खुले..**

शहरातील मड्डीवस्ती येथे ५१ फुटी हनुमंताची विशालकाय मूर्ती घडविण्यात आली आहे. मूर्तिकार मनोज शहाणे यांनी सदरची महाकाय मूर्ती साकारली असून यामुळे शहराच्या वैभवात आणखीन भर पडली आहे. या मूर्तीचे लोकार्पण सोहळा करण्यात आला असून, ही भव्यदिव्य मूर्ती दर्शनासाठी खुली करण्यात आली आहे.

## घरगुती वादातून तरुण, तरुणीस मारहाण

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-** घरगुती वादातून दोघांनी लाथाबुक्क्यांनी व पातेलेने तरुणास मारहाण केली. शुक्रवारी (ता. ११) रात्री ९.१५ च्या सुमारास कोंतम चौक परिसरात ही घटना घडली. वैभव ज्ञानेश्वर सरवदे (वय २५, रा. धाकला राजवाडा, कोंतम चौक, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. घरासमोर कुणाल सरवदे व वर्षा कुणाल सरवदे या दोघांनी त्याला मारहाण केली. त्यात मुकामार लागल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्मालयात दाखल केले. दुसऱ्या घटनेत घरगुती वादातून महिलेसह पाचजणांनी तरुणीस मारहाण केली. शुक्रवारी (ता. ११) दुपारी ४.१५ च्य सुमारास मुरारजी पेठेत ही घटना घडली. प्रतीक्षा रमाकांत उडणशिव (वय २५, रा. उमानगरी, मुरारजी पेठ, सोलापूर) असे तिचे नाव आहे. राहत्या घरी साक्षी प्रतीक उडणशिव हिच्यासह पाचजणांनी लाथाबुक्क्यांनी तिला मारहाण केली. त्यात मुकामार लागल्याने तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

# सोलापूर बाजार समिती निवडणूक होणार जम्बो?

**▸ अद्याप एकही अर्ज मागे नाही... तर ३८८ उमेदवारांची छापावी लागेल मेगा मतपत्रिका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांपैकी आजपर्यंत एकाही उमेदवाराने अर्ज माघार घेतले नाही. त्यामुळे बाजार समितीची यंदाची निवडणूक चुरशीची आणि विक्रमी होईल का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजे बुधवार, दि.१६ एप्रिल २०२५ पर्यंत कोणीच माघार घेतली नाही, तर ३८८ उमेदवारांची जम्बो मतपत्रिका छापण्याची वेळ निवडणूक कार्यालयावर येणार आहे. दरम्यान, निवडणूक प्राधिकरणाच्या नियमानुसार एक गट्ठयाने उमेदवारांचे विड्रॉल स्वीकारले जाणार नाहीत. उमेदवार स्वतः किंवा त्यांचा सूचक समोर असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यंदाच्या निवडणुकीत विक्रमी म्हणजे तब्बल ३८८ अर्ज दाखल झाले आहेत. गेल्या दहा बारा दिवसात यापैकी एकाही उमेदवारांनी निवडणूकीतून माघार घेतलेली नाही. त्यामुळे निवडणूक लढविणारे नेतेमंडळीही आता हतबल झाले आहेत. त्यामुळे शेवटच्या दोन दिवसात आता अनेकांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीसाठी अद्याप कोणत्याच पक्षाने पॅनल जाहीर केलेला नाही. त्यामुळे कोण, कोणासोबत निवडणूक लढणार हे देखील अद्याप स्पष्ट झालेले नाही. एप्रिल महिन्यात शनिवार, रविवार आणि सोमवार अशा सलग तीन दिवस सुट्टया असल्यामुळे मंगळवार आणि बुधवार हे दोनच दिवस निवडणुकीच्या कामकाजासाठी असणार आहेत. त्यामुळे निवडणूक कार्यालयावर ताण वाढणार आहे. गुरुवार दि.१७ एप्रिल रोजी उमेदवारांना चिन्हांचे वाटप करावे लागणार आहे.

**बुधवारपर्यंत माघार घेता येईल :** बुधवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. ज्यांना स्वइच्छेने उमेदवारी माघार घ्यायचे आहेत. त्यांनी स्वतः निवडणूक कार्यालयात येवून अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. किंवा सूचक असलेयाः जर उमेदवारांनी प्राधिकृत केले असेल उमेदवाराच्या सहीचे पत्र ओळखपत्र सोबत घेऊन आल्यास त्यांना माघार घेता येणार आहे. संबधित उमेदवाराशी खात्री केली जाणार आहे. गठ्ठयाने उमेदवारी अर्ज माघार घेण्याची तरतूद कायद्यात नाही.

**- किरण गायकवाड**
निवडणूक निर्णय अधिकारी. कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.



# दळणवळण साधनांची सोलापुरात ऐशी की तैशी

- राजकीय पोळी भाजून घेण्याचा खटाटोप
- शहर बसवाहतूक सवेची बनली डोकेदुखी
- रिक्षाचालकांच्या वागण्या, बोलण्याचे दुर्लक्ष
- शाब्दिक आणि कागदी विमाने उडविण्याचा प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

शहरात दळणवळण साधनांचा अभाव आहे. बससेवा, रिक्षा वाहतूक, विमानसेवा यांसारख्या सावजनिक वाहतुकीचा विचार केला गेल्यास शहरात दळणवळण साधनांची ऐशी की तैशी असाच प्रकार सुरु आहे. सोलापूरकरांसह परगावांहून आलेल्या लोकांना सुलभ वाहतूक सेवा पुरविण्याऐवजी या विषयावरुन राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधी आपापली राजकीय पोळी भाजून घेत असल्याचे दिसून येते.

मोठी लोकसंख्या असलेल्या सोलापूरकरांच्या दृष्टीने शहर बस वाहतूक सेवेची डोकेदुखी बनली आहे. महानगरपालिकेकडील परिवहन सेवेच्या बससेवेला चांगलीच घरघर लागली आहे. अनेक बसेस रस्त्यावर धावण्यापेक्षा नादुरुस्त अवस्थेत डेपोतच धूळ खात पडून आहेत. नाही म्हणायला हाताच्या बोटावर मोजण्याइतपत बसेस शहरात धावत आहेत. परंतु त्या बसेस म्हणजे असून अडचण, नसून खोळंबा या प्रकारातले आहेत.

परिवहन समितीवर आजपर्यत अनेक चेअरमन व अधिकारी आले आणि गेले. परंतु दोन-चार अपवाद वगळता अनेकांना शहर बससेवा सुरळीत करण्यात अपयश आले. तसेच या परिवहन सेवेतील बहुतेक अधिकारी, कर्मचारी हे आपल्यावर सोपविण्यात आलेले काम टाळण्यात आणि आपल्या न्याय, हककासाठी भांडण्यातच धन्यता मानतात. त्यामुळे शहर बससेवेची चाके आहे त्या ठिकाणीच रुतुन बसलेली आहेत.

शहरात रिक्षांच्या संख्येत वाढ होत आहे. यात स्क्रॅप रिक्षांचा अधिक भरणा आहे. शहर बससेवेचा पुरता बोजवारा उडाल्याने रिक्षाचालकांचे चांगलच पावत असल्याचे दिसून येत आहे. अचानक ब्रेक दाबत भर रस्त्यात कुठेही रिक्षा थांबविणे, मोठमोठ्या आवाजात गाणी लावून रिक्षा दामटणे, प्रमाणापेक्षा अधिक प्रवाशांना रिक्षात कोंबणे, अव्वाच्या सव्वा भाडे आकारणे, प्रवाशांशी अरेरावी करणे असे प्रकार नित्याचेच झाले आहेत. गणवेशाविना प्रवासी वाहतूक करणे, तोंडातील मावा, तंबाखूचा पिचकारी मारणे, दोन्ही बाजूला महिलांना बसवून घेणे, अशिक्षित व कष्टकरी वर्गातील प्रवाशांची टर उडविणे हा आपला अधिकारच आहे अशा तोऱ्यात रिक्षाचालकांचे वागण व बोलणे असते. या सर्व प्रकारांकड वाहतूक पोलीस दुर्लक्ष करतात. त्यामुळे रिक्षाचालक आणि वाहतूक पोलीस यांच्यात अर्थपूर्ण वाटाघाटी तर झाली ना? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

होटगी रोड विमानतळावरुन विमानसेवा आणि बोरामणी येथील विमानतळ सुरु करणे यावरुन तर सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये शाब्दिक आणि कागदी विमान उडविण्याचा सिलसिला सुरु आहे. बोरामणी येथील विमानतळाच्या परिसरातील जागांचे भाव गगनाला भिडले आहेत. केवळ विमानसेवेच्या प्रश्नावरुन आंदोलने, मोर्चे, आरोप व प्रत्यारोप होत आहेत. परंतु सोलापूरकरांना प्रत्यक्षात विमानसेवेचे भाग्य काही लाभेनासे झाल आहे.



**रेटारेटी, झोंबाझोंबी अन् वादावादी**

एस.टी. बसस्थानक, रेल्वे स्थानक, जुना विडी घरकुल, आसरा चौक, सैपुल, सत्तर पुट रोड, नीलम नगर, कन्ना चौक, कोंतम चौक, नई जिंदगी, सात रस्ता यांसह शहरातील इतर गर्दीच्या ठिकाणी प्रवाशांना आपापल्या रिक्षात घेण्याकामी रिक्षाचालक रेटारेटी करतात. या रेटारेटीत प्रवाशांशी झोंबाझोंबी केली जाते. भर रस्त्यावर रिक्षा उभी करुन दुचाकीसह अन्य वाहनचालकांशी वादावादीचे प्रकारही सर्रास पहावयास मिळतात.

**न्याय, हककाकरिता लढा आणि संघटनांचा पुढाकार**

परिवहन सेवेतील अधिकारी, कर्मचारी आणि रिक्षाचालक यांच्या न्याय, हककाकरिता लढा देण्यासाठी एकापेक्षा अधिक संघटना अग्रेसर असतात. परंतु प्रवाशांना सुलभ, सुखकर सेवा देण्याकामी या संघटना कधी पुढाकार घेणार आहेत? आपल्याशिवाय इतरांच्या पोटापाण्याचा व कामधंदयांबाबत परिवहन कर्मचारी व रिक्षाचालक यांना काही देणेघेणे नाही का? असा संतापजनक सवाल विचारलाजात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८५

**तरी घरी मातापितरा। धड बोली नाही संसारा।**
**येर विश्व भरी आदरा। मुर्खू जैसा।।**

जालन्याला असतांना एका गावातील काही मंडळी व्याख्यानासाठी माझी तारीख घेण्याकरिता माझ्या घरी आले होते. मी त्यांना बसवले, परिचय व चहापान झाले. काही महत्त्वपूर्ण कामकाजामुळे त्यांच्या कार्यक्रमास मी येऊ शकत नसल्याचे त्यांना म्हटले. ते नाराज होऊन म्हणाले, माऊली, मग तुम्हीच आम्हाला एखादा अध्यात्मीक विषयावर बोलणारा चांगला व्याख्याता द्या. व्याख्यात्यामध्ये चांगला अन् वाईट असा भेद करणे योग्य वाटत नसल्याचे मी म्हणालो. मी एका व्याख्यात्याचे नाव व त्यांच्या घरचा पत्ता सांगीतला. तेव्हा म ोबाईल नव्हते. अन्यथा मीच मोबाईलवरून त्यांना संपर्क करून दिला असता. या लोकांनी मी त्यांच्या सोबत येऊन त्या व्याख्यात्यांची तारीख मिळवून देण्याची प्रबळ इच्छा व्यक्त केली. त्यांच्या भावना विचारात घेऊन मी त्यांच्यासोबत व्याख्यात्यांच्या घरी गेलो. घराचे दार बंद होते. टी.व्ही.चा आवाज अन जोरजोरात ओरडण्याचा आवाज घरातून येत होता. आजू-बाजूचे काही लोक आपआपल्या घराच्या दारात, ओट्यावर उभे राहून या घराकडे पाहत होते. मला न राहवल्याने मी एकाला नेमके काय चालले आहे, याबाबत विचारले असता, त्यांनी अत्यंत धक्कादायक सांगीतले. त्या घरात कोणाला मारहाण होते, मारहाण कोण करते, हे ऐकून आम्ही आवाक् झालो. हे नेहमीचेच आहे, आम्ही सर्व शेजारी यांच्या अशा वर्तनाला कंटाळलो आहोत, असेही ते म्हणाले. आधी केले मग सांगीतले, या संतोक्तीप्रमाणे या व्याख्यात्यात लोकांना योग्य ते मार्गदर्शन करण्याचे गुण नाहीत हे स्पष्ट जाणवल्याने आम्ही त्या व्याख्यात्यांची भेट न घेता परत फिरलो. समाजात असे अनेक लोक आहेत. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या,



**तरी घरी मातापितरा। धड बोली नाही संसारा।**
**येर विश्व भरी आदरा। मुर्खू जैसा।।**

या म्हणण्याप्रमाणे घरात नीट न वागणारे, घरातल्यांशी नीट न बोलणारे, आई-वडिलांचा सन्मान न करणारे बरेच लोक समाजात मात्र मान खाली घालून, लोकांना आदरपुर्वक बोलणारे, झुकुन वागणारे, दिखावा करणारे आहेत. असे लोक जर समाजाचे नेतृत्व करू लागले तर काय फलीत होणार आहे. पुढे चालून अशांचे फार वाईट हाल होतात. कारण बाहेरचेही यांचे राहत नाहीत आणि घरचे तर यांच्यापासून केव्हाच दूर गेलेले असतात. ही वेळ येऊ द्यायची नसेल तर आपण आपल्या कर्माचे साक्षीदार झालो पाहिजे. मी बोलतोय, सांगतोय त्याप्रमाणे स्वत: वागतो की नाही, हे आपण पाहायला हवे. मी लोकांना मार्गदर्शन करीत नाही, त्यामुळे मला अशी काळजी घेण्याची आवश्यकता नाही, असे समजू नये. कारण प्रसंगानुरूप का होईना आपण कोणालातरी मार्गदर्शन करीतच असतो. कोणालाच नसेल तर किमान कुटुंबातल्या सदस्यांना आणि विशेष म्हणजे स्वत:ला तरी मार्गदर्शन करतोच. म्हणून आपले मार्गदर्शन हे सत्याला व स्वानुभावाला धरून आहे, याची खात्री आपण करावी. ही खात्री म्हणजे ज्ञानामृत आनंदलहरींची निर्मीती करणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : रविवार** | **दिनविशेष - चांगला दिवस,** |
| **दि. १३ एप्रिल २०२५** | **श्री महालक्ष्मी रथोत्सव** |
| **विक्रम संवत् २०८१** | **कोल्हापूर** |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - चैत्र** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. प्रतिपदा (अहोरात्र)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - चित्रा (२१.१०)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - हर्षण (२१.३८)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - बालव (१९.०८)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निम र्ण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीम ध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.



# पोलीस आयुक्तांकडून २३ फिर्यादींना १ कोटी ६५ लाखांचा मुद्देमाल परत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्यावतीने शुक्रवारी सायंकाळी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते सन २०२४ व २०२५ मध्ये दाखल असलेल्या फसवणुक, घरफोडी-चोरीचे घटनेम धील २३ फिर्यादी यांना १ कोटी ६५ लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने परत करण्यात आले.

सोलापूर शहर घटकातील सर्व पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मालाविषयक गुन्ह्यापैकी उघडकीस आलेल्या एकूण १५ गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल फिर्यादींना न्यायालयाच्या आदेशानुसार परत करण्यात आला.

त्यामध्ये ११०० ग्रॅम सोन्याचे दागिने व १००० ग्रॅम चांदीचे दागिने असे एकुण १ कोटी रूपये किंमतीचे दागिने आहेत. हा मुद्देमाल संबंधीत फिर्यादी यांना नियमानुसार परत करण्यात आला. त्याचप्रमाणे सायबर पोलीस ठाणे कडील विविध घटनेत सायबर फ्रॉडला बळी पडलेल्या ८ व्यक्तींचे सुमारे ६५ लाख रूपये हे त्यांना परत करण्यात आले. अशा प्रकारे एकूण २३ व्यक्तींचे सुमारे १ कोटी ६५ लाख रूपये किंमतीचा ऐवज परत केला आहे.

यावेळी उपायुक्त अजित बोन्हाडे, विजय कबाडे तसेच संबंधीत विभागाचे सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा व सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व मुद्देमाल कारकुन उपस्थीत होते.

### आयुष्याची पुंजी परत मिळाल्याचा आनंद...

ज्या फिर्यादींच्या घरातून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले होते. ते दागिने परत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहात होता. एकेक पै जमा करून दागिने घेतले होते, परंतु ते चोरीस गेल्याने संपूर्ण घर खचलेले होते. परंतु, पोलिसांनी चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून चोरीस गेलेले दागिने परत मिळवून दिल्याने आयुष्याची पुंजी परत मिळाल्याच आनंद फिर्यादींच्या चेहऱ्यावर पहावयास मिळत होता.

# वृक्ष लागवडीत दक्षिण सोलापूर मतदारसंघ जिल्ह्यात अव्वल करणार



**▶▶ आ.सुभाष देशमुख यांचा संकल्प**
**▶▶ वृक्ष लागवड, पर्यटन स्थळासाठी घेतली बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

संपूर्ण दक्षिण तालुका हरित करण्याचा मानस आमदार सुभाष देशमुख यांनी केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिद्धेश्वर वनविहार येथे दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये वृक्ष लागवड व पर्यटन स्थळ विकसित करण्यासंदर्भात त्यांनी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी त्यांनी दक्षिण तालुक्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला आहे.

सिद्धेश्वर वन विहार येथे दक्षिण सोलापूरमध्ये वृक्षलागवड वाढवण्यासाठी व पर्यटन स्थळ विकसित करण्यासंदर्भात विविध अधिकाऱ्यासमवेत बैठक झाली. यावेळी अतिरिक्त उपवनसंरक्षक अधिकारी महादेव मोहिते, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण मनीषा पाटील, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त तैमुर मुलाणी, उपायुक्त श्रीमती मगर, सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी एनटीपीसीचे प्रशासकीय अधिकारी विजय कोनप्परेड्डी, गुरुदत्त शर्मा, राजूर सरपंच लक्ष्मण गडदे, वन विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी विविध विषयांवर चर्चा केली. माशाळ वस्ती येथील वन विभागाच्या आरक्षित जमिनीतील दोन हेक्टर जागा जुळे सोलापूर नाट्यगृहासाठी देणे, सिद्धेश्वर वन विहार येथील इको टुरिझम बोर्डाने मान्यता दिलेल्या प्रस्ताव निधीसाठी जिल्हा नियोजन समिती कडे प्रस्ताव पाठवणे, वन विहार येथे १ मे पासून वन सफारी सुरु करणे त्यासाठी सर्व तयारी करणे, स्मृती उद्यानचा नवीन आराखडा तयार झाला असून तो शासनास व जिल्हा नियोजन समितीकडे पाठविणे, स्मृती उद्यानम ध्ये पर्यटकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करणे, संभाजी तलाव परिसर सुशोभीकरणासाठीचा प्रस्ताव तयार करून एनटीपीसी कडे पाठविणे, तलाव परिसर विकसित करणे, एनटीपीसी व सामाजिक वनीकरण व वन विभाग यांच्या माध्यमातून राजूर, नांदणी, कणबस येथे वन विभागाच्या जागेवर बांबू लागवड करणे, शहरातील वन विभागाच्या उपलब्ध जागेत महानगरपालिका व एनटीपीसीच्या माध्यमातून जून मध्ये वृक्षलागवड करणे, जागा अतिक्रमण मुक्त करणे व त्या ठिकाणी गार्डन तयार करणे, तिऱ्हे तांडा येथील वन विभागाच्या जागेवर पर्यटनासाठी नवीन उद्यान तयार करणेबाबतचा प्रस्ताव तयार करून शासनास पाठवणे, दक्षिण सोलापूर मधील वन विभागाच्या उपलब्ध जागांवर जास्तीत जास्त वृक्षारोपण करणे व संगोपन करण्याचे नियोजन करून विविध सामाजिक संस्था,पर्यावरण प्रेमी, सीआरएस देऊ इच्छिणाऱ्या कंपन्या यांना प्रस्ताव पाठवणे व वृक्षलागवडचे नियोजन करणे, जिल्ह्यातील मॉडेल म्हणून चिंचणी व भंडीशेगाव, ता. पंढरपूर येथील ग्रामीण पर्यटन केंद्र व ड्रीम गार्डन पाहणी करून त्याप्रमाणे इतर ठिकाणी पर्यटन केंद्र विकसित करणे आदी सूचना देशमुख यांनी यावेळी दिल्या.

# ‘फुले’-एका युगप्रवर्तक परिवर्तनाचा प्रवास रुपेरी पडद्यावर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

झी स्टुडिओज् प्रस्तुत,डान्सिंग शिवा फिल्म्स आणि किंग्जमेन प्रोडक्शन्स निर्मित यांच्या माध्यमातून फुले हा हिंदी चित्रपट जगभर येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी देशभर प्रदर्शित होत आहे.महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जातिनिर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनासाठीचे कार्य या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे.सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवनकहाणीला रूपेरी पडद्यावर मांडण्याचा हा प्रयत्न आहे.‘फुले’ चित्रपटाचे निर्माते प्रणय चोक्शी,जगदीश पटेल,रितेश कुडेचा,अनुया चौहान कुडेचा,सुनील जैन आणि डॉ.राज खवारे असून,सहनिर्मितीची जबाबदारी क्रांती शानभाग, कलापी नागडा,रोहन गोडांबे, परीधी खंडेलवाल यांनी उचलली आहे.दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी या चित्रपटाचं प्रभावी दिग्दर्शन केलं आहे. ज्योतिबा फुले यांच्या भूमिकेत स्कॅम १९९२ फेम प्रतीक गांधी आणि सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अभिनेत्री पत्रलेखा झळकणार आहेत.



# एक लाख वीस हजाराची फसवणूक

**बँक खाते सीझ करून पोलिसांनी मिळवून दिली रक्कम**


**ग्रामीण सायबर पोलिस ठाण्याची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

इन्शुरन्स क्लेम कट करण्यासाठी ओटीपी घेऊन एक लाख वीस हजारांची फसवणूक केली होती. ही रक्कम सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्याच्या टीम कडून संबंधिताचे बँक खाते सिझ करून परत मिळवून दिली.

यातील तक्रारदार यांना २१ मार्च २०२५ रोजी त्यांच्या मोबाईलवर फोन आला. समोरील व्यक्तीने तुमचे इन्शुरन्स क्लेम कट करावयाचे आहे असे सांगून त्याने ते तुमच्या बँक खात्यातून कट करीत आहोत असे सांगितले. त्यावेळी त्या व्यक्तीने तुम्हाला ओटीपी सांगावा लागेल अशी अट घातली. काही वेळाने आलेला ओटीपी तक्रारदाराने संबंधित व्यक्तीला पाठवून दिला. ओटीपी संबंधित व्यक्तीला दिल्यानंतर काही वेळाने त्यांच्या बँक खात्यातून एक लाख वीस हजार रुपये काढल्याचा मेसेज त्यांना आला. याबाबत एनसीसीआर पोर्टलद्वारे तक्रार नोंदवली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी बँकेशी संपर्क साधून ते खाते सिझ करण्यास सांगितले व तक्रारदाराची रक्कम पुन्हा त्यांच्या खात्यात परत मिळवून दिली. ही कारवाई पोलिस निरीक्षक विकास दिंडूरे यांच्या मार्गदर्शनाखाली स. पोलिस निरीक्षक रोहिदास पवार, पोलिस अंमलदार स्वप्निल सण्णके, अजित सुरवसे, आशुतोष कुलकर्णी, झहीरान नाईकवाडी यांनी केली.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (१०६)

### सहचित्तता

आज विजयादशमी. २०२२ सालातील संघ आज ९८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सर्वच सरसंघचालकांचे जीवन संघ हीच जीवन गाथा असेच होते. आजही आहे. या सर्वांचीच असू आम्ही सुखाने पत्थर पायातील। मंदिर उभविणे हेच आमुचे शील।। अशीच सहचित्तता होती व आजही आहे. त्यांच्या अथक प्रयत्नातून आज हिंदू जागरणाचा प्रभाव गतीत दिसतो आहे. डॉक्टरांनी संघाच्या वटवृक्षाचे एकमात्र बीज पेरले, आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. आता उत्तम साधना करून पान- फांद्या- फुल आणि फळ याचा बहर आणू या. आजच माननीय सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत म्हणाले त्यासाठी सर्वांनी एका स्थानावर एका विचाराने - एकत्रित व्हा. एक स्वरात- एकमनाने बोला. एकाच ध्येयाने एक मनाने- एक मताने प्रेरित व्हा. असा एकोपा - अशी एकजूट सहचित्तता निर्माण करेल. अर्थात त्यासाठी

सनातन / चिरपुरातन आणि नित्य नूतन यांनी एक साथ चालणे महत्त्वाचे आहे. सनातन शिवाय नित्य नूतन असेल तर ते कटी पतंग सारखे होईल. व नित्य नूतन शिवाय पुरातन असेल तर ते

युगानुकूल- देशानुकूल होणार नाही. समजा मला उत्तरेकडे हिमालय पर्वतावर जायचे आहे तर मी फक्त उत्तर दिशेने चालून हिमालय गाठू शकत नाही. उलट मी प्रवासात अनेक वेळा दिशा बदलून हिमालय गाठू शकेल. असे विविध वाटेने एकत्र येऊन भारत मातेला परम वैभवी बनवू या. ही आहे संघाची शिकवण.

**ठेवुनी चेहरा हसरा।**
**दु:ख सगळे विसरा।**
**सोनियाचा दिन आपुला।**
**तो विजयादशमी दसरा ।।**

विः - विजय मिळवूनी षड्रिपूंवरी।
जः- जय मिळवू या मनावरी ।।
याः- यातना कितीही झाल्या तरी।
दः- दररोज एक नियम पाळूया।
शः- शरणागत होऊश्रीरामचरणी।
मीः- मी पणा दूर सारू या।।
श्रीराम जय राम जयजयराम

मंत्रजप करुनी या शुभ दिनी। स्वतःला सार्थकी करू या।। विजयादशमीच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा ।।

।। भारत माता की जय ।।
। । वंदे मातरम् ।।

**क्रमशः**

# ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्यसंवर्धन आणि आयुर्वेदीय उपचार

आयुर्वेदामध्ये ६ ऋतूंचा उल्लेख आहे, जे भारत देशात निसर्गाने दिलेले आहेत हेमंत, शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा आणि शरद. होळीच्या सणासोबतच ग्रीष्म ऋतूचे आगमन होते. शिशिरानंतर वसंत ऋतूमुळे झाडांना नवीन पालवी फुटते. चारही बाजूंना हिरवळ पसरलेली असते, ज्यामुळे मनात एक नवीन उत्साह आणि आनंद निर्माण होतो. अशा वातावरणात सूर्यही हळूहळू आपल्या प्रखर किरणांनी उन्हाळ्याची चाहूल देतो.

ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण सूर्यकिरणांच्या तिव्रतेमुळे उष्णतेचा त्रास होऊन शरिरात विविध त्रास उत्पन्न होतात. म्हणून आयुर्वेदानुसार उन्हाळ्यात अशा पदार्थांचे सेवन करावे जे शरिरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. फळे आणि भाज्यांचे अधिक सेवन करावे. काकडी, कोशिंबीर, कांदा, पुदिन्याचा वापर अधिक करावा. भरपूर पाणी प्यावे.

सावधगिरी बाळगूनही कधी-कधी उन्हामध्ये फिरल्यामुळे उलटी, जुलाब, अपचन, पोटदुखी, ताप, लघवीला जळजळ, छातीत जळजळ, ॲसिडिटी इ. त्रास उत्पन्न होतात. यासाठी आयुर्वेदात ग्रीष्म ऋतूच्या ऋतुचर्ये अंतर्गत आहार-विहाराचे विस्तृत वर्णन केले आहे. याचे पालन केल्यास अनेक आजारांपासून व त्रासांपासून बचाव होतो. तसेच काही औषधी पदार्थांचा उपयोग केल्यास आरोग्य सुदृढ ठेवता येते. या ऋतूमध्ये लिंबू, कैरी, बेलफळ यांच्यापासून तयार केलेल्या पानकाचे (सरबत) सेवन करावे. गुलकंद आणि आवळ्याचा मुरंबा खावा. काही विशिष्ट लक्षणे आढळल्यास त्वरित आयुर्वेदात वर्णित औषधोपचार घ्यावेत.

१) पित्त वाढल्यास : ताज्या डाळिंबापासून बनवलेले बैद्यनाथ दाडिमावलेह घ्यावे. यामुळे दाह कमी करून त्वरित थंडावा मिलतो.

२) लघवीत जळजळ, वारंवार किंवा लालसर लघवी होणे असा त्रास होत असल्यास बैद्यनाथ गोक्षुरादि गुग्गुलु २ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्याव्यात. यासोबत बैद्यनाथ चंदनासव ४-४ चमचे जेवणानंतर दोन वेळा घ्यावे.

३) हैजा किंवा गॅस्ट्रो विकारया ऋतुत मोठया प्रमाणात जाणवतात पचनशक्ती कमी होऊन जुलाब होतात आणि शरीरातील पाण्याचे प्रमाणे कमी होते. अशावेळी बैद्यनाथ संजीवनी बटी घ्यावी. वारंवार आंवयुक्त जुलाब होत असल्यास बैद्यनाथ अमीबिका टॅबलेट १-१ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्यावी.

४) भूक न लागणे, अशक्तपणा व अरुची होणे, याप्रकारची लक्षणे जाणवल्यास बैद्यनाथ द्राक्षासव स्पेशल चे सेवन करावे.

५) ॲसिडिटी (अम्लपित्त) मध्ये आंबट ढेकर येणे, छातीत जळजळ होत असल्यास बैद्यनाथ सूतशेखर रस आणि बैद्यनाथ अविपत्तिकर चूर्ण घ्यावे.

या प्रकारे ग्रीष्म ऋतूमध्ये योग्य काळजी घेतली आणि दिनचर्या संयमित ठेवली तर गर्मीमुळे होणारे त्रास टाळता येतात व वरील औषधांच्या सहाय्याने आरोग्य टिकविता येते. आयुर्वेदिक औषधे वापरण्यापूर्वी आयुर्वेद तज्ञांचा सल्ला घ्यावा.

**-वैद्य रमेश शर्मा एम. डी. (आयुर्वेद)**
Customer Care No.: ८४४८४४४९३५
Website: www.baidyanath.co



# भारतीय योगा संस्थेचा स्थापना दिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

पूर्व विभाग श्री मार्कंडेय उद्यान केंद्रात भारतीय योगा संस्थेचा ५९वा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री मार्कंडेय योगा केंद्र, माधव नगर केंद्र, नवनाथ नगर केंद्र, गीता नगर केंद्र हनुमान मंदिर केंद्र ज्योती नगर केंद्र असे सहा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास भाजपच्या माजी नगरसेविका विजयाताई वड्डेपल्ली व माजी महिला व बालकल्याण समितीचे सभापती रामेश्वररी बिर्रु उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महिला साधकाने योगसाधना करून दाखविले. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. संस्थेचा परिचय जिल्हा प्रधान शेखर लक्ष्मेश्वर यांनी केला. विजयाताई यांन स्वतः योगा करीत सर्व महिला साधकांना योगा विषयी माहिती दिली.

आथितींचा सत्कार जिल्हा प्रधान शेखर, संघटन मंत्री लक्ष्मी दोरनाल, श्री मार्कंडेय उद्यान योगा केंद्राचे ज्येष्ठ योगा प्रशिक्षिका कांचना श्रीराम, केंद्र प्रमुख रेखा गोरंटी, उप केंद्रप्रमुख शोभा पुंडीपल्ली यांनी केले. बोगम यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास केंद्रप्रमुख सविता गजरे, प्रीती बनसोडे, वंदना दोनतुल, शिवराणी अदेली, वंदना येमुल, उपकेंद्र प्रमुख व साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### अक्कलकोटमध्ये मानाच्या काठ्यांची मिरवणूक, ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा

**अक्कलकोट दि १२ एप्रिल-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमासह चौथ्या दिवशीही मानाच्या काठ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मार्गावर विविध संघटना व समाजाकडून पेंडखजूर, सुगंधी दूध, लाडू, वाटप करण्यात आले. ग्रामदैवत मल्लिकार्जुन यात्रेतील मानांच्या काठ्यांचे मानकरी रत्नाकर पाटील, दयानंद रोडगे, शशिकांत लिंबूतोटे, संजयकुमार आडवीतोटे, मल्लिनाथ नंदीकोले यांनी आपापल्या काठ्यांना महाकाल हर हर महादेव, ब्रम्हांडनायक महांकाल अशी विविध सजावट करून गावातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या मार्गावर योगा ग्रुपच्या वतीने उपस्थित शिवभक्तांना पेंडखजुरीचे वाटप करण्यात आले. या ग्रुपचे अध्यक्ष राजकुमार उमराणीकर, कल्याणी पाटील, अशोक कलशेट्टी, विश्वनाथ देवरमणी, राजकुमार गोबर, विश्वनाथ करकी, श्रीकांत झिपरे, गोपीनाथ पाटील, प्रदीप हिंडोळे, सुनील गोरे, शिवाप्पा रामपुरे, नागेश ताडमारे, प्रकाश कोळी, वासुदेव देसाई, संतोष माडेकर, शशिकांत बिदरकोटी, अशोक चव्हाण, प्रितिष किलजे आदी उपस्थित होते. याप्रसंगी उत्सव शांततेत होण्यासाठी देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंगया स्वामी, विश्वस्त बसवराज माशाळे, महेश हिंडोळे, स्वामीनाथ हिप्परगी, राजकुमार नागोरे, मल्लिनाथ माळी यांनी परिश्रम घेतले.

### पिलीव बाजारपेठेत डुप्लिकेट पाचशे, दोनशे व शंभरच्या नोटांचा सुळसुळाट; व्यापारी वैतागले

**पिलीव दि १२ एप्रिल -**

सध्या चलनात किंवा व्यवहारात पाचशे ,दोनशे व शंभर रुपयांच्या नोटा सगळयात जास्त आहेत.खरेतर पाचशेची नोट तर व्यवहारात सगळयात जास्त आहे.




पण गेल्या काही दिवसापासून पिलीव बाजारपेठेत पाचशे,दोनशे व शंभर रुपयांच्या डुप्लीकेट नोटा व्यवहारात येऊ लागल्या आहेत. यामुळे व्यापारी व इतर सर्व सामान्य नागरिक अक्षरशः वैतागले आहेत. प्रत्येक वेळी या नोटा तपासुन घेणे खरेतर अजिबात शक्य नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा एखादा सर्व सामान्य माणुस असेल त्याला सहजासहजी डुप्लिकेट नोटाविषयी फारशी माहीती किंवा ती नोट डुप्लिकेट आहे हे लक्षात येत नाही. पण गेल्या काही दिवसापासून पिलीव व आसपासच्या भागात पाचशे ,दोनशे व शंभर रुपयांच्या डुप्लीकेट नोटांचा व्यवहारात अक्षरशः सुळसुळाट असल्याचे पाहवयास मिळत आहे. यामुळे ग्राहकांबरोबरच ,व्यापाऱ्यांना सुदधा याचा मोठा मनस्ताप होत आहे. तसेच मोठे आर्थीक नुकसान सोसावे लागत आहे. याबाबत ग्राहक तसेच व्यापारी यांनी सतर्क राहणे आवश्यक

> पिलीव भागात गेल्या काही दिवसापासून पाचशे, दोनशे, शंभर रुपयाच्या डुप्लीकेट नोटांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे मोठे आमचे मोठे आर्थीक नुकसान होत आहे.
>
> **- जुबेर पठाण हॉटेल व्यावसायिक, पिलीव.**



### पंढरपूर अधिवक्ता संघातर्फे महात्मा फुले जयंती साजरी

**पंढरपूर, दि.१२ एप्रिल-**

येथील अधिवक्ता संघाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९७ वी जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी विलास साळुंखे होते. प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष राजेश चौगुले यांनी केले. सचिव अभयसिंह देशमुख यांनी महात्मा फुलेंच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. सी.एस. बनसोडे व सत्यम धुमाळ यांचेही भाषण झाले. यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ अखिलेश वेळापुरे यांनी पंढरपूर अधिवक्ता संघाच्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. या कार्यक्रमांमध्ये अॅड. वसंतराव भादुले, एम.आर. देशमुख, एस.आर.पाटील, अॅड.बाबर, अॅड.यादव, अॅड. सुमित साळुंखे, अॅड.एन.डी. शिंदे, अॅड. आर.टी. कोष्टी, अॅड. गणेश चव्हाण, अॅड.विजयकुमार नागटिळक, अॅड. राहुल पारसे, उपस्थित होते. आभार प्रदर्शन उपाध्यक्ष अॅड. महेश कसबे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. रेखा यादव यांनी केले.

### यशवंत बुद्ध विहार संस्थेतर्फे महात्मा फुले जयंती साजरी

**माळीनगर, दि.१२ एप्रिल-**

येथील भारतीय बौद्ध महासभा प्रणित यशवंत बुद्ध विहार संस्थेच्यावतीने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त महात्मा फुले यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे जग बदलणारा बापमाणूस चे लेखक जगदीश ओव्हाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन माळीनगरचे उपसरपंच अतुल कांबळे यांनी केले. तथागत गौतम बौद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन प्रकाश कांबळे यांच्या हस्ते तर विविध महापुरुषांना ग्रा.पं सदस्य लक्ष्मण डोईफोडे, मच्छिंद हजारे, दिपक दळवी, सुभाष कांबळे, अजित नाईकनवरे, वंचितचे उमेश जगताप, कांतीलाल भाले, संजय तडवळकर, अमोल जगताप, बलभिम नाईकनवरे, सुशांता जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संतोष जगताप, कांबळे सर, तात्या ओव्हाळ, अशोक लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. ग्राम पंचायतच्या वतीने यशवंत बुद्धविहार येथे सरपंच अनुपमा एकतपुरे, प्रदिप निंबाळकर यांनी म.फुले यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच अभिमान जगताप यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमंत माने यांनी केले.

# जीवनात येणारे बदल सकारात्मकपणे स्विकारा : शिरगावकर

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि १२ एप्रिल**

ऑनलाईन पद्धतीने होणारे हनी ट्रॅप, बँक बॅलन्स रिकामे करणारे कॉल याकडे दुर्लक्ष करा तर कष्ट आणि मेहनतीवर विश्वास ठेवा. कुठल्याही केलेल्या कार्याचा सन्मान इतरांना प्रेरणा देतो तसेच जीवनात येणारे बदल सकारात्मकपणे स्वीकारावे. सर्व चांगल्या कामासाठी पोलीस प्रशासनाकडून महावितरणला नेहमीच सहकार्य राहील असे प्रतिपादन अकलूज विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांनी केले.



आर्थिक वर्ष मार्च २०२५ अखेर अकलूज विभागांमध्ये चालू व थकीत विजविले वसूल करून महावितरणचा महसूल वाढवल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी 'गौरव सांघिक कामगिरीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना उपविभागीय पोलीस अधिकारी शिरगावकर, महावितरणचे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संदीप कोकरे, यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री. शिरगावकर बोलत होते.

यावेळी बोलताना कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे म्हणाले की वर्षभरात सर्व अधिकारी व कर्मचारी हे वादळ वारे पाऊस यामध्ये वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अतोनात प्रयत्न करतात तर वीज बिल वसुली ही तितक्याच जोमाने केली आहे सांघिक कामगिरी, विजचोरी रोखणे, नवीन वीज जोडणी देणे, रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण कमी असणे अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शाखा कार्यालयांचा प्रोत्साहनपर सन्मान करण्यात आला आहे.

त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी यापुढेही सांघिक काम केल्यास त्यांना निश्चित यश मिळेल असे प्रतिपादन कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी अकलूज विभागातील उपकार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता व सर्व कर्मचारी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता स्वानंद शिंदे यांनी केले.

# दिवसाला शंभर रुपयांवर आम्ही काम करतोय, आमचा प्रश्न विधिमंडळात मांडा

### अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचारी संघटनेची आमदार अॅड. सोपल यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ एप्रिल**

आरोग्य खात्यामध्ये अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर या काम करीत असून त्यांना गेली कित्येक वर्ष राज्य शासनाने पगारवाढच केली नाही, राज्य सरकार महिन्याला एकोणतीनशे रुपये तर केंद्र सरकार महिन्याला शंभर रुपये देते असे एकूण तीन हजार रुपये वेतनावर या महिला काम करतात. दिवसाला शंभर रुपये पगारावर आमचे कसे भागणार, आमचा प्रश्न विधिमंडळामध्ये मांडावा. तसेच एकवीस हजार रुपये वेतन वाढ करावी, असे पत्र आरोग्यमंत्र्यांना द्यावे अशी मागणी कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली बार्शीचे आमदार अॅड. दिलीप सोपल यांच्याकडे करण्यात आली.



लाडकी बहिण योजनेचा लाभ नाही, पद अर्धवेळ असून देखील पूर्ण वेळ काम करावे लागते, प्रवास भत्ता नाही, राष्ट्रीय सणांच्या व महापुरुषांच्या जयंतीच्या शासकीय सुट्ट्या नाहीत, रजा नाही, गणवेश नाही , आयडेंटी नाही, बोनस , ग्रॅज्युटी , निवृत्ती वेतन नाही, कोरोना काळातील विशेष भत्ता नाही असे काहीच नाही अशा कठीण परिस्थितीत या अर्धवेळ ताई लोकांचे आरोग्य सांभाळत आहेत, ही गोष्ट अत्यंत वेदनादायी असल्याने त्यांची पगार वाढ व्हावी यासाठी विधीमंडळामध्ये प्रश्न मांडावा, अशी मागणी आयटक संलग्न अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचय संघटनेने निवेदनाद्वारे आमदार ड. सोपल यांचेकडे केली. यावेळी आमदार ड. दिलीप सोपल यांनी उपस्थित महिलांसोबत त्यांचे प्रश्न ऐकून घेत चर्चा केली व 'मी पुढील अधिवेशनामध्ये हा प्रश्न विधीमंडळामध्ये उपस्थित करीन, व आरोग्यमंत्र्यांना पत्रव्यवहार करीन', असे आश्वासन दिले. यावेळी कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे, संघटना सचिव डॉ. प्रविण मस्तुद, आशिया शेख , बाई चेंडगे, शितल करडे, तोळाबाई ओव्हाळ, महानंदा मोटे, मैना तोरणे , प्रमिला शिंदे , सुशीला धावारे, जयश्री नगरे, सुवर्णा नेंदाने , सरस्वती उंबरे, शांता जाधव, उषा कांबळे, जयश्री नवले आदी उपस्थित होते.

# चपळगाववाडीची यात्रा आजपासून; यंदाही भाकरी आमटीचा महाप्रसाद

### अनेक वर्षांची परंपरा, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १२ एप्रिल**

चपळगाववाडी (ता. अक्कलकोट) येथील लिंगोद्भव रेणुकाचार्य मंदिराची यात्रा रविवारी १३ एप्रिलपासून सुरू होत आहे. या यात्रेत यंदाही महाप्रसाद म्हणून जोड गव्हाच्या खिरीबरोबर कडक भाकरी, आमटी, भात, सोबत दूधातुपाची धार, कैरी, कांदा, काकडी, गाजर, मेथी, लोणची असा महाप्रसाद असणार आहे.



अनेक ठिकाणी यात्रांमध्ये शिरा, लापसी, खीर, कडी, भात असा महाप्रसाद असतो. मात्र येथील यात्रेत हा वेगळा मेनू असतो. धर्मप्रसारासाठी जगद्गुरु रेणुकाचार्य सतत विश्वाच्या भ्रमंतीवर असायचे. त्यांनी भ्रमंती करताना जेथे विश्रांती घेतली, मुक्काम केला तेथे त्यांची आठवण म्हणून भक्तांनी मंदिरे उभी केली आहेत. येथेही जगद्गुरु रेणुकाचार्यांचे भव्य मंदिर आहे. या मंदिराची यात्रा रविवारी १३ एप्रिलपासून सुरू होत आहे. या यात्रेत धार्मिक विधीबरोबरच सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. यात्रेत निघणाऱ्या पालखी मिरवणुकीत मानाचे नंदीध्वज मोठ्या डौलाने मिरविले जातात. हे मोठे आकर्षण आहे. हे नंदीध्वज बांधण्याचे काम प्रा. धुळप्पा गोविंदे हे अविरत २५ वर्षांपासून करतात. या कामात त्यांना त्यांचे कुटुंबीय व ग्रामस्थांची मदत होते. पालखी धरण्याचा मान प्रा. धुळप्पा गोविंदे यांचे पुतणे सतीश गोविंदे यांना आहे. प्रा. धुळप्पा गोविंदे हे चपळगाववाडी दहिटणेवाडी, हालहळ्ळी (अ), कर्जाळ, तीर्थ, चपळगाव येथील नंदीध्वज बनवतात. कुस्तीने यात्रेची सांगता होते. जिल्ह्यासह परराज्यातील मल्ल या कुस्तीमध्ये सहभागी होतात. देश-विदेशात असलेले गावासह पंचक्रोशीतील भक्त यात्रेत सहभागी होतात. येथे यात्रा कालावधीत मांसाहार, मद्यपान किंवा अमान्य असलेल्या गोष्टीला पूर्णपणे बंदी असते.

> जगदगुरु रेणुकाचार्य धर्मप्रसारार्थ फिरत असता चप्पळगाववाडी येथे आले तेव्हा गावकऱ्यांनी भक्तानी त्यांना भोजनासाठी तुम्ही काय खाणार असे विचारले तेव्हा त्यांनी काकडी, गाजर, कैरी, मेथी, कडक भाकरी, आमटी असे बोलले. तेव्हापासुन यात्रेत भाविकाना कडक भाकरी, आमटी, खिर, भात असा प्रसादाचा मेनु असतो. हा प्रसाद पंचक्रोशीतच नव्हेतर महाराष्ट्रसह सिमावर्ती कर्नाटक, आंध्र प्रदेशातही प्रसिद्ध आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी महात्मा फुले जयंती साजरी

## पिलीव येथील शिबीरात ४१ जणांचे रक्तदान

**तभा वृतसेवा**
**पिलीव, दि. १२ एप्रिल -**

पिलीव (ता.माळशिरस) येथील माळी ब्रिगेड, समता परिषद व भाजपाप्रणीत आघाडीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या रक्तदान शिबीरात ४१ जणांनी रक्तदान केले.



यावेळी महीलांचा सहभाग होता. माजी सरपंच नितीन मोहीते, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, डॉ. निलेश कांबळे, हनुमंत पिसे, बाजीराव जाधव, दादा जाधव, अशोक जाधव, उत्तम मोहिते, समाधान जाधव, बापु पिसे, अजिंक्य पिसे, बबलु जाधव, किशोर जाधव, सुनिल जाधव, खंडु फुले, विक्रम जाधव, गोरख जाधव, राजेंद्र मोहिते, राजु मलकनेर, दिपक जाधव, सर्जेराव जाधव, विठ्ठल जाधव, सिद्धेश्वर जाधव यांनी रक्तदान करुन परिश्रम घेतले. यावेळी महादेव एकतपुरे, अमोल पिसे, अजिंक्य पिसे, सौरभ जाधव, रोहीत जाधव यांनी विशेष परीश्रम घेतले. रक्तसंकलन सोलापूर येथील सिद्धेश्वर ब्लड बँकेच्या वतीने करणयात आले.

## बार्शीत कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ एप्रिल-**

बहुजन समाजाच्या ऱ्हासाचे कारण केवळ पिढ्यानपिढ्या असणारे अज्ञान हे निक्षून सांगत या समाजाच्या हितासाठी आपली इस्टेटच नाही तर आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावणारे महात्मा फुले हे खरोखरंच क्रांतीसुर्य होते. त्यांचा समाजहिताचा वैचारिक वारसा जतन करणे वा पुढे घेवून जाणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे, असे विचार वृक्षमित्र तथा गायक सुनिल फल्ले यांनी व्यक्त केले.



क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात साजरी करण्यात आली. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. क्रांतीसुर्य म.फुले त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते सुहास बप्पा सुतार होते. यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. सामाजिक कार्यकर्ते सतीश पाचकुडवे, प्रेम अग्रवाल, बुध्दप्रिय कांबळे, अमित कदम, लक्ष्मीकांत सागरे, प्रेम लोंढे यांचेसह सभासद व वाचक उपस्थित होते. प्रास्तविक विनोद गायकवाड यांनी व्यक्त केले.



## कुर्डूवाडीत मान्यवरांच्या हस्ते पूजन

**कुर्डूवाडी,दि.१२ एप्रिल-**

येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आमदार नारायण आबा पाटील, माजी आमदार संजय मामा शिंदे, युवा नेते दिग्विजय बागल, धर्मवीर धनंजय डिकोळे, बापूसाहेब जगताप यांच्या हस्ते महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन उद्योजक विशाल गोरे यांनी केले होते.

यावेळी रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण व विविध क्षेत्रातील तज्ञ आदर्श पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. राजेंद्र दास यांचे अध्यक्षीय भाषण झाले. यावेळी शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, माजी नगराध्यक्ष संजय गोरे, ऋषिपाल वाल्मिकी, अर्जुन बागल, अरुण काकडे, दत्ताजी काकडे, अमरकुमार माने, संजय टोणपे, किसन हनवते, संजय साठे, संजय अस्वरे, बापू शिरसागर, प्रा. ननवरे, मोहसीन मखणू, श्रीकांत पाटील, हरी बागल, उमेश पाटील, प्रकाश अण्णा गोरे, सूर्यकांत दादा गोरे, बबलू कांबळे, माणिक श्रीरामे, बाबा साळवे, , मिलिंद कराडे, लक्ष्मण भोंग, सिद्धेश्वर मोहिते, आयुब मुलाणी, फिरोज खान, सुहास शहा, रवी आठवले, संतोष शेंडे, अरुण काकडे, शिवाजी गवळी, अमीर मुलानी, चंद्रकांत वाघमारे, राजू शेंबडे, पांडुरंग सुतार,,नाशिर बागवान ,जगताप मेजर,,कुमार व्यवहारे, अमोल सातव, सोमनाथ माळी, ललित उपासे, सार्थक भंडारे, विनायक सातव, प्रतिक आदलिंगे, कृष्णा गोरे, सुरेश मस्के सचिन माळी, नागजी माळी, संजय आदलिंगे, अमर जगताप, हरिभाऊ गोरे, राजू भांडे, हंबीरराव गोरे, अतुल गोरे, किरण रिकिबे, अमर जगताप, गणेश शेजाळ, श्रीनाथ माळी, शशिकांत गोरे, प्रकाश आतकर, संतोष खारे, महेश गोरे, बिभीषण गोरे, धनंजय भोसले, दत्ता भानवसे, प्रकाश झुंडरे, विशाल गोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर क्षिरसागर तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन माळी यांनी केले.

## माळीनगर येथे विविध संस्थांचा सहभाग

**माळीनगर, दि.१२ एप्रिल-**

थोर समाजसेवक व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती माळीनगर येथे आज शुक्रवारी सकाळी१० वा.विविध संस्थांच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.



येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या विश्रामगृहा समोरील क्रांतीसुर्य म.फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे,होलटाईम डायरेक्टर परेश राऊत,होलटाईम डायरेक्टर गणेश इनामके,व्हा.चेअरमन निखिल कुदळे,संचालक सतीश गिरमे,संचालक राहुल गिरमे,ग्रा. पं.सरपंच अनुपमा एकतपुरे,उपसरपंच अतुल कांबळे,सदस्य लक्ष्मण डोईफोडे, मच्छिंद्र हजारे,माजी सरपंच अभिमान जगताप तसेच दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार ज्योती लांडगे, संचालक पृथ्वीराज भोंगळे,दिलीप इनामके,म.फुले पतसंस्थेचे संचालक अंकुश फुले,कृष्णा भजनावळे,जयवंत चौरे,सेक्रेटरी योगेश कचरे,शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे, व्हा.चेअरमन कपिल भोंगळे, संचालक नामदेव आगम,संचालिका विद्या गिरमे,अलका बोरावके,माजी पं.स.सदस्या सुशांता जगताप,मॉडेल हायस्कुलचे उपप्राचार्य रितेश पांढरे,माजी प्राचार्य प्रकाश चवरे,राजीव देवकर, अमित टिळेकर, अनिल बनकर, एज्युकेशन सोसायटीचे सर्व विभागाचे शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी तसेच सर्व समाज बांधव,व्यापारी वर्ग,कारखान्याचे सभासद,भागधारक,शेतकरी,अधिकारी वर्ग,खाते प्रमुख व कर्मचारी,ग्रामस्थ आणि माळीनगरच्या विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार व पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

## महात्मा फुले यांच्या कार्यामुळे समाज परिवर्तनास गती मिळाली : कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ एप्रिल-**

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण, अस्पृश्य उद्धार, शेतकरी व शेतमजूर यांना न्याय देण्याची भूमिका घेतल्यामुळे समाजपरिवर्तनास गती मिळाली असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभागाने आयोजित केलेल्या महात्मा फुले जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा



फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी केले. सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा जनाबाई चौधरी, प्रा शीतल फुटाणे, प्रा प्राची गणेचारी आदी उपस्थित होते.

> **महात्मा फुले यांना भारतरत्न द्यावे**
>
> पुणे येथील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा महात्मा फुले यांनी सुरू केली. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून योगदान दिल्यामुळे महिला सक्षम झाल्या. त्यांच्या समग्र कार्यामुळेच देशाचा विकास झाला. त्यामुळे त्यांना भारतरत्न ही सर्वोच्च पदवी देऊन सन्मानित करावे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मंद्रुपमध्ये हनुमान जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

प्रभू श्री राम भक्त हनुमान यांची जयंती मंद्रूप मध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. मधला मारुती चौकातील हनुमान मंदिरात पहाटे मूर्तीस महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर पहाटेपासून मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी अबालवृध्दांसह महिला भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

मधला मारुती चौक येथील हनुमान मंदिरात यात्रा कमिटीकडून महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. यावेळी तुकाराम जेऊरकर, सोलापूर जिल्हा दूध संघाचे माजी संचालक प्रभाकर कोरे, काशिनाथ जेऊरकर, सकळेश्वर पुजारी, अशोक म्हेत्रे, नागनाथ भागवत, जगनाथ भागवत, सोनेंद्र जेऊरकर, राम घाटे, उत्कर्ष भागवत, विजयकुमार मेंडगुदले, युवराज कोरे, निलेश निर्मळे, समर्थ पुजारी, ओम मुंजे आदि उपस्थित होते. विठाई नगर येथील शनी मंदिरातही हनुमान जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी श्री. ग्रामोपध्याय यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी राजकुमार अतार महाराज, संतोष तेली, अरुण देशपांडे, दिलीप धोत्रे, राजु दळवी, भागणा कल्याणी, बाळू उतरे, गोपाळ देविदास, दत्ता परांडे, संतोष व्हनमाने, शरणप्पा हेळवी आदींची उपस्थिती होती. हनुमाननगर येथील मंदिरातही सकळेश्वर पुजारी यांच्या हस्ते मूर्तीची पूजा करण्यात आली. यंदा शनिवारी हनुमान जयंती आल्याने भाविकांची दर्शनासाठी मोठी होती.



## महत्वाचे...



### कंदलगाव येथे २५३ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १२ एप्रिल -**

कंदलगाव येथील ग्रामदैवत श्री केदारेश्वर यात्रेनिमित्त यात्रा कमिटी व ग्रामपंचायत व सिध्देश्वर ब्लड बँक सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५३ रक्तदात्यांनी रक्तदान केला. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सरपंच शारदाताई कडते यांच्या हस्ते करण्यात आल. यावेळी मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यात्रा कमिटीचे चंद्रकांत निंगफोडे, बाबासाहेब पाटील, हणमंत कोरे, विठ्ठल साबा , शरीफ शेख, बाबुराव कोले, काशिनाथ पाटील, शिवशंकर सोन्ने, आनंद कोले, गणपती कुंभार, आण्णाराव वाघमारे, उपसरपंच अमित नरुटे, युवा नेते धनेश कडते, प्रशांत कडते, प्रकाश कोरे यांच्यासह यात्रा कमिटीचे सदस्य व ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.



### काळमवाडी येथे खा.मोहीते-पाटील वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**पिली, दि. १२ एप्रिल -**

खासदार.धैर्यशील मोहीते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त काळमवाडी (ता.माळशिरस) येथे माजी सरपंच तथा शिवामृत दुध संघाचे संचालक दादासाहेब शिंगाडे यांच्या वतीने व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तानाजी बंडगर यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संजय शिंगाडे, विक्रम शिंदे, सुरेश शिंदे, विकास शिंदे, संतोष शिंदे, शिवाजी घूले, धनाजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, समाधान दुपडे, संग्राम आवताडे, संजय दुपडे, सज्जन पवार, विजय गोरे, अंगणवाडी सेविका, मुख्याध्यापक योगेश हावळे, धनवडे सर आदी मान्यवर उपस्थित होते.




### माढ्यातील दोशी हॉस्पीटलच्या रक्तदान शिबिरात ८६ रक्तदात्यांचे रक्तदान

**माढा, दि. १२ एप्रिल -**

येथील दोशी हॉस्पिटलच्यावतीने भगवान महावीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच हनुमान जयंतीनिमित्त झालेल्या शिबिरात ८६ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन डॉ. पंकज दोशी व डॉ. सुतेजा यांच्या हस्ते धन्वंतरी प्रतिमेच्या पूजनाने झाले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राजेश दोशी, राजू लटके मित्र परिवार, सकल जैन समाज, बीबीएस ग्रुप, जय संघर्ष ड्रायव्हर संघटना, केमिस्ट अँड ड्रगेस्ट असोसिएशन, नांदकनाथ परिवार तसेच दशनाम गोसावी संघटना सदस्यांचे व मंडळाचे सहकार्य लाभले. ह्या शिबिराचे रक्त संकलन भगवंत ब्लड बँक बार्शी यांनी केले. डॉ दोशी यांचे शालेय जीवनातील मित्रपरिवाराने देखील उपस्थित राहून रक्तदान केले. डॉ पंकज दोशी यांनी यावेळेस सांगितले की उन्हाळ्यात बऱ्याच ठिकाणी रक्ताचा साठा कमी प्रमाणात असतो. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात रक्तदान शिबिर घेणे खूप महत्त्वाचे असते. रक्ताची आवश्यकता भासणाऱ्या रुग्णाला या शिबिरामुळे रक्त उपलब्ध होऊ शकते, ही गरज लक्षात घेऊन भगवान महावीर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर व हनुमान जयंतीचे औचित्य साधून आम्ही रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. यावेळी त्यांनी रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचे व या शिबिरात सहकार्य केलेल्यांचे दोशी हॉस्पिटलच्या वतीने आभार मानले.



### सांगोल्यात हिंदू जनजागृती समितीच्या वतीने गदा पूजन

**सांगोला, दि. १२ एप्रिल -**

हिंदू राष्ट्र स्थापनेच्या कार्यासाठी आपल्याला मारुतीरायांची आणि त्यांच्या शौर्यरुपी आशीर्वादाची आवश्यकता आहे. हाच उद्देश ठेवून शनिवार दि.११ एप्रिल रोजी श्री हनुमान जयंतीच्या निमित्ताने सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने श्री अंबिका देवी मंदिर येथे गदा पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणपत पटेल, अजय तेली, श्रेयश तोडकरी, बिरुदेव आगलावे, रुद्रेश स्वामी, भिमाराम चौधरी, डॉ.मानस कमलापूरकर, तनसुख पटेल, अमर गुळमिरे उपस्थित होते. प्रारंभी नामजप, मारुतीस्रोत म्हणून घेण्यात आले. त्यानंतर नेहा कावळे आणि नवनाथ कावळे यांनी गदा पूजन केले. शंखनाद श्रेयश कावळे, हिंदू राष्ट्र स्थापनेची प्रतिज्ञा दुर्गेश कावळे यांनी घेतली. सूत्रसंचालन संतोष पाटणे यांनी केले.

# मंद्रुप बनतेय सोने खरेदी-विक्रीची मोठी बाजारपेठ

## ●दररोज होते पंचवीस लाखाहून अधिक उलाढाल; कर्नाटकातील ग्राहकही येतात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असणारे व सीना भीमा खोऱ्यातील मध्यवर्ती ठिकाण असणारे मंद्रूप हे गाव सोन्या-चांदीच्या व्यापारासाठी महत्त्वाची बाजारपेठ ठरत आहे. येथे दररोज सोने खरेदी विक्रीची सुमारे पंचवीस लाख रुपयांची उलाढाल होत आहे. कर्नाटकातील इंडी, चडचण या परीसरातील शेकडो ग्राहक सोने खरेदीसाठी मंद्रूपला येत आहेत.

गेल्या दोन वर्षात सोन्याने ९० हजार रूपयांपर्यंत मजल मारली आहे. महागाईच्या दिवसातही सोने खरेदीकडे महिलांचा अधिक कल असल्याचे दिसून येते. दक्षिण तालुक्यातील सीना-भीमा परीसरातील टाकळी, वडापूर, गुंजेगाव, कंदलगाव, निंबर्गी, भंडारकवठे, औज, माळकवठे, वांगी, हत्तूर, वडकबाळ, औराद व बरूरसह इतर गावातील ग्राहकांची सोने खरेदीसाठी वर्दळ मंद्रूप येथे दिसून येते. या परिसरातील ग्राहकांची सोने खरेदीची मोठी सोय या



बाजारपेठेमुळे झाली आहे. दिवसेंदिवस सोन्याचे दर वाढत असतानाही महिला विविध दागिने बनवणे व सोने खरेदी करण्यास पसंती देत आहेत. त्यामुळे मंद्रूपमधील सोन्याच्या दुकानांमधून मोठ्या प्रमाणात सोने खरेदी-विक्री होत आहे. मंद्रूपमध्ये सोने खरेदी व विक्रीचे दहा दुकाने आहेत . प्रत्येक दुकानात सोने खरेदीसाठी महिलांची व ग्राहकांची गर्दी दिसून येते. याशिवाय दिवाळी, गुढीपाडवा, दसरा, बसवजयंती व अक्ष्य्यतृतीया यासारख्या सणात व चांगल्या मुहूर्तावर सोने खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी दिसून येते. दोन वर्षांमध्ये सोन्याच्या दरामध्ये २५ ते ३० हजार रुपयापर्यंत वाढ झाली असतानाही सोन्याच्या व्यापारामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात उलाढाल होत आहे.

गुढीपाडव्यादिवशी मंद्रूपमध्ये अंदाजे पाच किलो सोन्याची विक्री झाले असून पाच कोटीपर्यंत उलाढाल झाल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे मंद्रूप हे गाव सोने खरेदी व विक्रीसाठी महत्त्वाचे बाजारपेठ ठरत आहे. चडचण येथे कापड खरेदी करण्यासाठी जाणार्या ग्राहकांकडून मंद्रुपमध्ये सोने खरेदी करण्यासाठी अधिक पसंती आहे. शिवाय सोन्याच्या व्यापारामुळे इतर व्यवसायांकडेही ग्राहक जाथ असल्याने त्यांचे व्यवसाय वाढीस हातभार लागत आहे.

### ग्राहकांची सोने खरेदीसाठी मंद्रूपला पसंती



सीना भीमा खोर्यासह कर्नाटकातील महिला मंद्रुपला सोने खरेदी करण्यासाठी अधिक पसंती देत आहेत . मंद्रूपमध्ये शुद्ध सोन्याची विक्री होत असल्यामुळे महिला दागिने बनवण्यासाठी सोने खरेदी करताना दिसून येत आहेत. त्यामुळे मंद्रूपमध्ये सोने खरेदीचे बाजारपेठ तयार होत आहे. सोने चांदीचे दुकाने मोठया प्रमाणात असल्याने महिला ग्राहकही आकर्षित होऊन नवनवीन डिझाईनचे दागिने खरेदी करतात.

**- सतीश वेर्णेकर, अध्यक्ष, सराफ संघटना मंद्रुप**

### महिलांची गर्दी अधिक



लग्नसराईत व इतर चांगल्या मूहूर्तावर सोने खरेदी करण्यासाठी मंद्रुप परीसरातील महिला ग्राहकांची मोठी गर्दी असते. सीमावर्ती भाग असल्याने कर्नाटकातील ग्राहकही सोने खरेदी करण्यासाठी मंद्रुपला येतात. विविध प्रकारचे डिझाईन असलेले दागिने तयार करून दिले जात असल्यामुळे दुकानात गर्दी असते.

**- बसवराज सुतार, विश्वकर्मा ज्वेलर्स मंद्रुप**

### मंद्रुपमध्येही सराफ कट्टा

मंद्रुपमध्ये महात्मा बसवेश्वर चौक व माळी गल्ली परीसरातील मुख्य रस्त्यांवर सोने चांदीचे आठ दुकाने आहेत. शिवाय मुख्य रस्त्यांवर इतर परीसरात दोन ते तीन दुकाने असल्याने सराफ कट्टा तयार झाला आहे. यामुळे महिलांना सोने पसंतीसाठी पर्यायी दुकाने उपलब्ध आहेत. सराफ कट्टा असल्याने दररोज ग्राहकांची रेलचेल दिसुन येते.

## माळशिरस येथे श्री हनुमान जयंती साजरी

**▸ मारुती चरणी एक किलो चांदीचा हार अर्पण**

**तभा वृत्तसेवा**
**सदाशिवनगर, दि.१२ एप्रिल-**

माळशिरस येथील जागृत हनुमान मंदीरात श्री हनुमान जयंती उत्साहात व मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली. पुणे येथील विनायक ठवरे यांनी आज हनुमान जयंतीचे औचित्य साधून श्री मारुती चरणी एक किलो चांदीचा हार अर्पण केला.

या मंदिरातील हनुमानाची मूर्ती कललेली आहे. त्यामुळे या हनुमानास झोपाळु हनुमान असेही म्हणतात. ही हनुमानाची मुर्ती जागृत असुन भाविकांची मोठी श्रद्धा आहे. हनुमान जयंती निमीत्त मंदीरात शुक्रवारी रात्री जागर करण्यात आला. शनिवारी पहाटे पाच ते सुर्योदयापर्यंत ह. भ. प. कैवल्य महाराज चातुर्मासे यांचे किर्तन झाले.

सूर्यादयाला उपस्थित भक्तांनी गुलाल व फुले टाकून हनुमान जन्मोत्सव साजरा केला. यावेळी पहाटेपासूनच नागरिकांनी गर्दी



**येथे नुकताच श्री रामदेव व श्री मारुती देव या मंदिरांचा जिर्णोद्धार करण्यात आला असून अत्यंत देखणे मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरात प्रशस्त सभामंडप झाला असून जीर्णोध्दारानंतरचा यंदा पहिला मारुती जन्मोत्सवाचा सोहळा होता.**

केली होती. यात माहिलांची उपस्थिती लक्षणीय होती. ही हनुमानाची मुर्ती स्वयंभु असल्याने अनेक भाविक या हनुमानास नवस बोलतात व आज हनुमान जयंती दिवशी हे भक्त आपले बोललेले नवस फेडण्यासाठी येतात. हनुमान जयंती निमीत्त मंदीरात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच दिवसभर परिसरातील नागरीकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती मंदीरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंदीरात नारळ वाढविण्यासाठी आज पाटील कुटुंबाचा मान असतो त्यामुळे माळशिरसचे पोलीस पाटील शितल पाटील व त्यांचे कुंटुबीय मंदीरात उपस्थित होते. हनुमान जयंती निमीत्त मंदीर परिसरात यात्रा भरली होती, या यात्रेत अनेक प्रकारची दुकाने थाटण्यात आली होती. लहान मुले व माहिलांनी खरेदीसाठी एकच गर्दी केली होती. सायंकाळी पालखीतून 'श्री' च्या पादुकांची नगर प्रदक्षिणा काढण्यात आली.



## सांगोला तालुक्यात माणगंगा नदीच्या दुबार स्वच्छतेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ एप्रिल-**

सोलापूरसह सातारा, सांगली जिल्ह्यातून १६५ कि.मी. वाहणाऱ्या माणगंगा नदीची माणगंगा भ्रमण सेवा संस्था, बृहद भारत संस्था, नदीकाठची गावे व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त सहयोगातून दुबार स्वच्छतेचा शुभारंभ वासूद, अकोला, वाढेगाव व बलवडी या ठिकाणी नुकताच करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, उद्योगपती सुदाम मोरे, साहित्यिक पुरषोत्तम फुले, वासुदचे सरपंच संभाजी चव्हाण, अकोल्याचे सरपंच शशिकांत गव्हाणे, माजी सरपंच किशोर शास्त्रे, चंद्रकांत सावंत, डॉ.अशोक शिंदे, विजय भोरे, रणजीत सावंत, कृषी विभागाचे बाळासाहेब सावंत, मनोज जाधव, बाळासाहेब केदार, राजेंद्र शिंदे, भगवान भोरे, तानाजी केदार, भगवान केदार तसेच वाढेगाव येथे सरपंच कोमल डोईफोडे, सुरेश डोईफोडे, उपसरपंच शिवाजी दिघे, माजी सरपंच नंदकुमार दिघे, डॉ. धनंजय पवार, दत्ता पाटील, ग्रा. पं.सदस्य राहुल घोंगडे, दत्तात्रय शिनगारे, सागर ऐवळे, प्रतिभा भगत, दीपक दिघे, सोमनाथ वसमळे, माजी उपसरपंच अनिल दिघे, आण्णासो गस्ते, दादासो ऐवळे, प्रदीप इंगोले, ज्ञानेश्वर तंडे, नवनाथ दिघे, अमर माने, गुंडा साळुंखे, आप्पा कोळी, नितीन गेजगे, ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी दिपाली जाधव सुदाम भोरे, डॉ.धनंजय पवार, दीपक दिघे यांनी मनोगत मांडले. राहुल घोंगडे यांनी आभार मानले.

चार वर्षापूर्वी लोकसहभागातून ७५ कि.मी. माण नदीपात्र व १८ बंधारे स्वच्छ केले होते. चिलार बाभळीमुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. आत्तापर्यंत लोकसहभागातून अडीच कोटीहून अधिक खर्च केला आहे. ही नदीची स्वच्छता नाही टिकवली तर नदीची आणखी दुरावस्था होईल, म्हणून दुबार स्वच्छता हाती घेतली आहे.

**-वैजिनाथ घोंगडे, अध्यक्ष, माणगंगा भ्रमण सेवा संस्था**

# सुवासिनींसह विधवांचीही भरली ओटी

## बोरीउमरगेत पुराण समितीतर्फे वेगळा आदर्श; देवी चरित्रावरील पुराण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ एप्रिल**

श्रीक्षेत्र बोरीउमरगे (ता. अक्कलकोट) येथील धत्तरगी भाग्यवंती देवी चरित्रावरील पौराणिक कार्यक्रमात सर्व समाजातील कुमारिका, सुवासिनींसह विधवा महिलांचीही ओटी भरणा व हळदी-कुंकू कार्यक्रम घेत श्री दक्षिणमुखी जय हनुमान पुराण समितीने सर्व समाजाध्ये वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

येथील दक्षिणमुखी जय हनुमान यात्रा महोत्सवानिमित्त राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही जय भारत माता सेवा समिती आणि श्री हवा मल्लिनाथ बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्यावतीने श्री राम नवमी ते श्री हनुमान जयंती पर्यंत भाग्यवंती देवी यांच्या जीवनचरित्रावर सात दिवस प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कलबुर्गी पुराणरत्न पुरस्कारप्राप्त संगमेश शास्त्री माशाळ यांच्या अमृतवाणीने



भारतीय संस्कृतीमध्ये सुवासिनी महिलांना विशेष स्थान दिले जाते. त्यांची विधीवत पूजा करून ओटी भरणे या संस्काराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सध्याच्या विज्ञान युगात सुवासिनींसह विधवांचाही सन्मान केला पाहिजे. सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील सेवाभावी संघटनांनी सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहेत.

**- मिलनदादा कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक, अक्कलकोट**

संगीतसेवा एन.जी. भोगुंडी गौडा शाबाद व तबलावादक शेखर अंकलगी गदग यांच्या साथसंगतीने श्री जय हनुमान मंदिर पटांगणात दररोज संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत प्रवचन कार्यक्रम सुरू आहे.

यावेळी संगमेश शास्त्री यांच्या अमृतवाणीने एका पेक्षा एक भक्तिगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी जय भारत सेवा समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महास्वामीजींचे दर्शन आणि महाप्रसाद घेऊन भाविकांनी जल्लोष केला. हा मंगलमय सोहळा पाहण्यासाठी माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी तसेच भाविकांनी मोठी गर्दी केली होती, कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत आणि मंगल आरतीने करण्यात आली. यावेळी हळदी-कुंकू, हजारो सुवासिनीसह वियवा महिलांची ओटी भरणे कार्यक्रम, महाप्रसाद वाटप करण्यात आला.

यावेळी प्रभावती बिराजदार, धांनमा मठपती, लक्ष्मीबाई हिरेमठ, वंदना पाटील, लक्ष्मीबाई सलगरे, लक्ष्मीबाई बिराजदार, शांताबाई तेलूणगी, सरुबाई हिप्परगी, अंजली बिराजदार, अनुष्का पाटील, क्रांती बिराजदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी दक्षिणमुखी जागृत हनुमान तरुण मंडळाचे कार्यकर्ते, श्री बसव सेना प्रतिष्ठान, जय मल्हार तरुण मंडळ व महिला मंडळ, सामाजिक नेते आदींनी योगदान दिले.



## जेऊर येथे प्रहार संघटनेचे मशाल आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१२ एप्रिल-**

शेतकऱ्यांना कर्जमाफीसह हमीभाव मिळावा तसेच दिव्यांगांना ६ हजार पेन्शन वाढवावी या प्रमुख मागणीसाठी जेऊर (ता.करमाळा) येथे प्रहार संघटनेतर्फे गुरूवारी रात्री मशाल आंदोलन करण्यात आले.

माजी आमदार बच्चु कडू यांच्या आदेशाने शेतकरी कर्जमाफीसाठी दि. ११ एप्रिलला रात्री आमदारांच्या घरासमोर मशाल आंदोलन करण्याचे ठरले होते. त्यानुसार हे आंदोलन करण्यात आले. कर्जमाफीसाठी हातात भगवा ध्वज, गळ्यात निळा दुपट्टा व पेटती मशाल घेवुन कार्यकर्ते जेऊर येथील आमदार नारायण पाटील यांच्या निवासस्थानी आंदोलनासाठी जात होते. पदाधिकाऱ्यांना जेऊर येथील बायपास येथे अडवले. यावेळी घोषणा देण्यात आल्या. करमाळा पोलीस स्टेशनचे संदीप बनकर यांना निवेदन देण्यात आले.

शेतकरी कर्जमाफी, पेरणी ते कापणीपर्यंत खर्च एमआरइजीएस मधून करणेबाबत, दिव्यांग बांधव यांना ६ हजार रूपये मासिक मानधन देण्याबाबतच्या मागण्यांचा यामध्ये समावेश होता. यावेळी प्रहारचे करमाळा तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, सोलापूर जिल्हा सरचिटणीस बापू तळेकर, तालुका उपाध्यक्ष पप्पू ढवळे, अशोक तळेकर, केमचे उपसरपंच सागर कुरडे, मधुकर अवघडे, पांडुरंग गुटाळ, सागर कारंडे, सोनू कुरडे, बापू गलांडे व अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.